सालअखेर ॥ ७ ॥ १०८
किरकोळ अंकास.....................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .......०१

Single copy...........................1as.

Advertisements
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as.
Repetition per line 3as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII — AKOLA MONDAY 5 AUGUST 1889 — NO. 30

वर्ष २३ — अकोला सोमवार तारीख ५ माहे आगष्ट सन १८८९ इ० — अंक ३०

( विक्रीस तयार. )

### श्रीदत्तपदामृत संजीवनी.

या पुस्तकांत श्री नृसिंहवाडी व गाणगापूर येथें श्री पादुक पुढें भजनाचे वेळीं उपयोगांत आणितात तीं अनेक चालींचीं पदें, सेजारती पूर्वी करावयाचें ध्यान, पादुकांच्या प्रदक्षणेचीं पदें, पादुकांची प्रार्थना, पादुकांपुढें म्हणण्याचीं अष्टकें, नमस्काराष्टक, धांवें, आरती ध्यानाष्टक, क्षरनाष्टक, सेजारती नंतर म्हणण्याचीं पदें, अभंग, पादुकांची स्तुतिस्तोत्र, सेजारती, काकडारती, भुपाळ्या वगैरेचा समावेश केला आहे. या पुस्तकाच्या आजपर्यंत ५००० पर्यंत प्रती खपल्या. किंमत दर पुस्तकास ०६ आणे व टपाल खर्च ००६ पाठविली असतां तावडतोब पुस्तक रवाना करूं.

### श्रीदत्तपद बोधिनी.

अलिकडे श्री गुरुमहाराजांनीं रा. रा. गोविंद रघुनाथ नरवडे स्कूल मास्तर हुबळी यांच्या हृदय मंदिरीं वास करून त्यांचे कडून ६४ पदें करविलीं तितक्याच पदांचा हा प्रथम भाग करून छापिला आहे. जर हा ग्रंथ प्रसिद्धीस येऊन सकल जनांस प्राप्त होईल तर ते हा भक्तिपुरःसर अवलोकन करून किती आल्हाद पावतील हे सांगावयास नकोच. हीं ६४ पदें छापून झाल्यावर श्रीगुरुचरित्रांतील अध्याय १३-१४ यांतील सायं देवाख्यान व दुष्टयवनशा सनाख्यान अशीं आख्यानें कविता बद्ध लिहिलीं आहेत किंमत टपाल खर्चा सुद्धां ०७ आणे

वरलिहिलेलीं पुस्तकें ज्यास पाहिजे असतील त्यानीं किमतीबद्दल मनिऑर्डर किंवा रोख पैसा पाठविला असतां तावडतोब रवाना करूं. व्हाल्युपेबलनेंही पाठवूं.

विठ्ठल गोविंद नाणा वरेरकर वेंगुर्ले वृत्त कर्ते मु० वेंगुर्ले जि० रत्नागिरी

राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.

हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.

सन १८७२ चा ९ वा.

समजूतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टाचे निवाड्यांसुद्धां किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ.

### गृहिणी.

( कुलवधूंच्या ज्ञानवर्धनार्थ व मनोरंजनार्थ मासिक पुस्तक. )

ह्या मासिक पुस्तकाचे आजपर्यंत पंचवीस अंक निघाले व एप्रिल महिन्यापासून तिसऱ्या वर्षास आरंभ झाला. यांत स्त्रियांचीं चरित्रें, नीति, आरोग्य, पाकशास्त्र, शिवणकाम व स्त्रियांस इतर अवश्य वाचण्यालायक विषयांचा समावेश केला जातो. याची सालिना वर्गणी मुंबईत १॥ व बाहेरगांवचे वर्गणीदारांस टपाल हं. निराळे ३ आणे पडतील.

विशेष सूचना गरीब शिक्षक लोकांस हें मासिक पुस्तक ट. ह. सह एकरुपयास दिलें जाईल.

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनी पैसे व नांवें खालील पत्यावर पाठवावींत.

वर्गणीदार मिळवून देणारांस योग्य कमिशन दिलें जाईल.

पांच प्रती एकदम घेणारांस एक अंक फुकट दिला जाईल.

म्यानेजर गृहिणी,

### गरमीचे रोगावर औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मुत्र समई पतन होते- परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस आहे त्याणी अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

### अन्न पचन होण्याचे औषध

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमुत्र साफ होत नाहीं. पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन जळजळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेम पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्याणी पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डाक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

### पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मु० वाशीम ता० २८-७-८९ इ०

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कृ० सा० न० वि० वि० माहामारी प्रळय करीत आहे. लोक मोठ्या संकटांत आहेत. कालपरवां येथील नाझरची बायको वारली. तिचे अगदी लहान वयास लागली. विचाऱ्या नाझर साहेबांचे सुखाचे संसारांत अशा प्रकारें विघ्न आलें. यामुळें पहातांना फार वाईट वाटतें. तसें एका ब्राह्मण देशमुखाचा वीस बावीस वर्षांचा मुलगा महामारीस बळी पडून बिचाऱ्याच्या मातापितरांवर व अल्पवयस्क पत्नीवर दुःखाचा पर्वत कोसळला. हर हर परमेश्वरा, काय तुझी लीला ही!! ह्या भवमहा नदीतून तरून जाण्यास तुझीच कृपा पाहिजे. नाहींतर मोठें कठीण आहे. असो, ईश्वरा तूं ठेवशील तसें राहणें भाग आहे. आज सायंकाळीं पांच वाजल्यानंतर एकाएकी आभ्र येऊन फार पाऊस पडण्यास प्रारंभ झाला तो सुमारें तीन तास पर्यंत एकसारखा पडत होता. साल मजकुरी पाऊस बोलल्या प्रमाणें पडत आहे. पिकें उत्तम आहेत मनुष्यांची ( health ) मात्र नीट नाहींत त्यामुळें सर्व चिंतींत आहेत. हल्लीं येथें महामारी असल्यामुळें दिवाणी कोर्ट बंद ठेविलीं पाहिजे होतीं. परंतु तिकडे योग्याधिकाऱ्यांचें लक्ष जाईल तेव्हां खरें. कारण येथें असा उपद्रव असल्यामुळें लोक आपापलीं घरेंदारें सोडून येण्यास भितात. हें जरी खरें आहे तरी सरकारचे कामासाठीं बिचाऱ्यांना जीव मुठींत धरून यावें लागतें. कदाचित जर असा उपद्रव चालूं असेल तर कांहीं दिवस तो कमी पडेपर्यंत तरी कोर्ट बंद ठेवण्याचा विचार होईल असें लोकांना वाटत आहे. तसेंच येथील स्कुलें, उपद्रव लवकर न शमेल तर कांहीं दिवस बंद ठेविल्यास आरोग्य रक्षणार्थ बरें पडेल. जर इतक्यांतच ह्या भयंकर रोगांचे निर्हाड उठेल तर मग इतकी पंचाईत करण्याचें कारण मुळींच नाहीं. ईश्वरा लवकर कृपा कर व या भयंकर उपद्रवांचे येथून उच्चाटण कर.

येथें इं. म. शाळे शिवाय देवपेठेंत मराठी सरकारी शाळा आहे. तिची वार्षिक परीक्षा झाली. पहिली व दुसरी या दोन इयत्तांची परीक्षा चांगली झाली नाहीं. तिसरी व चवथी या दोन्ही इयत्तांचा निकाल चांगला झाला अशी गावांत बोलवा आहे. हें खरें असेल तर मि० नारायण गोपाळ गोरेगांवकर यांस मोठें भूषण आहे. यांचे कारकीर्दींत शाळेची बरीच स्थिति सुधारली आहे असें मे० डायरेक्टर सा० बाहादुरांनीं मागील खेपेस लिहून ठेविलें आहे. तिसरी इयत्ता शिकविणारे मास्तर फार मेहनती आहेत. पहिल्या इयत्तेचा निकाल झाला यापेक्षां चांगला न होण्याचें कारण असें सांगतात कीं ते मास्तर वर्षभर येथें नव्हते. दुसऱ्या इयत्तेचे मास्तर सर्व वर्षभर शाळेंत असतां निकाल असा कां असा कोणी प्रश्न केल्यास असें उत्तर येऊं पाहतें कीं यांचे मागें व्यवसाय फार. त्यामुळें असा निकाल कमी झाला. व शिवाय गावांत महामारी चार पांच महिन्यांपासून आहेच.

येथील मुलींच्या शाळेस तेज येत नाहीं. याचें कारण असें दिसतें कीं लोकांना स्त्रीशिक्षणाची अभिरुची मुळींच नाहीं. मास्तराची उपजिविका पगारावरच असते. बरें कसें तरी करून ते कामापुरत्या मुली जमा करितात. परंतु हें एक मोठें आश्चर्य आहे कीं आज दोन वर्षांपासून निचाऱ्यास आक्टिंग ठेविलें आहे. जर त्याला कायम करण्यासारखें त्याचें काम नसेल तर मात्र गोष्ट निराळी. परंतु ह्या गांवच्या स्थितीच्या मानानें ह्या मास्तरांचे परीक्षेचे निकाल वाईट नहींत. व साल मजकुरचा निकाल तर फार चांगला झाला असें ह्मणतात. तर वरिष्ठांनीं याजकडे लक्ष देऊन यांना कायम करावें असें लोकमत पडत आहे. व स्त्रीशिक्षणेच्छु लोकांनीं आपापल्या मुलीबाळींना शिक्षण देण्याचा अमोलिक प्रसंग दवडूं नये.

रा. रा. भिमराव अनंत पेनशनर नायब तहशिलदार यांना गेल्याच्या मागच्या आठवड्यांत देवाज्ञा झाली. या गृहस्थांची सरकारी काम करीत असतां उत्तम प्रकारची कारकीर्द होती. ते सर्वांना सर्व तालुका भर आवडते होते. ते आपल्या आमलाचा मासला कोणाला ही दाखवीत नसत. पेनशन घेतल्या वर त्यांना सरकारानें वाशीम टाऊनचे आनररी माजिस्ट्रेट नेमिले होते. तें काम त्यांनीं मोठ्या नेकीनें केलें व सर्वांना ते आवडते झाले होते. इतक्यांतच त्यांचा अंत होण्याचा समय आला नव्हता. परंतु ईश्वरेच्छा. त्यांचे मरणानें त्यांचे कुटुंबाची मोठी हानी झाली. परंतु इलाज काय? त्यांचे चिरंजीव गणेश भिवराव हे सुपुत्र आहेत. त्यांना ईश्वर सुखी ठेवो कळावें हें विनंती.

आपला
" क्ष. "

अकोलें ता. २६।७।८९

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांसः—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० आपल्या ता० २२ जुलैच्या अंकांत येथील म्यु. क. च्या संबंधानें एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत आपल्यास मिळालेल्या माहितो प्रमाणें आपण टीका करून खरा प्रकार काय आहे तो कळण्याची आपली इच्छा दर्शविली आहे. ह्मणून माझ्या समजुती प्रमाणें जो खरा प्रकार आहे तो मी आपल्यास कळवितों. आपण कृपा करून हा पत्र प्रसिद्ध करालच.

अकोलें म्यु. कमिटीच्या व्हाईसप्रेसिडेंटचें काम मी सन १८८२ सालांत पाहूं लागलों. त्या सालच्या आरंभीं लोकांकडून टाऊनफंडाबद्दल २१२९ रुपये येणें होते.

ह्या वेळेस २०० रुपयांवरील उत्पन्नावर टाऊनफंडाची आकारणी होत असे. आणि तशी आकारणी करणें व वसूल करणें हीं दोन्हीं कामें डिपुटी कमिशनर आणि तहशिलदार यांच्या पेरवी खालीं होत असत. वसूल करावयाचा तो गांवचा पाटील करीत असे.

सन १८८३ सालच्या सुमारास १०० पासून २०० पर्यंतच्या उत्पन्नावर म्युनिसिपाल कर बसला गेला. त्याची आकारणी कमिटीकडून होत असे, परंतु वसूल पाटीलच

करीत असे.

कांहीं दिवसांनीं सर्व प्रकारचा टाऊनफंड आकारण्याचें काम कमिटीकडेसच आलें; तरी सुद्धां वसुलाचें काम पाटीलच करीत असे.

पाटील हा जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यांतील नोकर आणि त्यांचाच त्याजवर हुकूम असे. तो कमिटीचा नौकर नव्हता, कमिटीच्या ताब्यांत नव्हता. किंवा कमिटीचा हुकूमही पण प्रत्यक्ष त्याजवर नसे.

टाऊनफंडाच्या वसूलबाकीचा हिशोब नेहमीं पाटील ठेवीत असे. व तो जितका वसूल दाखवी तितका तहशिल कचेरींत किंवा म्युनिसिपल हापिसांत नोंदला जात असे. अशी नोंद पाटलाचा मनुष्य मधून मधून तगादे झाले ह्मणजे करून देई. पाटलानें वसूल लवकर करावा; बाकी फार ठेऊं नये, अशा विषयीं लक्ष पुरवावें ह्मणून वेळोवेळीं कमिटींतून पाटलाच्या वरिष्ठांकडेस लिहून जात असे.

पुढें पुढें टाऊनफंडाची बाकी फार वाढत चालली, पाटील काम नीट करीना, त्याजवर कमिटीचा हुकूम नीट चालेना, तेव्हां पाटलाच्या कामावर कमिटीची नजर रहावी ह्मणून कांहीं निराळी व्यवस्था सन १८८७ सालांत करण्यांत आली. त्यानला पैसा लवकर वसूल करण्यास ज्या ज्या गोष्टींची गरज लागे त्या त्या गोष्टी कमिटीच्या मार्फत होत जाव्या, असें त्या वेळेस मे. डेपुटी कमिशनर यांच्या सल्ल्हेनें ठरविलें. त्यामुळें त्याच्या कामांत कांहीं फरक पडला; तथापि पडावा तसा पडला नाहीं. त्याच्या हिशोबांत कांहीं गडबड असावी, असाही त्या वेळेस संशय आला. ह्मणून कित्येक महिने कमेटीचे कारकून त्या कामीं लावून पाटलाचे हिशोब तपासण्यांत आले. त्यांनीं दिलेल्या हिशोबांतील आंकड्यांत व म्युनिसिपल हापिसांतील वसूलबाकीच्या आंकड्यांत फरक दिसून आला. हा फरक शोधून काढण्यासाठीं जिल्ह्याच्या व तहशिलीच्या दप्तरीं जुन्या दाखल्याचा शोध लागावा तसा लागला नाहीं. असो. जितका फरक दिसून आला तितक्या पुरता हिशोब अजून पाटला जवळून घेणें आहेच; परंतु जितका आंकडा त्यानीं दिला त्याच्या वसुलाचें काम कमिटीच्या नौकरांच्या मार्फत जारीनें चालविलें.

सन १८८७–८८ चा टाऊन फंडचा ठराव ७१९६ रुपये झाला. तो आणि मागील बाकी त्या वर्षाच्या सुरूवातीस ८५६० रुपये येणें होती. मिळून १५७५६ वसूल व्हावयाचे होते. आणि कमिटीचे सर्व कारकून त्या कामीं लावून वसूल करण्यांत आल्यामुळें एक महिना १० दिवसांत ६१५० रुपये वसूल झाले. या वर्षाचा एकंदर वसूल पहातां १२ महिन्यांत ९४७० रुपये झालेला दिसून येतो.

सन १८८२-८३ पासून सन १८८७-८८ पर्यंत दर वर्षास वसूल कसा होत गेला हें खालील आंकड्यावरून दिसून येतें.

| सन. | वसूल रुपये. |
|---|---|
| १८८२–८३ | ४१३५ |
| १८८३–८४ | ३११४ |
| १८८४–८५ | ४३९२ |
| १८८५–८६ | २१२३ |
| १८८६–८७ | ३६५८ |
| १८८७–८८ | ९४७० |

पाटलानीं कांहीं पैसे वसूल करून कमिटी कडेस हिशोबीं दाखविलें नाहींत असें जेथें जेथें दिसून आलें तेथें तेथें बहुतेक सर्व पैसा पाटलाकडून लागलींच भरून घेण्यांत आला.

पाटलास जें कमिशन दिलें आहे तें, जितका वसूल त्यांनीं रुजूं करून दिला तितक्यावरच दिलें आहे. "चुकतें" कमिशन त्यानला दिलें नाहीं.

ज्या अर्थी मनला "चुकतें" कमिशन दिलें त्या अर्थी मी पैसा ही चुकता दिला, असें पाटलानें कधीं ह्मटल्याचें मला स्मरत नाहीं, इतकेंच नाहीं, ज्या मनुष्याकडे मालक पाटलानें हें काम सोंपविलें होतें त्या मनुष्याकडून सर्व हिशोब कमिटींत दिला जावा ह्मणून मालक पाटील फार कळकळ बाळगी. आणि वारंवार आपल्या नोकरास रागावी, हें मनला स्वतःस माहीत आहे.

म्युनिसिपाल कमिटीच्या नौकरांनीं वसूल तोंडांत टाकिला असावा अशी जी आपली कल्पना आहे ती निराधार आहे. म्यु. क. ज्या नोकराकडेस वसुलाचें काम ज्या वेळेस नव्हतें त्या वेळचा हिशोब बिनचूक नाहीं. पाटील हा कमिटीचा नौकर नाहीं, हें अर्थात सांगावयास नकोच.

आपण ह्मणतां म्यु. क. त पैसे कोणी दिले व कोणी दिले नाहींत, याचा तपास करण्यास मार्ग नाहीं. आपल्यास सांगणारानें हें खरें सांगितलें नाहीं. म्यु. क. त पैसा पाटलाचे मार्फत येत असे, व कोणाकडून येणें राहिला याचे तक्ते पाटलानें आपल्या सहीचे म्यु. क. स दिले आहेत, आणि त्या तक्त्या वरूनच वस्तुतः वसुलाचें काम चालूं आहे. मात्र हे तक्ते सर्व रकमेचे त्यांनीं दिलें नाहींत ह्मणूनच त्याच्या व कमिटीच्या हिशोबांत अंतर आहे.

खरी हकीकत वर दिलेली आहे. याजवरून आपल्यास वाटेल तें अनुमान आपण काढावें लोभ असावा हे विनंती.

ताजाकलम सन १८८८ च्या मार्च अखेर बाकी ६२८६ रु. येणें कागदीं आहे. परंतु यांत जुनी बाकी सरासरी४हजार रु.आहे. व यांतून न येती अशी रकम पुष्कळ असून ती पूर्ण तपासाअंतीं खर्चीच लिहिली जाण्याची आहे.

आपला

'देवराव विनायक.'

---

पिंपळगांवराजा तारीख २।८।८९

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांसः—

वि० वि० आपली भेट घेणें महत्वाची वाटल्यावरून भेटीस आलों आहे, भेट द्याल अशी उमेद आहे. एडिटर साहेब आज सुमारें एक महिन्यापासून मेघराज पर्जन्यवृष्टि करीत असल्यामुळें सर्व प्राणीमात्रांस आनंदभरीत करीत आहे त्याजबद्दल आभार मानावे तितके थोडेच आहेत. गांवांत महामारीची स्वारी पांच सहा दिवसांपासून वास्तव्य करीत आहे, व अम्मलही चालूं आहे. पिंपळगांवराजा हा गांव अतिशय स्वच्छ असल्यामुळें महामारी बाई साहेबाचें ठाणें येथें जास्त दिवस राहील असें वाटतें; तरी येथील लोकल कमिटी व गांवांतील अधिकारी यांनीं आपलेकडून होईल तितकी कोशीस करून प्रत्येक घरचा केर कचरा व मोऱ्यांचें पाणी व गल्ल्यांची व्यवस्था उत्तम प्रकारें नीट ठेवल्यास बाईसाहेबाचें ठाणें येथून लवकरच उठेल असें वाटतें.

या गांवांतील लोक वऱ्हाडांतील सह्या जिल्ह्यांतील गांवां पेक्षां अचाट बुद्धीचे असल्या कारणानें हम्मेशा आपआपलीं घरें दुर्गंधीनें युक्त अशीं ठेवीत असतात. या गांवांतील लोक येथील अधिकारी लोकांना (ह्मणजे पाटील व पटवारी) यांना जुमानीत नसून कित्येक लोक श्रीमंतीचे दौलांत निमग्न असतात व कित्येक दारिद्री टेंक गाजवितात या मुळें सदरहू गांव इतका गलिच्छ आहे कीं पत्रीं लिहितां येत नाहीं. गांवचे अधिकारी हम्मेशा आपले कामांत अतिशय तसदी घेत असतात परंतु त्यांचे मेहनतीचें फळ होत नाहीं.

तारीख १ माहे आगष्ट सन१८८९ इ० रोजीं येथील मराठी शाळेंत नागपंचमीचा उत्सव मोठ्या समारंभानें झाला. या समारंभास गांवांतील सर्व लहान थोर मंडळी आली होती. त्यांत .. हेडमास्तर साहेब यांनीं व मे. गुलाम आहांमदखा सवदागर यांनीं व सोनाजी सखाराम फ. अ. मास्तर यांनीं लेक्चरें दिलीं. सदरहू समारंभास रा. रा. गोविंद अंताजी कुळकर्णी यांनीं मोठीच मदत दिली याबद्दल सर्व मंडळी फार आभारी आहे.

आपला एक

"ग्रामस्त"

---

वऱ्हाडसमाचार.

मिती श्रावण शुद्ध ९ शके १८११

---

बुक सक्युलर नं. ६ सन १८८९ वरून प्रसिद्ध करण्यांत येतें कीं फौजदारी कोर्टानें पुढील बाबींत साक्षीदाराला अथवा फिर्यादीला खर्ची बद्दल खालीं लिहिलेल्या दराप्रमाणें पैसे द्यावेत व त्याच प्रमाणें क्रि. प्रो. को. क. १४४ प्रमाणें दंड करण्याचे वेळेस फिर्यादीचा खर्च वगैरे ही याच दरानें आकारावा. व योग्य रेसिडेंटचें बुक. स.नं. १ सन १८८२ चें रद्द झालें असें समजावें.

बाबी— १ सरकार अथवा एखादा जज्ज माजिस्ट्रेट किंवा दुसरा एखादा सरकारी नौकर यानें अथवा त्याच्या हुकुमावरून अथवा त्याच्या मंजुरातीनें प्रासिक्युशन उपस्थित झालें असेल, किंवा चाललें असेल, किंवा दुसऱ्या कांहीं कारणावरून जेथें सार्वजनिक न्याया करितां प्रासिक्युशन करणें मुख्य अधिकाऱ्यास योग्य वाटत असेल तेव्हां.

२ क्रि. प्रो. को. च्या परिशिष्टांतील. ५ व्या कलमांत जेथें जेथें म्हणून जामिन देण्या जोगे नाहीं असें म्हटलें आहे त्या सर्व ठिकाणीं.

३ पोलिसच्या अधिकारांतील सर्व गुन्हे ४ जेथें क्रि. प्रो. को. क. ९४० प्रमाणें माजिस्ट्रेटानें आपणहोऊन साक्षिदारास बोलाविलें असेल तेव्हां दर—

१ युरोपियन आणि इस्ट इंडिअन साक्षिदारास त्यांच्या गाडी खर्चा बद्दल दर मैलीं ६ आण्यापेक्षां जास्त होत-सेल तर जितका म्हणून योग्य खर्च झाला असेल तो व शिवाय ते जर मागतील तर दररोज २॥ रुपये पर्यंत पोटगी भत्ता.

२ साधारणपणें पाटील, पांडे, व्यापारी, वकील व या सारख्या इतर नेटीव लोकांस व ज्या साक्षीदाराचा मुकदम्याशा कांहीं एक संबंध नसतां केवळ न्याया प्रित्यर्थ सरकारा कडून ज्यास बोलावणें झाले असेल त्यांस पोटगी बद्दल दररोज ६ आणे व गाडी भाडें जें योग्य असेल तें.

३ शेतकरी व इतर मजुरदार ज्यानां बाहेर गांवीं गेल्यामुळें राहण्याचा वगैरे खर्च येत नसेल त्यांनां पोटगी भत्या बद्दल दर रोज ४ आणे व शिवाय आगगाडी भाडे किंवा इतर जाण्या येण्याचा योग्य खर्च.

४ ज्या गांवांत किंवा शहरांत कोर्ट आहे त्याच गावांत जर साक्षीदार राहत असेल तर त्याला कोर्टांत हजीर राहण्या पासून होणाऱ्या नुकसानी बद्दल ४ आणे पर्यंत भत्ता द्यावा. या शिवाय इतर ठिकाणीं साक्षीदाराच्या योग्यते प्रमाणें जें योग्य दिसेल तें द्यावें.

---

राष्ट्रीय सभेस वर्गणी गोळा करून देण्याच्या कांमांत मदत देण्यासाठीं तिकडील सभेचे सेक्रेटरी कडून आम्हाकडे पत्रें आलीं आहेत, त्याजवरून सर्व लोकांस विनंती करण्यांत येते कीं, ही सभा येत्या डिसेंबरचे ता० २६ रोजीं मुंबई मुक्कामीं भरणार आहे तर सर्वांनीं कृपा करून आपआपल्या शक्तिनुरूप पुढे होऊन लोक हितासाठीं कंबरा बांधून उभें राहिलेले राष्ट्रीय सभेचे प्रमुख लोकांस द्रव्याची मदत देण्या साठीं हात वरती उचलावा.

---

अकोलें येथें स्मशानाची जागा आगगाडीच्या पुलाकडील धरणाजवळ नेमली आहे व तेथेंच सर्व शहर व पेठेंतील प्रेतें जाळलीं व पुरलीं जातात. प्रेतें दहन करण्याची चाल काय ती हिंदुजातींत आहे. थडगे करून त्यांत ठेवण्याला वगैरे जो काळ लागतो त्यामुळें हिंदुजातींतील दहनाविधीला फार काळ लागतो त्यामुळें हिंदूजातींतील लोकांना प्रेत संस्काराविषयीं नेहमीं फार त्रास सोसावा लागत असें पावसाळ्याच्या दिवसांत तर इतकी स्थिति होऊन जाते कीं कित्येक वेळा प्रेताबरोबर गेलेले लोक प्रेताला कसा तरी अग्नीडाग लावून परत आले आहेत. वरून पाऊस पडावयाचा, खालून जमीन जलमय असावयाची व अशा स्थितींत प्रेतदहन करावयाचें ह्मणजे कोण ताप! मरणाचें दुःख सुद्धां त्या तापापुढें विसरले जात असें हल्लीं या दुःख निवारणार्थ गांवांतील सभ्य लोकांनीं सुमारें ५०० रु. वर्गणी जमा केली आहे त्यापैकीं १०० रुपये जमा झाले आहेत व

२०० व्हावयाचे अहेत. आमच्या मु. क. नें ही या कामास १०० रु० याची मदत दिली असें ऐकतों. रक्कम पुरेसी झाली आहे तर आतां हें काम लवकर सुरू होईल असें आह्मी इच्छितो.

नोटिशीचें उत्तर.

दुबलतराव फत्तेसिंग देशमुख मुक्काम बाळापूर यांस.

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी वऱ्हाड समाचार पत्रांतून नोटीस दिली ती पावली तिचें उत्तर. तुमचें ह्मणणें कीं निम्मेचा पैसा तुमचे बिरादरांनीं नेला तो जातां तुह्मी निम्मेचा पैसा खर्च जातां बाकी राहिले तो घेत जावा त्यास आह्मी तुह्मांस खर्च देत नाहीं. बिन खर्ची पैसा आह्मी घेऊं तो तुह्मी घेतां किंवा कसें हें ही नोटीस पावल्या दिवसा पासून १५ दिवसांचे आंत कळवावें व जर तुमचेकडून मुदती प्रमाणें उत्तर येणार नाहीं. व पैशाचा निकाल केला नाहीं तर योग्य कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां पैसा घेतला जाईल. कळावें. तारीख २ माहे आगस्ट सन १८८९ इ०

सही

बळवंतराव यशवंतराव रहाणार सस्तो.

The Berar Samachar

MONDAY AUGUST, 5, 1889.

## THE IZARDAR'S ASSOCIATION AT YEOTMAL.

It is a notable feature of the times that associations are fast springing up in Berar. The Educational Department has not been spreading its wholesome influence over a period of a generation in vain. People know the value of combining and combining to ask constitutional relief. A few years ago we saw the Berar Sarvajanik Sabha started at Amraoti and the object of that body was to represent local grievances to government and to act generally as a sort of intermediary between government and the people. A couple of weeks ago a representation was made to that body by some people in the Wun District to take up the grievances of Izardars and others regarding bancharai and various other minor rights. The Sabha deputed two gentlemen Messers Nara-yan Govind Ketkar and Bapurao Maha Deo Pendshe pleaders both of Amraoti to go to Yeotmal and locally enquire into the grievances of the people. The Izardars assembled in a meeting on 25th and no less than a hundred influential Izardars were present. An Association as above named was then established with the avowed object of taking steps to secure the rights of Izardars. The general impression amongst the Izardars seems to be that Government does not much care to respect their rights and would curtail them if it can. The result of our own enquiries into the matter will be given out in some of our next issues but we can safely say this much that the Izardars have good reasons to think that the intention of government regarding their rights, is such as they believe it to be. The idea is a mischievous one if it does take root and we know for certain that the Supreme Government does not mean to act unfairly by them; but we think the idea they have is owing to the action of the local officers who are entrusted with the administration of the province. We shall treat the subject at length in one of our next but as we learn that some people of the Wun District have already applied to the Commissioner of the province, we have simply to suggest that a fair hearing should be given to such of their grievances of the District peoples as may be found to have a basis of fact. We have learnt that the Sabha is going to formulate the grievances and try to get correct information from the head of the District about them before forwarding a representation on the subject to Government.

Cholera is said to have made its appearance here and as a precautionary measure, the medical Department recommends the consumption of certain vegetables to be prohibited. We do not much admire the suggestion, for, what will the Medical Department suggest to prevent consumptory of rotten grain that people daily use and to obtain means wherewith to procure better one. There are many other causes that require the kind attention of the medical Department under which it is much believed the fell disease originates.

BERAR

Professor Barrett our officiating Director of Public Instruction Hyderabad Assigned Districts had been at Amraoti during the last week.

A complete list of patients suffering from the fell disease—leprosy—is being prepared at Amraoti. It is said that an enactment is under contemplation for which the above is a prelimınray step.

No rain during the week. Weather continues warm.

Our Commissioner Mr. Plowden has removed his camp form the Berar Saniterium—Chikalda-to Amraoti during the weak, and will proceed home on three month's leave, a couple of days hence.

Mr. Yassinkhan will hold charge of the Deputy Commissioner's office at Buldana after Colonel Szczepanski relieves Mr. Plowden.

THE GAZETTE OF INDIA
JULY 27, 1889

Mr. Brajendranath De, of the Bengal Civil Service, having obtained a Degree of Honour in Sanskrit in the 1st Division, has been presented with the authorized donation of Rs. 5000.

Mr. A. P. Howell is permitted to resign Her Majesty's Bengal Civil service with effect from the 13th proximo or such other date on which he may sail from India.

Mr. J. Westland, C. S. I. received charge of the Office of Chief Commissioner of Assam from Mr. D. Fitzpatrick C. S. I. on the forenoon of the 16th instant.

The services of Captain C. J Orr, 3rd Infantry, Hyderabad Contingent, are replaced at the disposal of the Military Department, with effect from the 29th instant.

## वऱ्हाड.

मि० ब्यारेट सा० आ० डायरेक्टर उमरावतीस गेले होते.

मि० ब्यानसामरान कान्सरव्हेटर ऑफ फॉरेस्ट दोन वर्षांच्या रजेवर गेले होते परंतु मुंबईस आले. त्याची नार्थ वेस्टर्न प्राव्हिन्सेसमध्यें बदली झाल्यामुळें ते वऱ्हाडांत न येतां परस्पर आपले कामावर रुजूं होण्या-जाणार असें कळतें.

मि० वेस्टलंड सी० आय० ई० यांनीं असामास जाऊन मि० डी० फिटझ्प्याट्रिक सी० आय० इं० यांजपासून चीफ कमिशनरचें कामाचा गेल्या ता० १६ रोजीं चार्ज घेतला आतां मि० फिटझ्प्याट्रिक सा० यांनीं हैद्राबादेस जाऊन रेसिडेंतचे कामाचा चार्ज घेतल्यावर मि० हावेल येत्या ता० १३ चे सुमारास पेनशन घेऊन विलायतेस जातील.

लोको. फोरसेन मि. विल्कस यांस हवेच्या उपद्रवानें बडनेऱ्यास देवाज्ञा झाली. पंढरपूरच्या यात्रेकरूं बरोबर सर्वत्र या रोगाचा फैलाव झाला. असें ह्मणतात.

मि. रस्तमजी फर्दुमजी आनररी अस्व्याची यांस वऱ्हाडांत अ. क. नेमणार अशी वदंता आहे.

नागपुरास जशी इजारदार लोकांची एक सभा आहे तशी वऱ्हाडांत ही यवतमाळास स्थापन झाली आहे हिचा उद्देश इजारदार लोकांच्या हितासाठीं झटणें हा होय. सुमारें दहा बारा दिवस झाले ही सभा स्थापन झाली. त्या समारंभासाठीं उमरावतीहून सार्वजनिक सभेच्या तर्फे रा. नारायण गोविंद केतकर वकील व रा. बापू महादेव पेणसे वकील हे गेले होते.

नोटीस.

बळवंत अंबादास जोशी राहणार अकोले यास खालीं सही करणार याजकडून तारीख १८-७-८९ची नोटीस शुद्धवऱ्हाडी पत्रांतील पावली. त्याचें उत्तर आह्मा तुमचे जागेत रहात नाहीं. व त्याजबद्दल तुह्मांस आह्मी कांहीं बोललों नाहीं. व बोलण्याचें कांहीं कारण नाहीं. सदरहूबद्दल दोन वेळ विचारले ह्मणून लिहितां परंतु सुमारें आठ नऊ वर्षें झालीं, आह्मी त्याजागेवर राहत असून तव्हांपासूनें तुह्मी अगर तुमचे बापानें विचारले नाहीं. व विचारण्याचा कांहींच संबंध नाहीं. आह्मी घर बांधलेली जागा तुमची आहे असें या नोटिशीवरून हल्लीं कळतें. कारण या जागेवर आह्मी इमला बांधला तेव्हां ही जागा तुमची आहे असेंबद्दल खुद्द तुमचे बापानें अगर दुसरे कोणी कळविलें नाहीं. तसें कळविलें असतें अगर कांहीं हरकत दाखविली असती तर या ठिकाणीं घर बांधण्याची आह्मांस कांहीं जरूर नव्हती. कारण तशी खिंडारें त्यावेळीं व हल्लीं या गांवीं पुष्कळ पडलीं आहेत. कोणी त्याजवर घर बांधणारा मिळत नाहीं. आह्मी ज्या ठिकाणीं घर बांधलें आहे ती जागा पडीत खिंडारें असून लोक त्याठिकाणीं मैला करीत होते. तमचे बापानें व इतर लोकांनीं या खिंडाऱ्याचे ठिकाणीं घर बांधलें असतां प्रसंगवशात किंमत देऊन कोणीही घेईल असें विषयीं आमचें मन वळविल्यावरून तेथें आह्मी घर बांधलें. बलके खुद्द तुमचे बापानें कळविलें होतें कीं आमचे घराजवळील खिंडाऱ्यावर घर बांधलें असतां तुमचा जो खर्च होईल तो देऊन मी विकत घेईन. कारण माझें सोयीचे होईल सदरहू जागा खिंडाऱ्याची आह्मी घर बांधून नीट नेटकी केल्यामुळें ती चांगली दिसल्याचे योगानें तुमचे मनांत बेमानी येऊन तुह्मी नोटीस दिली वरून तिचा जबाब देणें भाग झालें. करितां या नोटिसीचा खर्च नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत आमचे कडेस पाठवावा न दिल्यास रीतीप्रमाणें तजवीज करून घेतला जाईल. शिवाय तुह्मास असें ही कळविण्यांत येतें कीं ज्या जागेवर हल्लीं आम्ही घर बांधून राहात आहों त्या जागेचे आसपास हल्लीं चहूकडून खिंडारेच खिंडारे होऊन लोक त्यांत मैला करीत असल्यामुळें आह्मांस मोठा त्रास होत आहे. करितां तुमचे बापानीं केलेले कबुलायतीप्रमाणें सदरहू घर बांधण्यास आह्मास लागलेला खर्च तुम्ही हल्लीं दिल्यास आम्ही त्या खर्चांत दुसरें खुले प्रशस्थ ठिकाणीं मकान बांधू, अगर हल्लीं तुम्ही आमचे घरास लागलेली किंमत न द्याल तर जेव्हां आम्ही घर सोडूं तेव्हां तुमचे बापाचे कबुलायती प्रमाणें ती आमची किंमत देऊन घर घेऊं अशाबद्दल करारनामा लिहून पाठवावा म्हणजे तुमचे शिवाय आह्मी कोणास आपलें घर विकणार नाहीं. कळावें तारीख ३० माहे जुलई सन १८८९ इसवी.

( सही )

रामचंद्र नारायण उर्फ बळवंतराव वऱ्हाडीकर हल्लीं बाळापूर.

## वर्तमानसार.

पाटणा येथें दुष्काळानें ५० हजार लोक उपाशीं मरताहेत.

सिवा येथें एका मुलाचे कानांतून जिवंत माशा बाहेर निघतात. डाक्टरांनीं कान तपासला, पण कारण समजलें नाहीं.

गाजीपूरचे डेपुटी माजिस्ट्रेट यांस एका पोलीस शिपायानें तलवारीचे वार करून एक हात कापून टाकला. कारण समजलें नाहीं.

किलंधार येथें मथुरेहून एक विद्वान शास्त्री आले आहेत ते भारतांतील एकेका श्लोकाचे सुमारें पाऊणशें प्रकारानें अर्थ लावून दाखवितात.

केरोच्या आसपास दरवेशी लोकांची धामधूम बरीच झाली. त्यांचें एकंदर सैन्य सुमारें ३१०० लोकांचें आहे.

टर्कीच्या सरहद्दीवर रशियन लोकांचे ८०००० सैन्य रवाना झालें आहे या मुळें टर्की व आस्ट्रिया यामध्यें फार धास्ती पडली आहे.

बामास व साडोनिया येथील क्रीटन लोकांनीं सरकारी अधिकाऱ्यांस हांकून लाविलें आमच्या मागण्या तुम्हीं कबूल करणार नाहीं तर आम्ही सर्वत्र एक होऊन ग्रीसच्या सत्तेखालीं राहूं अशी त्यांनीं सुलतानांस धमकी दिली आहे.

घुलिपसिंगाच्या जवाहिराचा लिलाव पारिसमध्यें सुरूं झाला.

आस्टियामध्यें फौज वाढविण्याचा एकदम विचार होऊन जिकडे तिकडे तयारी करण्यास आरंभ झाला आहे. यावरून युरोपांत शांतता फार थोडे दिवस राहील असा तर्क होतो. सु० प०

दुष्ट स्वप्न—काश्मीरची जी वाट लाविली तीच वाट शिंदे, होळकर, निजाम वगैरे संस्थानांची लावावी अशी ग्रिफिन साहेबानीं वाचलेल्या निबंधांत शिफारस केली आहे. विलायतच्या बातमीदारांनीं इकडील कांहीं पत्रांस जीं बातमीं पत्रें पाठविलीं आहेत त्यांत हीं काश्मीर प्रकर्ण हा नुसता आरंभ आहे ह्याचे पर्यवसान किती लांब पर्यंत जाईल ते जावो असा मुख्लेख आला आहे. यावरून लॉर्डडलहौसीच्या कारकीर्दीं प्रमाणें नेटिव संस्थांनास साडेसाती पुन्हां येणार कीं काय असा संशय येऊं लागला आहे. काश्मीरच्या आकस्मिक गोष्टी मुळें संस्थानिकांच्या व लोकांच्या मनाचा धीर अगदींच सुटला आहे.

गोल्डन ग्यांगचा परिणाम. जी. आय पी. रेलवे वरील गार्डांनीं बरेच दिवस जी मुट्टेगिरी चालविली तीमुळें सरकारी रेलवेच्या डैरेक्टरांनीं एकंदर सरकारी रेलवे वरील प्रत्येक गार्डाच्या पगारांतून दरमहा दररुपयास अर्धा आणा प्रमाणें पैसा हमीसाठीं म्हणून कापून ठवीत जावा असा ठराव केला आहे. असें सिव्हिटेम्स वरून समजतें हा ठराव फार योग्य आहे.

चंदनी तेलीची चणचण— चंदनी तेलास फ्रान्सांत अतिशय तेजी आली आहे. सर्दी सूज, आंगास कंडूसुटणें हे आजार ह्या तेलानें बरे होतात असें अनुभवास आल्या वरून हें तेल तिकडे अतिशय खपतें.

ग़ु ०सू०

हिंदुस्थानांतील हत्यारांची स्थिति चांगली आहे असें विचारल्या प्रश्नाचें उत्तर देतांना सर गार्स्ट यांनीं बोलून दाखविलें हत्यारांची चवकशी कां!

हिंदुस्थानच्या सर्व सरहद्दीवर बारीक सारीक माहिती रशियनपत्रास असते व किती शोध पुरस्सर केलेली असतें त्याचें उदारण देऊन एक पत्रकर्ता ह्मणतो कीं इतकी माहिती विलायतच्या पत्रास कशी नसते? ते खुषींत गाजरें खात आहेत ह्मणून.

✓ आरबी लोकांत अशी ह्मण आहे कीं, अंतःकरण हें जिव्हेचें मोठें भांडार आहे.

✓ जो आपली जिव्हा संभाळितो तो आपल्या आत्म्याचें रक्षण करितो.

✓ जिव्हेस हाड नाहीं व ती इतकी अशक्त आणि लहान असतांही पुष्कळांस चिरडून टाकते व कित्येकांस तर ठार मारते, असें ग्रीक लोकांचें ह्मणणें आहे.

✓ तरवारीनें जितके लोक एकदम छाटले जातात त्या पेक्षां जिव्हा जास्त छाटते असें तुर्की लोकांचें ह्मणणें आहे.

✓ लांब जीभ ( जास्त बोलते ! ) मनुष्यास लवकर मरण आणतें असें पराशियन लोकांचें ह्मणणें आहे. या लोकांत दुसरी अशीही एक ह्मण आहे कीं, तुमची जिव्हा तुमचें डोकें न मारो.

✓ जिव्हेनें काढलेल्या शद्वाचा वेग घोड्याच्या वेगाहून जास्त असतो असें चिनी लोकांचें ह्मणणें आहे.

रशियाच्याच प्रांताला लागून करबारडा नांवाचा जो एक मुलुख आहे त्यांत मुसलमानांची वस्ती विशेष आहे. या मुसलमान लोकांस रशियानें बरीच मोठी जमीन इनाम ह्मणून नुकतीच दिली. ही जमीन टर्कीशीं लढाई होण्यापूर्वीं रशियानें याच लोकांपासून हिसकावून घेतली होती. ही युक्ति बहुतकरून टर्कीस खुष करण्याकरितां योजण्यांत आली असावी.

ईजिप्त प्रकरणः—करोची ता. २० मिनहूची तार सांगते कीं, सारास लोकांकडून १००० पक्के लढवैये वाडिलपूमी बंडखोरास मिळण्याकरितां निघाले आहेत, असौना येथें १५०० लोक आह्मी जय्यत तयार केले आहेत. यानंतर तीन दिवस पर्यंत मुळीच बातमी आली नाहीं. केरोची ता. २४ ची तार सांगते कीं दरवेशी बंडखोरास उत्तरोत्तर अधिक मदत मिळत आहे. या संबंधाने फार लवकर तजवीज केली पाहिजे असें जनरल ग्रेनफाल व क. उडहौस यांचें पक्कें मत झालें आहे. पुढील आठवड्यांत या लढाईचा सोक्षमोक्ष करावयाचा असें या दोघां अधिकाऱ्यांनीं ठरविलें आहे. आमची सर्व फौज लढाईच्या सर्व सामानासह लढाई करण्यासाठीं अगदीं एका पायावर तयार आहे माकूएल मीर नावाच्या एका मनुष्याच्या हुकूमाखालीं एक दरवेशांची टोळी वाडेलजुमी बंडखोरास येऊन मिळणार आहे. जनरल ग्रेनफेल यानें आपल्या सैन्याच्या दोन तुकड्या केल्या आहेत आणि त्या दोन ठिकाणीं ठेविल्या आहेत, असें केरोच्या तारीख २५ मिनहूच्या तारेवरून समजतें.

बडोदें संस्थानांत स्टांपड्यूटी बसणार असें तेथील कित्येक व्यापाऱ्यास कळल्यावरून तेथील पुष्कळ व्यापाऱ्यानीं आपलीं दुकानें बंद केली आहेत. दिवाणांनी त्यांची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला परतु त्यांची समजूत पडत नाहीं प्रथम तुम्हीं आपली दुकानें उघडा ह्मणजे मग तुमच्या म्हणण्याचा विचार करूं असें त्या व्यापाऱ्यांस गायकवाडानीं कळविलें आहे.

सिंह आला आहे— पेणेस सुमारें दोन कोशावर तळवली गांवचे जंगलांत एक सिंहासारखा प्राणी आल्याची बातमी आहे. ह्याचा शद्ब शंखनादाप्रमाणें आहे गुरांस किंवा इतर मानवी प्राण्यांस याजपासून अझून कांहीं उपद्रव नाहीं; याचा शद्ब बराच लांब ऐकूं येतो; असें ह्मणतात खरें असल्यास आश्चर्यच ह्मणावयाचें.

अस्त्रियानें आपले सर्व पायदळलढाईस सज्ज केलें आहे.

यंदा जी म्याट्रिक्युलेशन परिक्षा होणार आहे तिचा उपयोग फक्त कालेजांत जाण्याकरतांच होणार असल्यामुळें ती नेहमीच्या रीती प्रमाणें न घेतां त्या कॉलेजांतील प्रोफेसरांनीं कॉलेजांत येऊं इच्छिणारांची आपापल्या इमारतींत परीक्षा घ्यावी. परीक्षेंत जे पास होतील त्यासच कालेजांत घ्यावें ह्मणजे पैशाचा हा विशेष खर्च न होतां विद्यार्थ्यांचा ही नफा होण्याचा संभव आहे असें एकानें मुंबईच्या आन्हिक पत्रांत प्रसिद्ध केलें आहे. ही सुचना मुंबई युनिव्हरसिटीनें विचारांत घ्यावी कारण कित्येकवेळां हुशार उमेद्वार केवळ परीक्षकांच्या लहरीच्या व तब्यतीच्या बळीं पडल्याचीं उदाहरणें पुष्कळ सांपडतात.

लंडन शहरांतील गिल्ड हॉल नांवाच्या दिवाणखान्यांत इराणच्या शहास मेजवानी चालली असतां एक गमतीची गोष्ट घडून आली. प्रथम शहाच्या आरोग्यतेबद्दल ग्लास उडाल्यावर त्या मानाचें प्रातकरण करण्या करितां शहा उठला. आपल्या यजमानास लोकांनीं बहुमान दिला व त्यांचे आभार मानण्याकरतां आपले यजमान उठले आहेत हें शहाच्या जवळच्या चाकरास न समजून त्यानें शहा जाण्यासाठीं उठला, असें समजून, शहाची खुर्ची हळूच काढून घेतली. इतक्या वेळांत शहाचे आभार ही संपले व नमूं लागल्याबरोबर त्या जवळच्या चाकरानें पटकन खुर्ची पुढें केली पण ती विशेष पुढें न झाल्यामुळें शहा जों बसावयास जातो तों बैठक मारण्याची पाळी येणार होती पण शहानें प्रसंगावधानाचें अवलंबन करून टेबलाच्या टोकाला धरून तसाच ओळकंबत राहिला व नंतर खुर्ची पुढें सारून मग त्यावर तो बसला. बसल्यानंतर शहा, स्वतः मोठा गमती व रंगेल असल्यामुळें, हसूं लागला. थोडक्यांत चुकलें नाहींतर शहा खालींच आला असतां ही चूक चाकराची पण प्रसंगावधानासंबंधानें शहाची प्रसंशाच केली पाहिजे. आमच्या इकडील बाळसेदार राजे बहुतकरून खालींच आले असतें.

रशियाच्या खटपटी कांहीं विलक्षण आहेत. बल्गेरियाचा राजा मिलन यास कांहीं दिवसांपूर्वीं रशियाच्या पक्षाच्या लोकांनीं राज्यपदभ्रष्ट केला. नतर या आठवड्यांत जी तार आली त्यावरून तूं आपलें राज्य परत मिळीव व रशियाचें गुप्त कारस्थान उघडकीस आण असें जर्मनी व आस्त्रिया हें त्या राजास सांगत आहेत. पण ता. २५ मिनहूची लंडची तार सांगते कीं, हा मिलन राजा लवकरच रशियाच्या साह्यानें आपल्या पूर्वींच्या राज्यपदारूढ होईल. ही गोष्ट जर खरी असेलतर रशियाच्या कारस्थानाची सीमाच झाली असेंच ह्मणावें लागतें. ज्या राजास पूर्वीं हसकावून लावले त्याच राजास पुन्हां गादीवर बसविणें ह्मणज किती भयंकर व जबाबदारीचें काम आहे बरें. त्या प्रांतांत रशियाचें जें कारस्थान चालूं आहे त्या योगानेंच या मिलन राजास रशियानें वळविलें असेल असें दिसतें एकंदरीनें आस्त्रिया व जर्मनी जो जों बेत करतात तो तो रशिया हरप्रयत्नानें तो मोडीत आहे यावरून शाबास त्या रशियाची.

ठा० अ०

पायोनियर आणि इग्लिशमन हीं दोन नामांकित हिंदुद्वेष्टीं पत्रें २४ तास अगोदर काढून त्यांवर दुसऱ्या दिवसाची तारीख घालतात आणि आदले दिवशींच टप्पांत टाकतात. ह्मणजे शंभर कोसांवर गेलें तरी पत्र ताजेंच! हा खोटा दस्तऐवज होत नाहीं काय?

कारवाडांतील मुसलमान प्रजेस रशियानें जमिनी बक्षीस दिल्या.

उत्तर अमेरिकेंत गुहेंत राहणारे लोक सांपडतात. गोऱ्या माणसाला पाहून ते पळून जातात. खोलगे पाडलेल्या काठ्यांवरून ते आपल्या गुहेंत जातात; व कधीं कधीं तर त्यांवांचूनही तें उंच पर्वत चढून जातात. त्यांचा बांधा उंच व पातळ व रंग तांबूस असतो. हीं मनुष्यें सूर्याची पुजा करितात.

पंखा ओढणाऱ्या मजुरांनीं निद्रा घेऊंनये ह्मणून एक यंत्र तयार केलें आहे. त्याला डुकली लागली आणि पंखा बंद पडला कीं एकदम त्याचे कानाशीं आवाज होऊं लागतो. खासें!

—"शूर गार्डनची कशी गत झाली हें लक्षांत ठेव" असें दरवेशी लोक इंग्लंडच्या सेनाधिपतीस बोलून दाखवितात. त्यांवर मोठा बिकट प्रसंग आहे!

किड्यांनीं चांकांतील ऑगण खाऊन टाकल्यामुळें अमेरिकेंत रेलवेची गाडी चालत असतां बंद पडली. ( बंबे ) कांहीं केल्या चालेना.

रावळपिंडीकडे लढाईची कडेकोट तयारी होऊन राहिली आहे. एक लक्ष रुपयांची खेंचरें खरेदी केलीं सर्व पलटणींस तयार असण्याविषयीं हुकूम गेले.

इशारत— मुलांचीं खेळण्याचीं कोपें हीं दारू सामानापैकीं नाहींत, असें समजून परवान्या वांचून विकण्याची वहिवाट आजपर्यंत चालत होता परंतु तारीख १ जानेवारी १८९० पासून तो परवान्या वांचून विकूं नये. असा सरकारचा ठाव झाला आहे.

एकदां एका मनुष्याची बायको मेली; तेव्हां त्यानें मोठ्या मोठ्यानें आक्रोश करण्यास सुरवात केली, इतक्यांत त्याच्या भेटीस आलेला त्याचा स्नेही ह्मणाला "तुझी आई आणि बहीण या ज्या वेळेस मेल्या त्या वेळेस तूं इतका रडला नहींस; आई बहीण पुन्हां मिळतात काय? त्या पुरुषानें उत्तर केलें "तुह्मी वेडे आहां. पहा, ज्या वेळीं माझी आई आणि बहीण मेली तेव्हां शेजारच्या बायकांनीं येऊन माझी समजूत केली कीं तूं कशाला रडतोस, आह्मांलाच तूं आई बहीण समज. आज माझी बायको मेली असतां येक ही बायको येऊन ह्मणत नाहीं कीं, "बाबा कां रडतोस, मी तुझी बायको होत्ये."

आम्हास लिहिण्यास फार वाईट वाटतें कीं, रा. रा बाळकृष्ण मार्तंड समर्थ यांस पूर्ण मुक्कामीं तारीख ३ रोजीं अर्धांग वायूनें देवाज्ञा झाली. रा. रा. बाळकृष्णपंत यांचे वय सुमारें ५० वर्षांचे होतें. हे मध्यप्रांतांत ए. अ. क. होते. हे स्वभावानें फार चांगले होते.

---

हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास......................... ०४

नोटीशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ०।०६

दुसरे खेपेस .........०।

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10... 4as.
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII | AKOLA MONDAY 12 AUGUST 1889 | NO. 31

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख १२ माहे आगष्ट सन १८८९ इ० | अंक ३१


## नाटक प्रयोग व त्यांची स्थिती.

( लिहून आलेला मजकूर )

या विषयाचें महत्व किती आहे हें सांगणें म्हणजे भगवान् सहस्रकर धुमणीच्या तेजाचें किती महत्व आहे हें सांगणें होय. कारण या विषयाचें महत्व युरोपांत किती आहे व नाटककार मंडळींना तसेंच नाटक कला को विद्वज्जनांना किती मान मिळतो व त्यांची योग्यता केवढी समजली जाते ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. आमच्या कडे नाटककार मंडळीची व त्या बरोबरच नाटक कलेची जी शो चनीय स्थिति दृष्टीस पडते ती पाहून म पखेदाश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं. नाटक कला पूर्वी राजवाड्यांतून किंवा मोठमोठ्या यात्रांतून मोठ्या थाटमाटानें विहार करीत असे व जिचा त्या वेळीं मोठमोठे लोक आदर सत्कार करीत असत तीच हल्लीं कोणत्या स्थितींत आहे व ती कोणत्या जनांच्या आदरास पात्र होत आहे हें मोठें प्रेक्षणीय आहे.

नाटक कला पूर्वीं कशी उत्पन्न झाली व ती हल्लीं ज्या स्थितींत दृष्टीस पडते त्या स्थितींत येण्यास तिच्यांत कसकसे फेरफार झाले हें सांगण्याचा येथें उद्देश नाहीं. व ते सांगणें वाचकांना व लेखकाला ही कंटाळवाणे होय. बाकी एवढें खरें आहे कीं ती प्राचीन काळीं फार भरभराटीच्या स्थितींत होती, येवढेंचसें काय पण तीचा प्रवेश स्वर्ग लोकीं ही झाला होता. ही गोष्ट निर्विवाद आहे. इंद्रलोकीं नाटकांचे वारंवार प्रयोग होत असे. विक्रमोर्वशी नाटकांत तर ही गोष्ट स्पष्टपणें कथन केली आहे. असो. नाटक कला पूर्वी अशी होती तशी होतो तिचा हल्लीं उपयोग काय व हल्लीं ती तशी नाहीं कशावरून? हे दोन प्रश्न आमच्या पुढें दत्त ह्मणून उभे रहातील?

या पैकीं दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर देण्याचें धाडस आह्मी करतों.

या प्रश्नाचा जबाब देणें ह्मणजे नाटक कलेची सध्यां स्थिति कशी आ हें सांगणें होय. आह्मी खात्रीनें सांगतों कीं नाटक कलेची सध्यां स्थिति अतिशय शोचनीय आहे. बिचाऱ्या आमच्या आर्यभूमीचें नशीबच तसें आहे. तिची प्रत्येक गोष्टींत पच्ची झाली आहे. अविंधांनीं आह्माला पादाक्रांत केल्या पासून जे आह्मी नीच स्थितींत चाललों आहोंत ते आद्याप आम्हास उत्क्रमणगति मिळत नाहीं. बिचाऱ्या पेशव्यांच्या वेळीं "तोडा मारा, ह्मणा" ह्या कर्णकटु शब्दांनीं ह्यामचे कर्णव्याप्त झालेले होते. त्या वेळीं नाटक कलेनें ते बिचारे आपले मधुर आलाप काढून तत्कालीन जनांचें रंजन कसें करावें? तेव्हां पेशवे सरकारावर किंवा त्यांच्या कारकीर्दीवर या कलेचे पुनरुज्जीवन न झाल्या बद्दलचा दोषारोप आम्ही करीत नाहीं. पण १८१८ साल संपून गेले. "पेशवाई" हा शब्द इतिहासांत अधिष्ठान पावला. इंग्रज बहादुरांची कारकीर्द सुरूं झाली. आमच्या दयालु महाराज्ञीनें राज्यसुत्रें हातीं घेऊन आम्हा अज्ञजनांचा पालन करण्याचा जिम्मा घेतल्या दिवसां पासून आमच्या खऱ्या सुधारणेस आरंभ झाला. मग काय ज्याला वाटेल तो सुधारणा देवीचा भक्त झाला. ज्याला सुधारणा या शब्दाचा अर्थ पुरतासा अवगत नसे ते सुधारणचे मुख्य आधार स्तंभ बनले. पाहिजे तो पाहिजे त्या कलेचे पुनरुज्जीवन करण्यास तत्पर झाला सारांश आर्यांची सुधारणा देवता जी अविंधागमन होताच गुप्त झाली होती ती पर्वां इंग्रजांत या भरत भूमींत पुन्हां अवतीर्ण झाली. प्रत्येक कलेची सुधारणा होण्यास आरंभ झाला. आमच्या नाटक कलेचीही त्या वेळेस उन्नित दशा आली पण ती आणली कोणी हें सांगितलें तर खोटें वाटेल. पहिल्यानीं ज्या मंडळीनें या कलेचा अंगिकार केला त्या मंडळीपैकीं बहुतेक विश्वयोपितांचे भक्त तसेच अनेक प्रकारे नीच व अशिक्षीत होते. या मंडळीनें जो बलचा प्रकार काढिला होता तो परवां किर्लोसकरांच्या संगित आलापांचा मधुर ध्वनी ऐकूं येऊं लागला तोंपर्यंत. नाटकांच्या शेवटीं फार्स करीत असत व करितात ते तर बिभित्स प्रकारानीं परिपूत असत व आहेत. नाटक जर खरोखर संसाराचें चित्र आहे तर त्यांत अश्लील प्रकार होत असतील हो कल्पनाच मुळीच संमत नाहीं. व जरी होत असतील तरी असले घाणेडे चित्र जगापुढें आणण्याचा उपयोग काय? कित्येक असें ह्मणतात कीं प्रहसनकारांचा, फार्स लेखकांचा दुर्गुणापासून तोटे व सद्गुणापासून नफे दाखविण्याचा नेहमीं उद्देश असतो पण या प्रश्नास उत्तर आह्मी न देतां गोल्डस्मीथ कवीचाच विचार येथें दाखल करतों.

"But, say some of the authors of these romances have nothing in veiw but to represent vice punished, and virtue rewarded. Granted. But will the greater numbers of readers take notice of these punishments and rewards? Are not their minds carried to something else? Can it be imagined that the heart with which the author inspires love of virtue can over-come that crowd of thoughts which sway them to licentiousness. To be able to inculcate virtue by so leaky a vehic the author must be a philosopher of the first rank. But in our age we can find but few first rate philosophers."

वरील अभिप्राय किती सुरेख आहे? तो आमच्या कडील प्रहसनकार तसेच त्यांचे प्रयोग करणारे नाटककार यांनीं किती ध्यानांत ठेवण्या जोगा आहे? आमच्या नाटककार मंडळीला हल्लीं जो मान मिळतो व हल्लीं जी त्यांची योग्यता समजली जाते ती आह्मी ह्मणतों याचें यथार्थ दर्शक होय. नाटकवाला म्हटला कीं आमच्या कपाळास आठ्या पडल्या. त्याचे बरोबर बोलण्यास आम्हास शरम वाटूं लागते. आतां आमचे असें म्हणणें नाहीं कीं नाटकवाले म्हणजे सर्वच सत्वस्थ असतात व्यक्तीमात्र दोषांनीं तर घेरून टाकलें आहेत. मग बिचारे नाटक वालेच कां मुटावें? पण व्यक्ती, मात्राच्या दोषावरून त्या कलेला दोष देणें हा केवढा असमंजसपणा. प्रत्येक धंदा जर चांगल्या तऱ्हेनें केला तर तो चांगला आहे. याच अर्थाचा एक इंग्रजी उतारा आमच्या वाचण्यांत आला आहे. तो खालीं देतों.:—

पुढें चालेल.

### निवडक उतारा.

हिंदुस्थान देशाचें क्षेत्रफळ १५ लक्ष चौरस मैल असून लोकसंख्या २९ कोटी आहे. ह्या पैकीं सुमारें ५ लक्ष चौरस मैल प्रदेश संस्थानिकाचे स्वाधीन असून, त्यांतील लोकसंख्या ५ कोटी आहे. एकंदर संस्थानें सुमारें ४५० आहेत; त्यांचे तीन प्रकार आहेत. प्रथम प्रकारचीं संस्थानें ह्मटलीं ह्मणजे स्वतंत्र संस्थानें होत. ज्या संस्थानिकांशीं सरकारचे तह ठरले आहेत ते दुसऱ्या वर्गांत येतात. छोटेखानी ठाकूर, जहागिरदार, आणि तालुकदार ह्याचा तिसरा वर्ग बनविला आहे. इंग्रज सरकारचे ताब्यांतील हिंदुस्थानच्या प्रदेशाचे आठ इलाखे केले असून त्यांचे २२४ जिल्हे आहेत. त्यांत एकंदर ४,९४००० गांवें आहेत. पन्नास हजारांपेक्षां अधिक लोकवस्तीचीं ४४ आणि दहा हजारांवरील वस्तीचीं १,३५८ शहरें आहेत. एकंदर २० कोटी प्रजे पैकीं १४ कोटी हिंदु असून ४ कोटी मुसलमान आहेत. सुमारें २ कोटी कोळी वगैरे प्राचीन लोक आहेत. व १२ लक्ष शीक असून १० लक्ष ख्रिस्ती लोक आहेत. वस्ती असलेल्या घरांची संख्या ३,७०,००,००० आहे ६,२०,००,००० प्रौढ पुरुषांपैकीं ३,८०,००,००० शेतकरी आहेत. ८० लक्ष मजुरी करणारे आहेत. कलाकौशल्यावर उपजीविका करणारे ८० लक्ष आहेत. ३५ लक्ष व्यापार करतात. संपादित ज्ञानावर २५ लक्ष आपला निर्वाह चालवितात. बाकी राहिलेले घरगुती नौकरीवर आपला चरितार्थ चालवितात. एकंदर हिंदुस्थानांत सरकारी नौकरींत गुंतलेले १२ लक्ष लोक आहेत. २ १/२ लक्ष सावकारीचा धंदा करितात भिक्षेवर पोट भरणारे १० १/२ लाख लोक आहेत. दुकानदार व गुरांचा व्यापार करणारे मिळून ८ लाख इसम आहेत. नांगरलेली व पड मिळून ५० कोटी एकर जमीन आहे. ह्यांपैकीं सुमारें निम्मे ओसाड जमीन आहे. आणि सुमारें १० कोट एकर जमीन लागवड होण्यासारखी असूनही ती पड राहिली आहे. लागवड केलेल्या सुमारें १९ कोट एकरांपैकीं २ १/२ कोट पाटस्थळ आहे. ज्या कालव्यापासालीं ही जमीन भिजते त्यांची लांबी सुमारें ३४,००० मैल आहे. ते बांधण्यास २१ १/२ कोट रुपये खर्च लागली असून त्यांजपासून निवळ उत्पन्न १ १/४ कोट रुपये होत आहे. लागवडीतील जमिनींतील जमिनींपैकीं सुमारें २ ३/४ कोट एकरांत मात्र मनुष्यांच्या जीवनास उपयुक्त अशा जिनसांची लागवड करीत नाहींत. एकंदर पिकांचें दरसाल उत्पन्न ३५० कोट रुपयांचें असावें असा अजमास आहे. बंगाल बहार व ओरिसा प्रांतांतील जमिदारांची संख्या १३० हजारांपर्यंत आहे असें मानिलें आहे. मध्यप्रांतांतील जमिनीची मालकी २८ हजार माल गुजरांत विभागली आहे. मद्रास इलाख्यांत जमीन वहाणारीं २४ लक्ष कुळे आहेत. पैकीं दरसाल दहा रुपयांच्या आंत सारा भरणारी निम्या पेक्षां अधिक आहेत. मुंबई इलाख्यांत सुमारें १४ लाख रयत आहे. पैकीं ७ लक्षा पेक्षां कांहीं अधिकच रयतेचे ताब्यांत प्रत्येकी दहा एकराचे आंतच जमीन आहे. एकंदर राज्यांत स्वस्थता राखणाऱ्या पोलिस खात्यांत १ लक्ष नौकर आहेत. पैकीं सुमारें १ १/२ लक्ष लोक खड्यानिहाय असून राहिलेले कवाईत शिकलेले आहेत. चौकशी केलेल्या एकंदर गुन्ह्यांची संख्या दरसाल ९ लाखाजवळ पोचते. व त्यांत सुमारें १० लक्ष लोक सांपडत असून पैकीं ३ १/२ लाख लोक सुटतात. व बाकीच्यांना शिक्षा मिळते. एकंदर २११ कारागृहें आहेत व एकंदर ३८६ तुरुंग आहेत. सुमारें १२ लक्ष लोकांना कैदखान्यांत जावें लागतें; पैकीं ५० हजार स्त्रिया असतात. सुमारें १६ लाख दिवाणी फिर्यादीचे उभ्या वर्षांत फैसले होतात. १०० रुपयांच्या आंतील दाव्याचा आंकडा ११ लाखांजवळ जातो दवाखाने व रोगीगृहें मिळून ११५० आहेत. ह्यांजमधून ६५ लक्ष रोग्यांना औषधें मिळतात. वेड्याकरितां २२ गृहें आहेत. त्यांत ३५ शें इसमांची शुश्रुषा होते. प्रतिवर्षी ३५ लक्ष मुलांना देवी काढल्या जातात. सर्व हिंदुस्थानांत ९०० म्युनिसिपालिट्या आहेत, त्यांत ७७ शें सभासद आहेत. ह्यांजपैकीं ६००० एतद्देशीय गृहस्थ असून राहिलेले युरोपियन आहेत. ह्या कमेट्यांचें उत्पन्न २ कोटीजवळ आहे. आणि त्यांचे ताब्यांत अजमासें १४० लक्ष लोक आहेत. एकंदर विद्यालयें ६६,५०० आहेत. व ह्यांत २० लक्ष विद्यार्थी विद्याभ्यास करितात. ह्यांजपैकीं ८९ पाठशाळा ( कॉलेज किंवा शास्त्रीय ज्ञानाच्या विशेष प्रसरणार्थ स्थापिलेल्या शाला ) आहेत. ह्यांतून ९ हजार तरुणांस विद्या प्राप्ती होत असते. शिक्षक मंडळी तयार करण्यासाठीं आणि विशेष गोष्टी शिकविण्याकरितां १५ शाला आहेत. ह्यांतील विद्यार्थ्यांची संख्या ७००० आहे. युरोपियन लोकांतील ९०५० हजार विद्यार्थ्यांसाठीं १०४ शाळा आहेत. एकंदर शाळांपैकीं १४५०० सरकारी खर्चानें

चालल्या अहित. व ह्यांतून ५ १/२ लाख पर्यंत विद्यार्थ्यांना शिक्षण मिळतें. २१६०० शाला ना सरकारची मदत आहे, व येथें ६ १/२ लाख मुलें शिकतात. इतर शाळांची संख्या २३६०० आहे. ह्यांना ७,००००० विद्यार्थ्यांकडून आश्रय मिळतो. ह्या देशांत एकंदर ९,५०० पोस्टहापिसें आहेत, ह्यांनपासून ६६ लक्ष रुपये सरकारास मिळतात, व ही रक्कम घरगुती पत्रव्यवहाराचे आकारापासून मिळते. तारायंत्राच्या २४० कचेऱ्या आहित. ११,००० मैल लांबीच्या प्रदेशांतून तार गेली आहे, व तत्प्रीत्यर्थ ३ १/२ कोट रुपये सरकारास खर्च आला आहे. घरंदाज गृहस्थांनीं एकंदर १२ लक्ष वेळां बातम्या धाडल्या; ९ लक्ष वेळां सरकारनें ह्या खात्याचा उपयोग केला हें साधारणतः दरसालचें प्रमाण आहे. ८,६०० मैल लांबीच्या प्रदेशांत आगगाडीनें आज मितीला मालाची ने आण होत आहे. ह्यांतील ६,६०० मैल लांबीच्या सडकेची व्यवस्था कंपन्याकडे असून उत्पन्नाबद्दल हमी सरकारानें घेतली आहे. २,४०० मैल लांबीची सडक सरकारी मालकीची आहे, व १७९ मैल लांबीच्या सडकेचें स्वामित्व कांहीं संस्थानाकडे आहे. (मि० ज्युलंड ड्यानवर्स ह्यांनीं नुकीच कांहीं हकीकत प्रसिद्ध केली आहे तिजवरून आगगाडीच्या योगानें ९,३२१ मैल लांबीच्या प्रदेशांत माल पोंहचविला जातो असें कळतें.) रेल्वेंतून प्रवास करणारे उतारूंची संख्या ४ कोटीपेक्षां अधिक होते. आगगाडींतून गेलेल्या मालाचें वजन ८० लक्ष टण (ह्मणजे सुमारें १ कोटी १२ लक्ष खंडी होते.) एकंदर रेल्वे तयार करण्यासाठीं १९९ कोट रुपये खर्च झाला आहे. ह्याचें उत्पन्न ११ कोट रुपये झालें असून खर्च ६ कोटी रुपयेपर्यंत त्या वर्षी आकारला आहे. रेल्वे कंपनीचे ६३,२९९ भागीदार आहेत. पैकीं फक्त १०१ भागीदार एतद्देशीय गृहस्थ आहेत. २ व ३ कोट रुपयांचे दरम्यान रक्कम लोकांनीं सरकारी ब्यांकेंत ठेव ठेवली आहे. सरकारच्या १३८ कोट रु० कर्जापैकीं १९ कोटी रुपये इकडील लोकांनीं दिले आहेत. ब्रिटिश हिंदुस्थानांतून एकंदर ६० कोटी रुपयांचा माल जलमार्गानें परदेशीं गेला. व ३६ कोटींचा इकडे आला एकंदर व्यापारपैकीं सुमारें १७ कोटी रुपये किंमतीच्या मालाचा व्यापार ग्रेटब्रिटन व ऐर्लंड ह्या देशाशीं झाला. आनीत मालाचे किंमतीपेक्षां नेत मालाची किंमत सुमारें १६ कोटीनें अधीक होती. सरकारानें एकंदर दोन पूर्णांक एक द्वितियांश कोटी किंमतीचा माल आपले खर्चासाठीं आणला. देश किनाऱ्यावरील निरनिराळ्या बंदरांतून ७० कोटींची धामोड झाली. एकंदर किनारा ९ हजार मैलापेक्षां अधीक असून बंदरें ३०० आहेत. परदेशांतून माल आणण्यांत व नेण्यांत १२,९०० जहाजें गुंतलीं आहेत. ह्यांतून ९९ लक्षटण ओझें नेतां येते. ह्यापैकीं २ हजार आगबोटी आहेत; त्यांतून २५ लक्ष टण माल नेतां येतो. जहाजांपैकीं शेंकडा ८८ जहाजांचे मालक ब्रिटिश व्यापारी आहेत. पूर्वेकडील व उत्तरेकडील सरहद्दी बाहेरच्या देशांशीं ५ कोटीपेक्षां अधिक किंमतीचा व्यापार चालतो. इकडून बाहेर नेलेल्या मालांत चहा ३४० लक्ष पौंड वजन असून त्याची किंमत ३ कोट रु० धरली आहे. काफीचे वजन ३ पूर्णांक १ द्वितियांश लक्ष हंड्रेडवेट होते, व किंमत १ पूर्णांक १ द्वितियांश कोट रु० झाली. गहू ६९ लक्ष हंड्रेडवेट व तांदूळ २ कोट हंड्रेडवेट यापमाणें होते एकंदर ९३ गिरण्या आहेत; त्यांतून १०,५०० माग व १२ लक्ष चात्या चालतात. ह्याजमध्यें ९ कोटींचे भांडवल गुंतलें आहे. इकडे १० लक्ष टण कोळशांची खप होतो. पैकीं ५ लक्ष टण इकडेच उत्पन्न होऊन बाकी ५ लक्ष टण इंग्लंडाहून येतो. कोळशाचे खाणीवर १०,००० लोक गुंतले आहेत. राखून ठेवलेल्या जंगलांकडे २१,००० चौरस मैल जमीन गुंतलेली आहे. व ४४,००० चौरस मैल जमिनीवरील रानांचें सरकार संरक्षण करितें. एकंदर ५४० लक्ष टण धान्य देशांत पिकतें, पैकीं ३८० लक्ष टण इकडील लोकांत खपतें. ९० लक्षांचा विनियोग बी, गुरें, व नासधूस ह्यांजकडे होतो; आणि सुमारें ९० लक्ष टण परदेशीं पाठविण्यास उपयोगीं पडतें. फौजेंत १,८३,४०० शिपाई आहेत. व सुमारें ६२,००० अंमलदार आहेत. दर माणशीं सरकार देणें दोन रुपये दरसाल बसतें. जमिनीचे मालकांस सरकार देणें दर माणशीं २ ३/४ रुपये द्यावें लागतें. शेतकाम करणारे मजुरावर १४ आण्यांचा आकार बसतो.

(पुढें चालेल.)

वऱ्हाडसमाचार.

मिती श्रावण वद्य २ शके १८११

आमच्या तारीख २२ जुलैच्या अंकांत आकोलें म्यु. क. च्या संबंधानें जो लेख प्रसिद्ध झाला अहे त्याजबद्दल आह्मास खरा प्रकार कळविण्या विषयीं रा. देवराव विनायक यांनीं तकलीफ घेतली याजबद्दल त्यांचे आह्मी फार आभारी आहों. परंतु दुःख मानण्या सारखी गोष्ट ही कीं त्यांनीं दिलेली माहिती गोल गोल व अपुरी असल्यामुळें आमची खात्री होत नाहीं. टाऊन फंडाच्या हिशेबांत घोटाळा आहे ही गोष्ट खास अहि, व तो हिशेब कोणाच्यानें ही खात्री लायक समजून दिला जाईल असें आम्हाला वाटत नाहीं. मे. कमिशनर साहेब यांचे सन १८८८ इ० च्या डिसेंबर महिन्यांत येथील म्युनिसिपाल क. स एक पत्र आलें अहि. त्यांत त्यांनीं एक तक्ता करून पाठविला आहे परंतु तो तक्ता अद्याप पर्यंत म्यु. क. च्यानें भरून पाठविला जात नाहीं. तक्त्यांतील माहिती कांहीं विशेष मागितली अहि असें नाहीं. परंतु मुळांतच जर हिशेब चोख नाहीं तर माहिती देतात कुठली. कमिशनरच्या पत्राचें अद्याप उत्तर जात नाहीं व शेवटीं ही पण "नकारा" शिवाय दुसरें उत्तर जाईल असें दिसत नाहीं. खरोखर जर रीतीप्रमाणें कमेटीजवळ हिशेब असतां तर दर वर्षीचा आकार किती, त्यांपैकीं वसूल झाला किती व राहिला किती व राहिला तो कोणाकडे राहिला व त्याच प्रमाणें आतां जो बाकी न येती ह्मणून दाखविली जाते ती कोणकोणत्या सालाबद्दल आहे वगैरे माहिती देण्याला सबंध आठ महिने कांहीं नको होते. हल्लींची कमिटी तें पत्र राव साहेबांकडून तहशिलदार साहेबाकडे व तहशिलदार साहेबाकडून रावसाहेबाकडे पाठवीत आहे परंतु अद्याप उत्तर ह्मणून कांहीं जात नाहीं. कमेटीच्या हिशेबांत घोटाळा असणें किंवा राव साहेबांचें ह्मणण्या प्रमाणें " अंतर " असणें हा दोष पाटलाचा कीं कमेटीचा कीं इतर लोकांचा? पाटील हा कमेटीचा नोकर नव्हता हें ह्मणणें कमेटीला शोभतें काय? तो वसूलाचें काम करीत असें व त्याजबद्दल त्याला कमिटींतून कमिशन मिळत असें. व तो कमिटीचा प्रत्यक्ष जरी नोकर नव्हता तरी त्याच्या कामाची तपासणी करणें, त्याजजवळून योग्य वेळीं हिशेब घेणें वगैरे काम कमेटीचें होतें. व तो जरी तहशीलदाराच्या हाताखालीं होता तरी त्याजबद्दल तहशीलदार जबाबदार आहेत असें म्हणतां येत नाहीं. व हें हिशेब घेण्याचें किंवा तपासण्याचें काम जर म्यु. क. नें दक्षतेनें केलें असतें तर आज जो म्यु. क. ला कित्येक मनुष्याजवळ वसुलाच्या पावत्या असूनही पैसा मागण्याचा प्रसंग येतो तसा आला नसता. कमिशनरच्या पत्राचें उत्तर कधींच देतां आलें असतें व म्यु. क. स. हल्लीं ४००० रुपयाची टोपी बसण्याचा जो आतां प्रसंग आला आहे तोही पण टळला असता.

रावसाहेबानीं आपल्या पत्रांत सन१८८२ पासून ते ८७ पर्यंतचें वसूलाचें आकडे दिलें आहेत; परंतु त्या रकमे पैकीं कोणत्या साला बद्दल किती रकम आहे हें दाखविलें नाहीं. त्याच प्रमाणें दरसालच्या आकाराचें व त्यांपैकीं वसुलाचें व न येती बाकीचे आंकडे ही पण दिलें नाहीं. तें जर दिले असते तर तेव्हांच चक्क समजूत झाली असती. हिशेब दाखविण्याचा तो असा अर्धवट कां दाखवितात! तो सबंधच दाखविला पाहिजे, नाहीं तर उगीच संशय मात्र जास्त वाढतो. येवढें जर रावसाहेब आपल्या माहिती वरून किंवा त्यानां माहित असलेल्या कागदा वरुन दाखवून देतील व त्याचप्रमाणें सन१८८८च्या मार्च अखेर जी ६२८१ रु. बाकी येणें दाखविली ती कोणत्या साला बद्दल आहे हें कळवितील व कमिशनरच्या पत्रांचें उत्तर देतील तर आम्हो त्याचे फार आभारी होऊं व कमेटीचे हा कोडें दुर होऊन ती वृथा दोषा पासून मुक्त होईल.

रावसाहेबांना आह्मी हिशेब दाखवा असें ह्मणतो यांत कांहीं आह्मी अपराध करतों असें होत नाहीं. ज्या अर्थी ते आमचें ट्रस्टी आहेत त्या अर्थी त्यांना हिशेबे मागण्याचा आमचा अधिकार आहे असें आह्मी समजतों.

जों पर्यंत कमिशनरच्या पत्राचें उत्तर कमेटीला देतां येतनाहीं व मागील बाकी जी येणें आहे ती कोणत्या साला बद्दल आहे हे समजण्याचा मार्ग कमेटींत सापडत नाहीं व जो पर्यंत कमेटी मागील वसुला बद्दल पैसें दिले असतां व पावती असतानाहीं लोकांनां मागणी करते तों पर्यंत आमच्या बातमीदारांनीं कळविलेली बातमी खोटी असेल असें अनुमान आमच्यानें करवत नाहीं. या पुढें जर कमेटी किंवा रा. देवराव विनायक तपशीलवार सर्व माहिती देतील व आमची बातमी खोटी ठरवितील तर आह्मला कांहीं एक दुःख न वाटतां उलट मु. क. नें आपलें काम फार दक्षतेनें केलें हें पाहून फार आनंद होईल.

हल्लींची कमेटीही वसूल करण्याच्या कामांत फार मेहनत घेत नाहीं असें दिसतें. अद्याप या सालचा बराच वसूल होणें आहे. मागील हिशेब साफ नाहीं म्हणून चालू कामांत व्यत्यय येतो, असें कमेटीला म्हणतां येणार नाहीं. दर साली बाकी न येती दाखवून त्या बद्दल जबाब देत बसण्यापेक्षां ती वसूल करून दाखविणें हेंच बरें. व खरोखर जर कमेटी चांगली मेहनत घेईल तर ४।५ वर्षांत ५०००।६००० बाकी वसूल होण्याची राहिली आहे किंवा न येती आहे असें सरकारण म्हणण्याचा पाळी बहुत करून येणार नाहीं.

नुकताच मुंबई हायकोर्टांत मि. जस्टीस पारसन यांनीं रायली ब्रदर्स वि. करीम अल्ली फमुल या दाव्यांत जो ठराव केला अहे तो व्यापारी लोकांस फार महत्वाचा अहे. कायद्याप्रमाणें स्टांप न लावल्यामुळें कशी नुकसानी होते हें या ठरावावरून चांगलें समजून येईल. व तसें न करण्याबद्दल व्यापारी लोक खबरदारी घेतील. प्रतिवादीनें वादीचें गहुं खरेदी करण्याबद्दल दोन करार केले होते परंतु ते पाळले नाहींत सबब नुकसानी बद्दल वादीचा दावा होता त्यांत निकाला करितां मुख्य मुद्दा असा होता कीं लेखी करार शाबीत करण्याकरितां तोंडी पुरावा घेतां येईल किंवा नाहीं? सदरहु करार शाबीत करण्याकरितां प्रतिवादी व दलाल यांच्या सहीच्या दोन चिठ्या वादीनें पुराव्यांत दिल्या. सन १८७९ च्या स्टांप आक्टांतील परिसिष्ट १ आर्टिकल ४६ प्रमाणें या चिठ्यांना १ आण्याचा स्टांप लागतो व त्याप्रमाणें १ आण्याचे स्टांप त्यावर बसविले होते परंतु कायद्याप्रमाणें तें क्यांसल केलें नव्हते. स्टांप आक्टांतील कलम ११ प्रमाणें हें क्यांसल (काट मारलेलें) केलेलें नसल्यामुळें योग्य स्टांप लाविलेलें नाहींत असें ठरवून ते पुराव्यांत ग्राह्य नाहींत असें ठरविलें. चिठ्या पुराव्यांत चालत नाहींत असें पाहून वादीनें त्या चिठ्यांत नमूद केलेल्या कराराबद्दल तोंडी पुरावा सादर केला. परंतु पुराव्याच्या कायद्यांतील कलम ९१ प्रमाणें लेखी करार तोंडी पुराव्यावरून शाबीत करितां येत नाहीं असें असल्यामुळें कोर्टास तो पुरावा घेतां आला नाहीं. व शेवटीं वादीनें जे करार मोडल्या बद्दल दावा आणला होता ते कराराच शाबीत झाले नाहींत सबब नुकसानीबद्दल दाद देतां येत नाहीं असें ठरवून वादीचा दावा खारज केला. कायद्याविषयींचें अज्ञान ऐकलें जात नाहीं सबब साधारण व्यवहारांत उपयोगीं पडणाऱ्या गोष्टी व्यापारी लोकांच्या नेहमीं ध्यानांत असल्या पाहिजेत.

# The Berar Samachar

MONDAY AUGUST, 12, 1889.

## THE PRESERVATION OF THE COW.

Of late much has been said and writ-

ten with regard to the preservation of the horned cattle in India. A portion of the prees as well as a portion of the public have on occasions more than once taken lead to oppose the movement.. "The Times of India of Bombay makes a great show of approaching the subject from an economic point of view. It now and then however throws a hint or two that the movement may possibly have some-thing to do with the political agitation going on in the country. A small portion of the mahomedan public has also put forth itself as opponents to the cause.

Be this as it may. Thre is not the slightest doubt that the question of preservation of the horned cattle is of vital importance in the present day. The vast continent of India is entirely dependent on agriculture; and agriculture cannot be prosperous without horned cattle. This is owing to the peculiar circumstances of this country. Can we afford to be blind to the wants of our country? If those who are in power do not concern themselves much about these things it is the bounden duty of every son of the soil, no matter what creed he professes, to put his nerve to keep together the body and soul of his countrymen—the Indians. However it will be a grave error on our part to say that Government is not aware of the fact that agricultural cattle do not exist in proportion to the culturable soil. The opinions expressed on this subject by officers entrusted with the administration of the country go directly to show that cattle is decreasing and there is no knowing as to what will be the result if this state of things continues on for some years to come.

Of the cow agitation, the protection of the cow is indeed a very important matter. But there is not the slightest doubt of the fact that cow is only deemed a representation of the whole class of horned cattle. The principal object is the preservation of the cattle subservient to the purposes of the agricultural industry. When such animals become useless either on account of old age or otherwise, they may as well be disposed of in the best manner possible. But the whole-sale-system of disposing cattle that obtains at present is certainly fraught with danger to the principal industry of the country; and if no move is made to put a stop to this method; there is a sure and certain destruction of the human population of the country at no very distant future.

If in order to find game for shooting purposes game laws are enacted there is no reason why regulations for the preservation of the horned cattle should not be made. The fact is that when officers go on a shooting excursion and return disappointed, when they find no good game, their groans and disappointments easily reach the ears of the legislators and game Laws will soon find its place on the table of the Council Hall. Nearly the whole population of India, at least the Hindoos of all castes cry for preservation of the horned cattle because they find it very difficult to get bullocks for their ploughs and milk for their children their cries are unheeded and Govt. does not find it quite convenient to institute an inquiry into the whole subject of the protection of the cattle. Such is the irony of fate.

---

Under the rules regulating Legal Practitioners in H. A. D. a candidate for the pleaders Examination has to pay rupees ten as his entrance fee. The rules however do not provide how the amount collected should be used. Still we think the Legislature would not have intended to appropriate it to any purpose other than the examination expenses. In other provinces the amount of fees is always spent to defray the expenses of the examination for which it is collected. In their expenses they include the items for remuneration to examiners for their labours to examine and draw out papers. But here as we have seen out of the whole amount collected, which is on an average Rs. 300 or so, a very small sum, say Rs. 20 or 25, is spent to supply the candidates with writing things, while the remainder is appropriated to the purpose for which it is not intended. Instead of accumulating the money year by year or appropriating it to some extra purpose we ask the Judicial Commissioner to spend it in engaging a good lawer, either from Berar or other provinces to draw out and examine papers. This proposal of ours if carried out at all will be advantageous both to the examiners and examinees. It will help the officers in Berar who are ex-officio examiners, and leave no room for the candidates to complain against the papers; besides it will prevent a raw material being introduced into the Berar Bar.

## CORRESPONDENCE.

### BERAR PLEADERS' EXAMINATION. SUGGESTIONS.

This year's examination is to commence on the 5th of the next month. It is now time to appoint the committee and to draw up question papers. A few suggestions with regard to the examination will no doubt be most opportune. It is hoped, therefore, these suggestions will be taken into consideration for what they are worth.

(1) The candidates appearing this year are most fortunate, in so far as they will be examined under the personal superintendence of the High Court. According to the rules made under the Legal Practitioner's Act as applied to this Province the examiner's committee should consist of three members. One of whom is the Judicial Commissioner who is the President. The other two members are to be selected by him. As a civil and Sessions Judge Mr. Obbard will probably be on the Committee. To these two Judicial high Officers, if a High Court Pleader (practising in this province) be added, the addition will be a matter of general satisfaction and the committee will become what it ought to be. It is a practice in every law examination conducted by High Courts to admit necessarily a barrister at law or a pleader practising there to such committees. It is well known also that both Colonel Mackenzie and Mr. Obbard have a strong love for justice. This suggestion at least will not, therefore, fail to engage their attention.

(2) In the same rules text books and the number of papers specifying books for each paper have been mentioned It is, therefore, implied that text books specified for each paper should be allowed each its proper share in all papers. No questions from books other than those appointed are intended to be asked. But this rule, as it appears, is every year over-looked. For example, in the Equity paper the text books specified are Specific Relief Act, Transfer of Real Property, Mortgages and Trust. The question on the last three subjects are intended to be drawn from the *Principles of Equity* and not from the *Transfer of Property Act* and the *Trust Act*. These *acts* are not made applicable to this Province. These rules are generally based on those of the Bombay Examination. Looking to the practice of Bombay it is just what is stated above. (Vide the printed book containing the Bombay Examination papers from 1869 to 1888 pages from 145 to 243.) The question papers should not be of unusual length as has been the practice here. Looking at the last year's question papers, and specially the two Procedure papers, any reasonable person will admit that even a competent candidate being himself a fast writer, cannot answer all the questions in full within the specified time, although he knows them all well. The same book will also give the nature of the questions and the extent of each paper that can be answered in three hours.

(3) The order of papers, so long as it is not fixed permanently, should be published at least a week before the examination.

(4) The papers, if possible, should be printed; if not, at least they should be clearly lithographed so as not to take up more than a reasonable time of the candidates in going through them.

Colonel Mackenzie, Mr. Obbard are, so to speak, the two prominent members of the Committee. This very fact has specially induced the writer to make the suggestions.

Amraoti 5-8-89. Yours S. V.

---

Mr. G. S. Khaparde formally resigned his post of E. A. C. and resumed his pleaders work in the last week. As there were no officers available, he had to make over the charge of the Budnera Court to his clerk.

Mr. Plowden Commissioner H. A. D. proceeded on three months leave having handed over the charge to Colonel Szczepanski in the last week.

Dustoor Edulji Baimanji E. A. C. is to join his new post of Assistant cantonment Magistrate at Secundarabad on the 17th instant.

Mr. Howell handed over the charge of his residency to Mr. Fitz Patrick on the 3rd instant.

Dr. Rally the Local Civil Surgeon has we hear taken good precautions to prevent Cholera and we hope the Local Municipal Committee give him every possible assistance.

## पोंच.

'अंबालहरी' नांवाचें वर्तमानपत्र आम्हाकडे आलें आहे 'विद्येंत मागें असलेल्या लोकांच्या सुधारणें करितां' ह्या पत्राचें जनन झालें आहे. दीन बंधुचा कित्ता जर न गिरवतील तर उद्योग स्तुत्य आहे.

'विधवा वपन अनाचार' नांवाचें पुस्तक त्याच्या ग्रंथ कर्त्याकडुन आम्हास नजर आलें आहे त्याचा आम्ही आभारपूर्वक स्वीकार करतो.

## वऱ्हाड.

मि. हेअर सा० येथील डे० क० गेल्या शुक्रवारीं खामगावांस जाऊन काल परत आले.

वणीकडील पो० इन्स्पेक्टर मि० गेइकमसिंग कॉलऱ्यानें वारले असें ह्मणतात.

या रिकाम्या झालेल्या पो० इ० चे जाग्यावर रा० रा० मनोहर नारायण यांस नेमण्याबद्दल शिफारस झाल्याचें कळतें.

बाळापूर येथील प्रसिद्ध शास्त्री वे. रा.रा. गोपाळराम शास्त्री महाराज यांस मागील शुक्रवारीं देवाज्ञा झाली हे पौराणिक असून जाडे विद्वान होते.

येथील सेंट्रल जेलचे आस्पीटल असिस्टंट अमीनुलाखा यांस कामावरून सस्पेंड केलें असल्यामुळें त्या जागेवर हा० अ० शेक हुसेन यांस नेमलें आहे.

पास झालेले तीन मेडिकल प्युपिल्स वऱ्हाडांत मे. स्यानिटरी कमिशनरकडे पाठविले आहेत.

प्लोडन सा० कमिशनर गेल्या ता० ४ रोजीं रात्रीच्या गाडीनें येथें आले व दुसरे दिवशीं कर्नल स्पान्स्की सा० यांस कामाचा चार्ज देऊन पुढें मुंबईस गेले.

कर्नल स्पॅन्स्की सा० उमरावतीस गेले.

रा० रा० गणपतरावजी खापरडे बी. ए. एल. एल. बी. हे ए. अ. क. चे कामाचा चार्ज देऊन वकिलीचें काम करावयास लागले.

बडणेरा कोर्टावर पाठविण्यास कोणी कामगार नसल्यामुळें तें कोर्ट बंद ठवण्यांत आलें आहे.

---

नोटीस.

राजश्री हरद्वार भारथी गुरूमंदराज भारथी गोसावी राहणार मौजे कानसनी तालुके आकोलें यांसः—

नोटीस देणार हंबीरजी वल्लद हरजी पाटील व सोनाजी वल्लद हंबीरजी पाटील रहणार मौजे खाबोरें भाबोरें तालुके आकेलें याजकडुन.

नोटीस देतो कीं, आम्ही उभयतांनीं तुम्हा जवळ रकम रुपये ३०० नगदी धरवर ठेविली आसून त्यास सुमारें २-१० दोन वर्षे दाहा महिनें झाले असावें. तुमचे जवळ रकम मागितली असतां आज देऊं उद्यां देऊं असे बोलून आज पर्यंत दिवस काढीत आहे आणि तुमचे मनांत मुदती बाहेर दिवस गेले ह्मणजे माझी रकम बुडविण्याची आहे. यास्तव ही नोटीस तुम्हास दिली असे तरी ही नोटीस पावल्या पासून १५ पंधरा दिवसांत आमचे ३०० रुपये देऊन आमची पावती घेऊन जावें. नाहीं. पेक्षां तुमचेवर कायदेशीर रीतीनें दिवाणींत दावा करून या नोटिशीचे खर्चा सुद्धां हुकुमनामा मिळवून रुपये भरून घेतले जातील हें तुम्हास कळावें तारीख ९ माहे आगष्ट सन १८८९ इ०

(सही.)

१ हंबीरजी वल्लद हरजी पाटील द० खुद.

१ सोनाजी वल्लद हंबीरजी पाटील द० खुद.

---

मागाहून आलेली नोटीस

ती० रा. रा. परशुराम नानजी नेंढे यांस. खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे जवळ आमची वडिलोपार्जित इष्टेट म्हशी व सर्वे नंबर १८८ पैकीं ३०-२०९ चा हिसा इत्यादि मिळून १०० रुपयाची जिनगी व दोन वर्षे झालीं वरील इस्टेटचा उपयोग घेता. तर ही नोटीस पावतांच वरील इष्टेट व तिचे उत्पन्न ७५ मिळून १७५ रु० द्यावे. नाहींतर आम्हीं दिवाणींत दावा करूं. अखेर निकाल होईपर्यंत नोटिशीचे खर्चा सुद्धां भरून घेतले जाईल. तुम्हीं वरील इष्टेट विकुं नये कळावें ता० ११ माहे अगष्ट सन १८८९ इ०

(सही) बनु नरसाजी नेंढे केली द० खु०

---

## वर्तमानसार.

सरकार स्वारी करणार—कोहटच्या सरहद्दीवर रहाणारे काकक्षैस म्हणून डोंगरी लोक आहेत. त्यांत ९० हजार लढाऊ लोक आहेत. यांनीं ब्रिटिश हद्दींत येऊन पुंडाई केल्यामुळें येत्या हिंवाळ्यांत त्यांच्यावर स्वारी करण्याचा सरकारचा मानस आहे.

पवित्र तळाव—धर्मधरन ( पंजाब ) येथें शीक लोकांचे गुरू अर्जुनसिंग यांणीं एक तलाव खोदला आहे. या तलावाचें पाणी इतकें रोगहारक आहे कीं त्या तलावाच्या ह्या कांठा पासून त्या काठां पर्यंत महारोग ग्रस्त मनुष्य पोहत गेला असतां रोग बरा होतो अशी तिकडे प्रसिद्धी आहे. महारोग्यांकरितां या तलावाच्या कांठीं सरकारानें एक आलय ही स्थापन केलें आहे. खरें असल्यास हा अद्भुत प्रकार समजला पाहिजे.

आयुधें आणि दारू सामान भरून काबुलाहून उंट आणि खेचरें मिळून १०० जनावरें तुर्कस्थानाकडे अमिराच्या हुकुमानें रवाना झालीं. शु० सू०

मुंबई हायकोर्टानें अलिकडे एका खटल्यामध्यें असा ठराव केला आहे कीं, साक्षीदारानें साक्ष देतांना धरसोडीची उत्तरें दिलीं किंवा प्रश्नास जबाब देण्याचें नाकारलें तर तो शिक्षेस पात्र आहे.

मनुष्याच्या मनोधर्मांचें प्रमाण सगळें मिळून जर १०० भाग धरिले, तर त्यांत ६० भाग अभिमान १० भाग क्रोध, १ भाग बेपरवाई, ३ भाग समाधान, आणि १ भाग दया अशी वांटणी होईल असें एक मानस शास्त्रवेत्ता लिहितो.

सरकारी महत्वाचा ठराव लहानशा पिस्तुलांत मुलें जे कॅप उडवीत असतात त्याकॅपांच्या पेट्या दारू सामानां पैकीं समजून ता० १ जानेवारी १८९० पासून बिगर परवानगी विकूं नयेत असा ठराव झाला आहे.

झोंप आणणारी वनस्पती—मेक्सिको मध्यें एक प्रकारची वनस्पती उगवते त्याला तेथील लोक अर्ब आफ प्राफसीग ( भविष्य करी वनस्पती ) असें म्हणतात, हिच्या योगानें माणसास झोंप चांगली लागते. परंतु दरम्यान त्यास कांहीं गोष्टी विचारिल्या असतां त्या झोंपेंतच सांगता येतात किंवा जें सांगावें तें काम त्या इसमास झोंपेंत असूनच करतां येतें!!!

जवाहिराची विक्री—महाराज धुलिपसिंगाचें जवाहिर सांप्रत पारिस येथें बाजारांत आलें आहे. पहिल्या दिवशीं ४६००० फ्रांकचे जवाहीर विकलें. एक हिरे माणकांची आंगठी होती तिचीच किंमत ११००० फ्रांक आली.

ठराव—दिवाणी कोर्टांत आजपर्यंत जे जामीन कतबे होत असत त्यांला आण्याचा कोर्ट फी स्टांप लाविला म्हणजे बस होत असें. परंतु अलाहाबाद हायकोर्टाचे ठराबा वरून मुंबई हायकोर्टानें असें ठरविलें आहे कीं, जामीन कतब्याचें रकमे प्रमाणें जनरल स्टांप लावून शिवाय आठ आण्याचा कोर्ट फीचा स्टांप लावावा. याचा विचार केला म्हणजे हा निवळ जुलुम आहे असें होतें. याचा सरकार विचार करील काय?

औरंगाबाद—गेले आठवड्यांत मंगळवारीं रात्रीं सात वाजे पासून तो पाहटचे तीन वाजे पर्यंत इतका पाऊस पडला कीं असा पाऊस दहा पांच वर्षांत पडला नाहीं- याच रात्रीं पावसानें बारा पुला नदीस इतकें पाणी आलें कीं, मकई दरवाजा पाणचक्की लष्कर या रस्त्याचे पुलावरून पाणी गेलें.

बंगाल्यांत आगबोटी तयार करण्याची हिंदुमंडळी स्थापन झाली आहे. त्याच प्रमाणें १० रुपयाचा भाग ठेऊन कोंकणच्या लोकांनीं एक मंडळी उभारावी असें घाटत आहे. फार चांगलें होईल व कांहींच्या तरी परावलंबनाच्या यमयातना नाहींशा होतील. न्या० सिं०

ईजिप्तमध्यें दरवेशी लोक व इंग्रज लोक यांच्या फौजा अगदीं जवळ येऊन ठेपल्या आहेत व मोठी लढाई होण्याचें चिन्ह आहे. असें ता. १ च्या तारेवरून समजतें.

रशियाचे बादशाहा आपल्या घरच्या मंडळीसह, या महिन्याच्या अखेरीस डेन्मार्कची राजधानी कोपनहेगन येथें जाणार आहेत असें समजतें.

हिंदुस्थानची खानेसुमारी व मनुष्य गणती सन १८९१ सालच्या आरंभीं व्हावयाची आहे. तें काम पाहण्याकरितां क० फर्डेस हेनांच्या चक्करशीतील बेन्स साहेब यांस सेन्सस कमिशनर नेमिलें. ते सिमल्यास तावडतोब जाणार आहेत. सु० प्र०

ग्वाल्हेरचा एजंट ह्यांनीं तेथील रीजन्सी कौन्सलांतील मंडळीस काठीनें मार दिल्याचें समजतें. न्याय मिळेल!

हायकोर्टः— कर देण्याची अखेरची मुदत संपल्या पासून म्यु. पा. मे. तीन महिन्यांचे आंत फिर्याद आणावी. नाहींतर पैसे मिळणार नाहीत असें नुकतेंच हाय कोर्टानें ठरविलें आहे. क० त०

पुण्याच्या न्यू इंग्लिश शाळेकरतां गायकवाड सरकारानें ६,००० रुपये दिले. मान्य देणगी.

टर्की सरहद्दीवर कार नावाच्या शहरीं रशिया आपली फौज मोठ्या जारीनें वाढवीत आहे या ठिकाणी तोफखाना, पायदळ व घोडेस्वार यांची राशियानें चंगळ उडवून दिली आहे हें एक नवीनच.

आतां डोळे उघडत आहेतः— फ्रान्स व टर्की यांच्याशी स्नेह संपादन करण्याकरतां व जवळ येणाऱ्या युरोपियन लढाईंत स्वतःचें संभाळण्या करितां आपण इजिप्त सोडणें उत्तम. तसेंच ऐरिश मेंबरास जी कैदेची शिक्षा देण्यांत येत आहे त्यांत थोडी ढिलाई दाखविली पाहिजे व ऐर्लंडांत स्वतंत्र कारभार देण्यांत यावा असें लार्ड चर्चील यांणी बेरींगहाम येथें ता. ३ जुलै रोजीं बोलून दाखविलें. युरोपांतील राशियाची चळवळ पाहून चर्चील साहेबांची पाचावर धारण बसली वाटते. अजून आमचे सालीसबरी गुंगींतच आहेत.

क्राफर्ड प्रकरणामुळें प्रसिद्धीस आलेले व नुकतेच शेतकीचे डायरेक्टर झालेले मि. भीमभाई कृपाराम यांस फ. क्ला. सरदार करण्यांत येणार असें ह्मणतात. देव देऊं लागला ह्मणजे असें देतो. मि. भीमभाईस मिळत असलेले हे बक्षीस अगदीं योग्य होय.

अलाहाबाद हायकोर्टाचे जज मि० स्ट्रेट यांचें उदाहरणें हिंदुस्थानांतील इतर युरोपियन जज्जांनीं व ज्युरीनें घेणें अवश्य आहे. कोणी युरोपियनानें हिंदुस्थानांत कांहीं गुन्हा केल्यास तो अजी किंवा अगदीं थोड्या शिक्षेवर सुटून जातो असें नेहमीं अनुभवास येतें व त्यावरून नेटिवांची तशी समजूतही झाली आहे, पण हें पुढील उदाहरण त्याच्या विरुद्ध आहे. अलाहाबादच्या सेशनांत गारेट नांवाच्या एका युरोपियनावर सरकारी पैसा खाल्याचा आरोप आला होता व त्याची चवकशी होऊन ज्युरीनें त्यास दोषी ठरविलें व वरील जज्जानें त्यास सहा वर्षे सक्त मजुरीची शिक्षा दिली अशी एक गोष्ट नुकतीच बाहेर आली आहे. ही शिक्षा सांगतांना जज्ज मि. स्ट्रेट यांनीं जे शद्ब उच्चारले ते काळ्या गोऱ्या सर्वांनीं ध्यानांत ठेवण्या सारखे आहे. ते कैदी गारेट यास उद्देशून ह्मणाले कीं, हा पैसा खाण्याचा तुझा धंदा नेहमीं चालूं होता व तपासणी सुरूं होऊन आपला निर्दोषीपणा दाखविण्यास जागा नाहींशी झाल्यावर तूं आपला तो अपराध आपल्या हाताखालच्या नेटिव कामदारांवर लोटण्याचा यत्न केलास, याकरितां तुला सक्त शिक्षा असणें अवश्य आहे. इंग्लंडांत या गुन्ह्यास याहूनही कडक शिक्षा झाली असतीं तरी मी तुला सहा वर्षांची शिक्षा देतों. ते आणखी ह्मणाले कीं हिंदुस्थानचा कारभार नेटिवांच्या मदतीवांचून होण्यासारखाच नाहीं आणि सरकारचे बडे इंग्रजकामदार हाताखालच्या नेटिव कामदारांशीं चांगल्या रीतीनें वागतात हें फार चांगलें आहे. तुझ्या हाताखालच्या नेटिवास तुझ्या सारख्या इंग्रज कामदाराच्या हाताखालीं राहण्याची पाळी आली हें त्यांचें दुर्दैव आहे. कज्याची सर्व हकीकत वाचण्यांत आली नाहीं तरी हा जो थोडा भाग बाहेर आला त्यावरून स्ट्रेट सारखे इंग्रज न्यायाधीश अजून हिंदुस्थानांत आहेत हें जें यावरून सिद्ध होतें त्याबद्दल आह्मी ईश्वराचे आभार मानतों. ठा० अ०

जगांत जेवढे स्वतंत्र देश आहेत ते सर्व आपापल्या सोयी प्रमाणें फायद्याचे पुरुषार्थाचे व सुखपाप्तीचे उद्योग करीत असून ते ते सर्व देश आपापली खरी उन्नती ही करून घेत आहेत. हा सर्व प्रकार आम्ही डोळ्यांनीं पाहून कानांनीं ऐकतों, पण आमच्या हातून एकही उद्योग होत नाहीं एवढेच नव्हे; तर आम्हीं जे जे उद्योग हल्लीं करीत आहों ते ते उद्योग आमच्या गळ्याशी येण्या सारखेच करीत आहों हें पाहून मोठी मौज वाटते. आम्हास आमचें राज्य नाहीं. आम्हास आमचा धर्म नाहीं व आम्हास आमचे लोकही नाहींत असाच भास होतो. आम्ही एकादा उद्योग करावयाचें मनांत आणलें म्हणजे प्रथम आमच पुढें एकादी सकेशा विधवा येऊन उभी रहाते! ती उभी राहिल्यावर आमच्या मनांत कल्पना यावयाच्या त्या तिचे केस ठेवावे कीं काढावे असाच मासल्याच्या येऊं लागतात. फार झालें तर तिचा पुनर्विवाह करावा असें ही भासतें. पुढें सोंवळ्याओंवळ्या बद्दल कांहीं कल्पना येतात. देव आहे कीं नाहीं असें वाटूं लागतें. सर्व देशभर दरिद्र वाढलें असल्यामुळें त्या दरिद्राची कारणेंच मनांत येऊं लागतात. त्या करणांत मुख्यत्वें करून जातिभेदानें दरिद्र आलें किंवा धर्माचरणानें दरिद्र आलें अथवा देवभोळेपणानें दरिद्र आलें असें ही भासूं लागतें. शिवाय आचार विचार चालीरिती यावरही त्या दरिद्राचा आरोप येतोच. आमचे पुरुष ज्या प्रमाणें बाहेरचीं कामें उरकून आमच्या बायकांच्या गळ्यांत पोळपाट लाटण्याचीं कामें असावयाचीं तद्वतच जगांतील सर्व देश इतर देश काबीज करण्यांत मोठमोठ्या कारखान्यांत, मोठमोठ्या लढायांत व मोठे मोठे देश जिंकण्यांत गुंतले असून आह्मी मात्र हिन जाती प्रमाणें दीनें होऊन पोळपाट लाटण्याचें काम करित आहों! आमच्या बायकांस मोकळीक नाहीं, नसेल, आमच्या बायका अडाणी असतात असतील विधवांचे केस काढणें वाईट आहे, असेल, पुनर्विवाह नाहीं, नसेल, पण या सर्व गोष्टींच्या असल्या पासून किंवा नसण्या पासून आह्मी आज पोटभर जेवीत नाहीं किंवा उपाशीही रहात नाहीं, तथापि ज्या गोष्टीनें आमच्या पोटांत भडका उठत आहे, पोरेंबाळें अन्नावांचून तडफडत आहेत. आतां मरूं घटकेनें मरू अशी ज्याच्या योगानें आमची दुर्दशा झाली आहे त्या गोष्टीचें मनन नको का करावयास! सर्व जग अनादीनींत आहे असें मानणाऱ्या बादशाही नफिकाच्या वर्गांतलीच ही मंडळी ह्मणावयाची! यावरून इतकेंच उघड दिसतें कीं, इंग्रज लोकांनीं आह्मांस कांहीं तरी सांगावें आणि आह्मी तें त्यांचें सांगणें श्रुतीवाक्य ह्मणून ऐकावें एवढेंच काय तें! त्यांत आमच्या राजांनीं पुरुषांचीं कामें आपण पतकरलीं असून पोळपाट लाटणें त्यांनीं आमचे वांटणीस दिलें आहे हें उघड ठरतें!! पु० वै०

मुंबईस एका तेरा वर्षांच्या मुलास कोणी वर उचलून तळ्यांत फेंकून दिलें. पाण्यांतला आवाज ऐकून एक दोन मुसलमान व एक पारशी गृहस्थ तळ्याकडे धावत गेले. व एकानें तळ्यांत उडी टाकून त्या मुलास वर आणलें व दवाखान्यांत पोंचतें केलें. मुलगा शुद्धीवर आल्यावर त्याची जबानी घेतली त्यांत तो ह्मणतो कीं, त्याला कोणी भुतानें उचलून फेंकून दिलें असावें.

अमेरिकेंतील जानस्टन टाऊन मध्यें जलप्रलय झाला त्यावेळेस जो अनर्थ गुदरून गेला तो सांगतां पुरवत नाहीं. कित्येक जोडपीं एकमेकाला मिठ्या मारलेलीं गाडलीं गेलीं. कित्येक लग्न लागत असतां हातांत हात घातलेलीं बुडालीं. एक तार मास्तरीण ओगल्हीं बाई आपलें तारेचें काम करित मेली. तिला संकट येणार हें अगोदर समजलें होतें व 'तूं निघून जा' ह्मणून तिला सूचना ही आल्या होत्या. परंतु खालच्या प्रदेशांत तारा पाठविण्याचें काम तिनें ह्मपल्यानें चालविलें होतें व शेवटीं आपल्या मित्रास तार पाठविली कीं 'हा माझा शेवटचा निरोप' केवढी ही बंधुप्रीति! केवढी कर्तव्यजागरूकता नाहीं तर आमच्या इकडे असा प्रसंग एखाद्या बाप्यावर जरी येता तरी तो आधीं आपल्या स्वतः सुटकेची तयारी पहातो.

लंडन येथील पशुच्छळप्रतिबंधक सभेनें वर्षांचे उत्पन्न २०,०००रु. झालें ८०२०० लोकांवर गुन्हे शाबीत करण्यांत आले. केसरी.

---

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

केरकोळ अंकास.....................०४
नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .........०।

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisements
below 10 lines... 2Rs.
per line over10... 4 as.
Repetition perline 3as.

VOL XXIII AKOLA MONDAY 19 AUGUST 1889 NO. 32

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख १९ माहे आगष्ट सन १८८९ इ० अंक ३२

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

चिखलदरा तारिख १३-८-८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यास

कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळीस येत्या सुंदर अंकीं स्थळ मिळेल अशी आशा आहे.

आठ दिवसा पासून एकसारखी पावसाची झडी सुरूं आहे धुवारें व वारा एकसारखा वाहतो. हवा अगदीं खराब झाली आहे. माहामारीनें मागील दीन आठवड्यांत चिखलद ऱ्याचे आसपास बराच प्रळय करून सोडला. हल्लीं थोडी कमी आहे. येथील चिफकानस्टेबल यांनीं तीन महिन्याची हक्काची रजा घेतली यांचे जागेवर परतवाड्याहून कोणी नागोराव नांवाचे गृहस्थ आले आहेत. पाऊस पडल्या मुळें तलाव जलमय झाले आहेत. सर्व साहेब लोक स्वस्थानाप्रत गेले येथील शाळामास्तर बरेच दिवसा पासून पोटशुळाची व्यथा लागल्या मुळें दवाखान्यांत औषध घेत होते. त्यांनीं बदली विषयीं रिपोर्ट केल्या वरून वरिष्ठा कडून हुकूम आला कीं डाक्तरचें सर्टिफिकिट हजर करावें.

डाक्तर साहेबांनीं देण्याचें नाकारिलें. ते म्हणाले कीं तुम्हांस जो रोग आहे त्यास इंग्रजींत हिस्पेपसिआ म्हणतात ह्या रोगास बदलीचें सर्टिफिकिट देतां येत नाहीं. अखेरीस बिचाऱ्यानें नाइलाज होऊन कमी पगारावर बदला होण्या विषयीं अर्ज केला. सात आठ महिनें मेळघाटांत घालवून अखेरीस सर्टिफिकिट न मिळाल्या मुळें गरीबाचें नुकसान होईल तरी आमचे दयाळु डे. इ. साहेब साल्याच पगारावर बदलतील असें आम्ही इच्छितों. वास्तविक रीतीनें पाहिलें असतां येथील शाळा केवळ नांवाचीच आहे वीस बावीस मुलें हजिरी पटावर, सरासरी हजिरी तेरा अगर चौदा असते पावसाची झडी लागली म्हणजे पांच अथवा सात मुलें हजर असावयाचीं. मास्तर नेहमीं मांदा असावयाचा अशा स्थितींत जी शाळा आहे तिचा रिझल्ट तरी किती चांगला होईल याची शंकाच नको. पत्र विस्तार फार झाला म्हणून पुरें करितों कृपा करून छापावेंच नकाय- कळावें लोभ असावा ही विनंती. आपला एक

डी.

तालुके पुसद वऱ्हाड तारीख ११ माहे अगष्ट १८८९

हवामान. पाऊस पाहिजे तसा डपत आहे. खरीपाच्या पेरण्या संपल्या निंदणीचे काम सुरूं आहे. अद्याप पावेतों पिकें चांगलीं आहेत. अशीच शेवटपर्यंत राहिली म्हणजे निःसत्व शेतकऱ्यास आनंद होईल. महामारी बयानें पुसद गांवांतून सध्यां निंघाड उचलिलें आहे तरी अजून तालुक्यांतून बाहेर गेलें नाहीं. दिवस मानाप्रमाणें अमांश विकरा जास्त आहे.

सडकांची दुरस्ती करण्याचें व नाल्या वगैरे खणण्याचें कामांकडे येथील लोकल कमेटीचें अजून लक्ष्य जात नाहीं जागोजाग नाल्या तुंबून सर्व पाणी सडकेवरून वहात आहे. त्या मुळें सर्व सडका वाहून जात आहेत आणि खळगे पडत आहेत. अशा जागीं आंधारांतून जाणें म्हणजे मोठा त्रास आहे.

वाशीम पासून उमरखेड पर्यंतो जी डाक जाते तिच्यांत अगदीं नियमीत पणा रहात नाहीं ह्या संबंधानें मागें आपल्या पत्रांत सविस्तर हकीकत आलेली आहे तिकडे पोष्टाच्या अधिकाऱ्यांनीं लक्ष्य पोंचवावें अशी विनंती आहे.

ह्या तालुक्यांतील सोयगांरी व कान्हे ह्या गांवांतील खुनांची चौकशी अकोला येथें नवीन झालेल्या सेसन कोर्टांत व्हावयाची आहे. वऱ्हाडांत न्याय मिळविण्यास किती त्रास आहे ह्याचा हा एक मासलाच आहे गरीब फिर्यादी गुन्हेगार साक्षिदार ह्या सर्व लोकांस ह्या पावसाळ्यांत पायवाटेनें पन्नास कोस रखडत जावें लागणार; त्या भीतीनें साक्षिदार लोक ही साक्षी देण्यास नाराज होतील आणि लोकांस खरा न्याय देण्यास अडथळे होतील. थोड्या नवकर लोकांस त्रास देऊन शेकडो रयतेचे जर त्रास चुकवितां येत आहे तर सरकार ती गोष्ट कां करीत नाहीं ह्याचें आश्चर्य वाटते. मागें सेसन कोर्ट जिल्ह्याचे मुख्य ठिकाणीं भरत असे तर ही व्यवस्था मोडण्यांत सरकारास कोणता फायदा दिसला असावा असेल तो असो!

पुसद कोर्टाचा हल्लीं वाशिमास मुक्काम आहे! ह्याचा आपल्या वाचकांस मोठा अचंबा वाटेल. तरी त्यांनीं माझें ह्या संबंधाचें दुसरें पत्र आहे ते पाहिले म्हणजे सरकार रयतेच्या सोईकडे किती लक्ष्य देतें ह्याचा त्यांस अदमास करतां येईल.

पुसद येथील आठवडे बाजार गांवापासून लांब गेला. ह्या ठिकाणीं उन्हाळ्यांत पाण्याची फारच तलखीफ आहे. नदी लांब आहे आणि तलाव जवळ आहे त्यांत माघ महीन्याचे पुढें पाणी मुळीच रहात नाहीं तसेंच तहसील कचेरी जवळ एक विहीर आहे पण तिची ही तलावा प्रमाणेंच व्यवस्था तेव्हां अशा ठिकाणीं वैशाख महीन्यांत भर दुपारीं दुकानदारांस मुखाड जमिनीवर तळतळत बसणें म्हणजे ही एक त्यांस पोटांत काटे भरतां येत नाहीं ह्मणून शिक्षाच समजली पाहिजे. ह्याठिकेस जे नेहमीं उन्हांत फिरणारे लोक ते देखील एकाद्या झाडाचा आश्रा पाहून उन टाळितात! गुरें ढोरें चरणें सोडून गोठणावर सावलींत बसतात अशा वेळेस ह्या सुखी राज्यांत पाण्यापासून दूर व उन्हांत ह्या आमच्या लोकांस बसावें लागणार! आतां पासूनच जर ह्या लोकांनीं एकजुट करून पाण्याची कांहीं व्यवस्था झाली तर आम्ही येथें उन्हाळ्यांत बसूं अशा बद्दल सरकारास विनंती करावी. तसेच आमच्या दयाळू अम्लदारांनीं ह्या गोष्टीकडे लक्ष्य पुरवावें व गरीबास उन्हाळ्यांत पाणी पाजण्याचें श्रेय घ्यावें. ह्या पासून त्यांचे कारकिर्दीचें लोकांस स्मरण राहील व ते त्यास दुवा देत जातील.

पुसद तालुक्यांतील
आपला एक मित्र

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

विनंती विशेष.आपण देशसेवा करण्याकरितां अवतार धरला आहांत तरी "वर्तमानसार" ह्या माथळ्याचे खालीं आपली अमोल जागा न आडवितां लोकांच्या गैरसोईचा गिला सरकारपर्यंत पोहोंचवाल तर गरीब रयत आपले अनंत उपकार मानील व आपणास अप्रत्यक्ष रीतीनें उत्तेजन देईल. असो. खालील मजकुरास ह्या अंकीं अवश्य जागा मिळेल अशा आशेनें पाठविला आहे तरी निराशा होऊं नये. पुसद कोर्ट पुसदाहून साडेएकुणीस कोसावर.!!

वरील माथळा वाचून आपले वाचकांस आश्चर्य वाटेल पण असें खरेंच आहे. नवीन ज्युडिशियल स्कीममध्यें दोन कोर्टें नवीन झालीं पैकीं एक पुसद तालुक्याचे वाश्यास आलें आहे. पण तें अद्यापि येथें आलें नाहीं. त्याचा मुक्काम येथून ३९ मैलांवर वाशिमास आहे व ते बरसांत संपेपावेतों तेथेंच रहावयाचें असें ऐकतों. बरसातींत येथें येण्यास अशी कोणती अडचण आली हें समजत नाहीं. जागेबद्दलच अडचण असेल तर मागें एकदां येथें एक असिस्टंट कमिशनर थोडे दिवसपर्यंत आले होते त तेथील तहशील कचेरींतच बसत होते. आतांही बरसात संपेपर्यंत तेथें बसले तर मोठीशी अडचण होईल असें नाहीं. ह्या खेरीज गांवांतही भाड्यानें कोठें बरी वाईट जागा मिळूं शकेल. पण ह्या सर्व गोष्टी वरिष्ठ सरकारचे नजरेस येतील ते व्हां ह्याचा उपयोग होणार.

पक्षकार लोकांस किती अडचण पडत आहे ह्याची कल्पना त्यांची त्यानांच करितां येईल. कारण जर सरकारी अधिकाऱ्यांस करितां आली असती तर त्यांनीं ही गैरव्यवस्था होऊन दिली नसती.हल्लीं वाशिमास वाळूचा उपद्रव आहे. तेव्हां घरदार मुलेंबाळें सोडून त्या आगींत उडी टाकण्या पेक्षा दाता बुडाला तरी पत्करला असें पक्षकारांस वाटत असेल त्यांनीं आरंभीं खर्च केलेला सर्व फुकट जाणार तेव्हां तो त्यांस फिर्याद केल्याबद्दल दंडच ह्मणावयाचा! महामारीचा उपद्रव बंद होईपर्यंत कोर्टें बंद ठेवावींत ह्मणून अपल्या वाशीमच्या बातमीदारांनीं सूचना केली आहे. ती फार योग्य आहे. महामारी जर स्पर्शजन्य रोग असेल तर हे पक्षकार लोक तेथें जाऊन आपण बरोबर रोगाचें बीज आणतात असें ह्मणावयाचें. ही गोष्ट आरोग्यरक्षक अधिकाऱ्यांचे नजरेस आली नाहीं ह्या बद्दल वाईट वाटतें.

पुसद तहशील कोर्टास ५० रुपयापर्यंत दिवाणीचा दावा होता तोही आतां कमी केला आहे ह्याचें कारण हेंच असावें कीं पुसदास कोर्ट झालें आणि तें इतकें दूर. आतां एक रुपईबद्दल फिर्याद करणें झालें तरी तंगड्या तोंडीत पावसांत चिखल तुडवीत वाशिमास जावें आणि तेथें फिर्याद करावी. कशी लोकांची सोय आहे! येथील लोक मायबाप सरकार करील तें उत्तम आहे असें ह्मणून सरकारास दुवा देणारी अशी आहे. तराही सरकार तीनकड लक्ष्य देत नाहीं!

पुसद तालुक्यांतील
एक आश्चर्य करणारा.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.—

वि. वि. येथील मु. क. संबंधानें आपल्या आज तारखेच्या पत्रांत पुन्हा एक लेख प्रसिद्ध झाला आहे त्या संबंधानें मजला दोन शब्द लिहिणें भाग आहे. आपण कृपा करून हें पत्र येत्या अंकीं छापावें.

"मु० क० स हल्लीं ४००० रुपयाची टोपी बसण्याचा प्रसंग आला आहे" ह्मणून जे आपण लिहितां ते अर्थात आपले बातमीदार गृहस्थांच्या सांगण्या वरून लिहितां हें उघड आहे. परंतु वास्तविक प्रकार तसा नाहीं. कमिटीच्या आणि पाटलाच्या हिशेबांत अंतर ८०० पासून ९०० रु. पर्यंत आहे. याहून ज्यास्ती अंतर नाहीं. आणि जरी अशी कल्पना केली कीं पाटलाकडून या रकमेचा हिशेब मिळत नाहीं तरी तितकीच रकम फार झाल्यास खर्ची लिहावी लागणार. या पेक्षां ज्यास्त नाहीं. पाटलाकडून हिशेब घेण्या विषयीं मात्र उपेक्षा करितां कामाची नाहीं.

पाटील हा कमिटीचा नोकर नव्हता हें ह्मणणें कमिटीस शोभो किंवा न शोभो तो कमिटीचा प्रत्यक्ष नोकर नव्हता व त्याजवर कमिटीचा प्रत्यक्ष हुकूम चालत नसे ही गोष्ट जिल्ह्याचे आणि तालुक्याचे अधिकारी नाकबूल करणार नाहींत.

"खरोखर नर रीती प्रमाणें कमिटी जवळ हिशेब असतां तर दर वर्षाचा आकार किती व त्या पैकीं वसूल झाला किती व राहिला किती + + वगैरे माहिती देण्याला सबब आठ महिने कांहीं नको होते" हें आपलें ह्मणणें मजला ही संमत आहे. परंतु हा वरील विधी सांगितला. वास्तविक प्रकार पहाता सर्व तपशिलवार हिशेब पाटला जवळच राहत असे कमिटी जवळ राहत नसे.

"त्याच्या (पाटलाच्या) कामाची तपासणी करणें, त्याजजवळून योग्य वेळीं हि-

शेब घेणें वगैरे "काम कमिटीचे होतें" असें आपण ह्मणतां आणि तसें कमेटीनें केले नाहीं अशी बातमीदाराच्या सांगण्यावरून कल्पना करितां. परंतु आपले बातमीदार गृहस्थ कमिटीच्या अंतस्थ व्यवस्थेचे पूर्ण माहितगार दिसतात. आपण कृपा करून त्यांना कमिटीचे दप्तर शोधण्यास आणि सन १८८२ पासून १८८७ पर्यंत पाटला कडून होत आलेल्या कामा संबंधानें कमिटींतून मे० तहशिलदार साहेबांकडेस किती पत्रें गेलीं आहेत याचा शोध करण्यास लावावें. ह्मणजे खरा प्रकार आपल्यास तेव्हांच कळून येईल.

मे. कमिशनर साहेबांच्या पत्राचें उत्तर गेल्या दिशेंबर पासून कमिटी कडून दिलें गेले नाहीं. ह्मणून उत्तर देण्यास मार्ग नाहीं असें समजत नाहीं. कोणा एका व्यक्तीस अजीबाद मोकळे ठेवण्याची आणि दुसऱ्या कांहीं व्यक्तीस दोष देण्याची बुद्धी जो पावेतों कायम राहील, खऱ्या गोष्टी जशाच्या तशा कळवून उत्तर देण्याच्या रीतीनें उत्तर पाठविण्याची जों पावेतों तयारी होणार नाहीं तों पावेतों हें पत्र असेंच पडून राहिलें पाहिजे. यांत नवल कांहीं नाहीं.

आपले बातमीदार गृहस्थ कमिटीच्या दप्तरचे पुर्ण माहीतगार असल्या वाचून मे. कमिशनर साहेबांचे पत्राची, त्या सोबत असलेल्या पत्रकाची, आणि तसेंच त्या पत्रकांतील गोष्ट कची सूध्या त्याना माहिती असण्याचा संभव नाहीं वर्तमानपत्राच्या बातमीदारास सरकारी अफिसातील कोणत्या ही प्रकारच्य शिलकी प्रकरणा[चा] खडानखडा माहीती मिळणें ह्मणजे बातमीदाराचें भाग्यच समजण्याचें त्या बातमीदार गृहस्थांचे अभीनंदन केलें पाहिजे. मात्र आपले बातमीदार कांहीं गोष्टी पदरच्या ही घालतात हे मी आपल्यास सांगतो व आपण सावधगिरीनें त्यांच्या माहितीचा उपयोग करावा इतकेंच सुचवितो.

आपल्या लेखांतील इतर कोटींचें उत्तर देण्याची मजला अवश्यकता दिसत नाहीं. ता.२२ जुलईच्या आणि आजच्या आपल्या अंकांतील आपले या संबंधाचें लेख वाचणारास सहज कळून येईल कीं, मागील कमिटीविरुद्ध जे आपले दोषारोप ता० २२ जुलईच्या अंकीं प्रसिद्ध झाले होते त्या दोषारोपापैकीं बहुतेक दोषारोप आपण आपल्या आजच्या लेखानें परत घेतले आहेत. आपलें हें सत्यप्रीय वर्तन पाहून मजला समाधान होत आहे लोभ आहे तसाच असावा ही विनंती.

आपला
देवराव विनायक

ता० १२।८।१८८९

## वऱ्हाडसमाचार.

मित्ती श्रावण वद्य ९ शके १८११

आमच्या मागील अंकांतील लेखासंबंधानें रा. सा. देवराव विनायक यांनीं पुन्हा एक पत्र लिहिलें आहे. ते दुसरीकडे जशेंचें तसेच छापलें आहे. परंतु दुःख मानण्या सारखी गोष्ट ह्मणून ही कीं रावसाहेब जी ह्मणून थोडी थोडी माहिती बाहेर काढतात तितक्यावरून आमची पूर्ण खात्री होत नाहीं. आमचे ता० २२ जुलैच व तसेंच १२ आगष्टच्या अंकांत जे ह्मणून ह्मणणें आहे कीं मु० च्या हिशोबांत घोटाळा आहे व हल्लीं मागील बाकी वसूल करण्यास कमेटीस योग्य मार्ग नाहीं तें "अंतर ८०० पासून ९०० पर्यंत आहे. याहून जास्ती अंतर नाहीं." "पाटलावर कमेटीचा प्रत्यक्ष हुकुम चालत नसे." "तपशीलवार हिशोब पाटला जवळच राहत असें कमेटि जवळ राहत नसे" "सन १८८२ पासून १८८७ पर्यंत पाटलाकडून होत आलेल्या कामासंबंधानें कमेटीतून मे० तहशिलदार साहेबाकडे किती पत्रें गेली आहेत." "आपण सावधगिरीनें त्याच्या बातमीचा उपयोग करावा" ह्या अशा कारणांनीं बदलले जात नाहीं. रावसाहेब ह्या अशा जाबजबानी व सबबिनी नायकोर्टांत कदाचित एखाद्या कैद्याला दोषमुक्त करूं शकतील परंतु आमच्या ह्या लोकमताच्या कोर्टांत या असल्या सबबी चालत नाहींत. एखाद्या शद्बाच्या अर्थावरून किंवा आकड्याच्या फरकावरून येथें दोषापासून मुक्तता व्हावयाची नाहीं. प्रत्येक दोषाबद्दल जबाब द्यावयाचा तो इत्थंभूत व पूर्णपणें दिला पाहिजे. अंतर ९०० रु० पर्यंत आहे जास्त नाहीं इतक्या वरून कमेटीचा हिशोब चोख आहे असें समजावें काय? ८०० रु. ९०० रुपयाचे अंतर असणें व तें रावसाहेबासारख्याच्या कारकीर्दींत, ह्मणजे ते कमेटीस मोठें भूषणास्पद आहे व तें कांहीं अंतर नाहीं किंवा तो घोटाळा नाहीं असें समजावयाचे काय? आमच्या मतें हिशोबांत अंतर असणें हेंच दुषण आहे मग तें थोडें कमी असले काय आणि थोडे ज्यास्त असले काय सारखेंच ४००० रुपयाची टोपी बसणार हें रावसाहेबांच्या पूर्वींच्या पत्रांतील ताजाकलमावरून लिहिले आहे.

"पाटला जवळ हिशोब राहत असें कमेटी जवळ राहत नसे" एवढ्यावरूनच कमेटीनें आपली जबाबदारी बजावली असें होते काय? कमेटी जवळ हिशोब नसे, तो कमेटीनें ठेवला नाहीं म्हणून "नसे"! किंवा कमेटीला हिशोब ठेवणें जरूर नव्हते म्हणून "नसे"! याबद्दल कोणतें कारण रावसाहेब सांगतात तें पाहूं. जरूर नव्हती असेंच जर रावसाहेब म्हणत असतील तर मग कांहींच म्हणणें उरले नाहीं. मग कमेटीचें वर्तन अगदींच योग्य होतें असें म्हणणें भाग आले.

आमच्या बातमी दाराच्या नशीबाचा किंवा आमच्या कर्तव्याचा विचार एकीकडे ठेवून व आपल्या कर्तव्याकडे लक्ष देऊन रावसाहेब या टाऊनफंडासंबंधानें तपशीलवार तारखेनिशी व कच्या हिशोबानिशी एखादे मिनीट तयार करून सर्व लोकांपुढें मांडतील व त्यांत सन १८८२ ते ८७ पर्यंत दरसाल ठराव काय झाला, त्यापैकीं वसूल किती आला, दरसाल बाकी किती निघाली, पाटलास कमिशन किती दिले व हल्लीं जी सरासरी ६००० रुपये बाकी येणें आहे ती कोणत्या कोणत्या सालाबद्दल आहे वगैरे माहिती देतील तर सरकारी गौप्य फोडल्याचा त्यांच्यावर आरोप न येतां मु. कमेटी सारख्या महत्वाच्या कामाबद्दलचे लोकांचे अज्ञान नाहींसें केलें असें होईल व तेणेंकरून मु. क. वर व तिजमुळें त्यांच्या कारकीर्दीवर येणारा दोष दूर होईल. तसेंच त्यांना वारंवार पत्रें लिहिण्याचा व कोटीक्रम करण्याचा जो वृथा त्रास सोसावा लागतो तोंहीं पण चुकेल.

जोंपर्यंत कमेटी लोकांजवळ पावत्या असून देखील वसूल मागते व आह्मी ह्मणतों तशी तपशीलवार माहिती तिच्यानें किंवा रावसाहेबांच्यानें दिली जात नाहीं तोंपर्यंत कमेटींत मागील बाकी वसूल करण्याचा मार्ग नाहीं किंवा कांहीं थोडाबहुत असलाच तर योग्य नाहीं व हिशोबांत घोटाळा आहे. हें आमचे ह्मणणें अगदीं अक्षरशः खरें आहे.

# The Berar Samachar

MONDAY AUGUST, 19, 1889

## THE LEPROSY QUESTION.

Just now the question of leprosy is attracting the attention of the public and it would be appropriate to the occasion to print an extract of a lecture given from the 'Times of India, by Dr. Bhalchandra an eminent doctor in Bombay.

The following is an abridgment of a paper read by Dr. Bhalchundra Krishna on "Leprosy in Bombay in its Medical and State Aspects," at the Grant Medical College, at the monthly meeting of the Bombay Medical and Physical Society held last week under the Presidency of Brigade-Surgeon Gray:---

The lecturer, after some preliminary remarks, and having dealt with the subject of hereditary trausmission, referred to its contagiousness:---This is the most improtant part of the subject and I propose to dwell on it at some length, especially as the public mind is greatly exercised on account of the prevailing belief in the contagiousness of the disease. In ancient times, and even in the Middle Ages, nearly all the physicians of the world, and the laity, believed in the contagious nature of; leprosy, and hence we find laws were enacted and asylums founded in order to ensure segregation and prevent the spread of the disease. The adherents of this doctrine, however, became gradually fewer and fewer as unprejudiced and impartial observations with regard to the nature of the disease gained ground. Up to about twelve years ago the old belief in its contagious nature had almost died out, when it was revived by the discovery of the *Bacillus Lepra* by Hansen. Medical men are now divided on this point: some hold that it is contagious, while others hold a contrary opinion. In all these cases "belief without evidence," says Dr. Simpson, "and assertion without facts preserve the dogma in existence." The bulk of the evidence, however, is, I think, against the doctrine of contagion. I shall now give in brief the evidence available in favour of contagion and against it. Dr. Hansen favours the theory of contagion because of his discovery of the *Bacillus*, and his observations of cases. 'This proves nothing,' "says Prof. Hirson, "as all the cases mentioned by him occurred in the endemic foci of the disease." Dr. Vandyke Carter was formerly a disbeliever in the contagious nature of leprosy. It is owing to this fact that he was able to give us a vast amount of information and to throw new light on the subject by his patient and careful study of leprosy in India. This acute observer was converted to the belief in the contagiousness of the disease by Hansen's discovery of the *Bacillus Lepra* The late Dr. Sakharam Arjun, in a paper on leprosy read in connection with the Grant College Medical Society, which I was able to read through the kindness of my friend Dr. T. B. Nariman, honorary secretary of the Society, expressed himself in favour of contagion. An eminent writer in the *Lancet* of June 29th, 1889, has givin some instances in support of the theory of contagion. A striking instance is givin by Dr. Zoriaga, which occurred in a village in A licante. A leper came in 1850 and lived with a friend in the closest intimacy, who soon showed the symptoms of the disease. And from these two nineteen other cases of friends and relations, who closely associated with them, became lepers, and in 1880 no less than sixty cases altogether have occurred in the same village which had formerly been free from it. In 1885 Dr. Arning, of the Sandwich Islands, inoculated a criminal condemned to death. In 1888 this man was without doubt an advanced leper. In 1872 Dr. Benson recorded the case of a man who contracted the disease in India, which developed in Dublin. His brother who had never been out of Great Britain wore the lepers clothes, and shared the same bed, and subsequently developed the disease. I shall attempt an explanation of these cases further on. The evidence against the contagion is, I believe, overwhelming. In 1862 a number of representations were addressed to the Duke of Newcastle to enactlegislative measures on the subject of leprosy. His Grace thought that a proper medical investigation was essential to arrive at a correct decision on the subject, and in view of it requested the Royl College of Physicians to collect, collate, digest, and report upon whatever informations could be got from the world, and particularly from the British Dominions. Immediately an influential committee was appointed, who prepared a series of interrogations, eighteen in number, and amongst which the greatest stress was laid on contagion. These questions were approved of and were forwarded to various British Colonics and elsewhere. I give below a short extract from the memorandum prepared by the Committee, and approved by the College:- "The Committee, having carefully considered the replies recieved, are of opinion that the weight and value of the evidence they furnish is very greatly in favour of the non-contagiousness of leprosy; that a large majority of the reporters considered the disease to be non-contagious, or non-communicable to healthy persons by proximity or contact; that the replies already received contain no evidence that in the opinion of the Committee would justify any measures for the compulsory segregation of lepers." Amongst these opinions, and out of the several that were sent from the Bombay Presidency, was Dr. Vardyke Carter's opinion. He says, "I have not met with any evidence of the contagious nature of leprosy such as would bear sifting, and then be conclusive." This same observer in 1884 writes a communication to the Journal of our Society, and draws his conclusions from Dr. Hansen's observations, and then suggests that *segregation* would be one of the ways of ameliorating the condition of the sufferers and probably of checking the progress of the disease. "The position which this disease now holds in the nomenclature of the College of Physicians," says Dr. Aitkin, "implies that it is of a constitutional development, a theory which is now more generally accepted than the belief in the propagation of the disease by contagion." "The evidence," says Dr. Tanner, "is said to be conclusive that leprosy is non-contagious." Dr. Hirsch, Professor of Medicine in the University of Berlin, in his Hand book of Geographical and Historical Pathology, published in 1885, say: "That so far as its appearence is concerned in different localities and amongst different person it is of an endemic nature and purely hereditary." "The contagious nature of leprosy," says he "is not proved. I am nevertheless unable to share the opinion

of those who have drawn conclusions and particularly from the parasitic character of the disease, as to its contagiousness, and have thereby sought to rehabilitate a notion that has almost been abandoned and condemned." He gives some positive facts in support of his arguments:...

*First*...Danielson and Hansen tried experiments upon rabbits, rats, mice, guinea pigs, and monkeys, and faild to inoculate them.

Second— Davidson of Madagascer, says, " Leprosy is contagions by inoculation only." He has, however, omitted to mention on whom inoculations were made and how they were made.

Third— Eqally indecisive are the data of those observers who refer the outbreak of the disease in the Western Hemisphere to the Negro importation, for all the recent observers in those countries deny most emphatically that leprosy is oontagious at all.

Fourth— If Negroes introduced leprosy in South America and West Indies it is difficult to understand why Central America and the United States where there has been no lack of Negro importation,, have remained exempt from the disease.

Fifth— Even cases where Europeans have acquired the disease after coming into close connection with lepers cannot be regarded as giving proofs of the contagiousness of the disease, for Europeans belong to the endimic area of the disease. " My conviction is " says the learned professor, " that there is not a single fact which tells decisively and indisputably for the conveyance of the disease by contagion. On the other hand facts are very materially against the notion of contagion, inasmuch as they entirely fail to accord with our whole experience of the mode of diffusion of the true contagious diseases. " These facts may be tabulated as follow:—

( 1 ) The extremely narrow limitation of leprosy in certain centres while there is free communication between their inhabitants and the neighbouring population with such sanitary conditions as would especially favour the conveyance of the disease.

( 2 ) The observation made, not unfrequently, of the malady being confined at certain places with a mixed population, to particular races or nationalities notwithstanding unrestricted social intercourse throughout the community. On this point Uhliq. says, "Since I have been resident at the Settlement of Batavia, near which there are 500 Indians living, I have seen some of the latter coming here every day or leprous persons going to them, they eat and drink together out of the same vessels, th[illegible] house together, they wear each other's clothes, and what is more remarkable they smoke the same pipe or the same cigar, passing it from one mouth to another, and no one declining to take it. This relationship has subsisted as long as the Settlement itself, that is to say, for upwards of forty years, and yet no Indian has been infected with Leprosy."

( 3 ) The fact that in innumerable cases the acquiring of leprosy by one member of a family has led to no other outbreaks in that family, and that too under insanitary conditions which must have been quite peculiarly favourable to its conveyance. Wortabet of Byrout ( Syria ) mentions a case in which a leprous woman lived for many years with her husband and children, doing all the house hold work ( cooking, washing, and the like ), and yet the husband and children continued in good health. And what is more interesting is a fact given by Manget, a believer in the contagiousness of leprosy of leprosy, who is constrained to say, " I have known instances ( in Guiana ) where black women have cohabited for years with their husbands while labouring under confirmed and ulcerative leprosy, and have children by them, without manifesting the slightest trace of the disease. " Also there are accounts by Plancks, of the North-West Provinces, stating that " where leprous men had married two or three wives, not one of them had become infected."

(4) There has never been a case known in which the physicians or nurses or ward attendants of a leper house have caught the disease although they mix with the patients without restraint, dress their sores, and sometimes wound themselves in so doing. Browne from Barbadoes writes, 'none of those in attendance, during the last nine years, upon the inmates of the lazaretto have contracted the disease; and I after receiving a wound from a knife moistened with the fluids of an inmate, have escaped, although the wound was followed by great constitutional irritation and loss of the finger.' Sir William Moore, late Surgeon General to the Bombay Government, in his able lecture delivered in London some time ago, says that a student at the Grant Medical College got a dissecting wound while dissecting the body of a leper, and developed leprosy. I am afraid sir William has been misinformed. Dr. Kunte told me that the student in question, on getting a dissecting wound from a leprous body instead of applying carbolic acid lotion poured strong carbolic acid over the finger, which produced gangrene and the finger bad to be amputated. Sir W. Mooro refers also to the case of Father Damien and says that he must have accidentally injured himself and thus developed the desease. In the absence of a clear history and facts of the case I am unable to pronounce an opinion. But I would ask one question, whether he did not belong to a country where the disease was endemic? To refer to some more instances in Bombay, none of the Do[illegible]ors in charge of the lep[illegible] ward of the J. J. Hospital have taken the disease. Dr. Car[illegible]er although exposed to leprous poison during his investigations did not get it. The late Dr. Sakharam Arjun, who was in charge of the leper ward for a number of years did not show any signs of it. None of the ward boys who came in contact with the sufferers have ever been known to be affected by it. Instauces of medical men abroad and in India having wounded themselves in the dissection of lepers are recorded but without any bad results.

(5) No cases have come to light hitherto, in which the disease has spread from the leper houses to residents outside. The lepers of the leper hospital of Bergen have had unrestricted intercourse with the town, but the disease has not been communicated to any of the townspeople. There are two chawls in close proximity to the J. J. Hospital leper ward for many years, but there has not been a single case of any of their inhabitants having taken the disease, nor has it been known to spread to the adjoining very thickly populated part of the town.

(6) Lastly, among the numerous cases of leprosy in persons who had acquired the disease in leprous districts: not one has ever been the occasion of the disease spreading in the immediate neighbourhood on their going to live in another district.

Dr. Day, of Calcutta, who has made leprosy his special study, has written to the *Indian Mirror*, stating that he does not believe in the contagious nature of leprosy.

The latest literature on fhe subject to hand are notes on acquired leprosy in England f[illegible] the pen of Mr. Jonathah Hutchinson in the *British Medical Jornal* of June 29th, and a leader in the *Lancet* of the same date. Mr. Hutchison does not believe in the contagion theory. He believeis more in a peculiar specific poison taken with food as I remarked above. The eminent writer in the *Lancet* seems to be more fair minded, and has taken an unbiassed view of the subject. He says, "the discovery of the *Bacillus Leproe* by Hansen has greatly strengthened the belief in contagion. This Bacillus has never been found in any other disease or condition than leprosy, while it has invariably been found by competent observes in the skin of tuberculated lepers from all parts of the world. In the non tuberculated cases, on the other hand, it is invariably absent in all the sores in the diseased nerves. But it has been found in the nerves themselves, when the discase is not of too old a standing, and in those skin lesions of mixed nerve and skin leprosy not dependent upon disease of the nerve trunks. This goes far to explain the non transmissibility of nerve leprosy. The evidence on the whole then is strongly in favor of the disease being communicable but all are agreed that it is only so in the *ulcerating stage* of fhe *tubercular* or the *mixed form* by inoculation of the pus on an abraded surface either directly from the patient or the stained clothing or other objects contaminated by the secretions from the leprous sores. It is certainly not communicable by aerial infection in the same way as small pox or other exanthemata.'

This seems to me to explain satisfactorily the reasons why some observers found cases which convinced fhem of the contagious nature of the disease, while others met witn some which did not show any contagious nature. It also explains the three cases which I have mentioned above, as on no other hypothesis can they be explained.

The scare of infection and contagion has spread so widely that the public has been led into false beliefs. I cite two instances in support of this. My friend, Surgeon Major Parakh, told me of the case of a Eurasian boy who had the misfortune to have a small leprous spot on his face. In pursuance of the prevailing false opinion the authorities expelled him from the school which he attended, with a view to avoid contagion. The boy went to live with his grandmother, who was living within the G. I. P. Railway premises.. The Railway authorities expelled the old lady and the boy on the same grounds. Another case occurred in my owon practice. A patient affected with leprosy for the last fifteen years came here for treatment and took up his quarters in a gentleman's house. The ladies of the family and another lady from Sholapore, who had come here for her child, asked me if the disease was infectious and contagious, and that, if so. they would run away to Poona, as the owner of house who himseff was disbeliever in the contagious theory, and who had attended his leprous father and dressed his sores would not yield to their entreaties. I calmed their fears and told them that as patient was kept in a detached portion of the house they had not to come in contact with him, and stood in no danger of catching the disease. I have mentioned these cases to show what effect the present agitation and excitement have produced on the public mind.

The pathology, Morbid anatomy, diagnosis, and treatment of leprosy were next gone into.

He next passed on to give a short account of the existing Leper Asylums of the Bombay Presidency, and then concluded his paper as follows:...

"After a careful consideration of the facts and figures given above, I feel that I can safely draw the following conclusions:

I. That leprosy is prevalent throughout India, but satisfactory statistics are wanting to show both the increase and decrease. II. That it is endemic III. That the weight of evidence is in favour of its hereditary transmission. Iv. That of the three forms of the disease, the non tuberculated or ancesthetic form is most prevalent in India. V. that the weight of evidence is not in favour of the contagiousness of leprosy generally, and particularly of the anæsthetic form, and the tuberculated and mixed forms in their ealy stages; but, there is some evidence in favour of the latter two being communicable in the ulcerating stage by inoculation of the pus on an abraded surface, either directly from the patient or by the stained clothing or other articles contaminated by the secretions of the leprous sores. VI That it is not communicable by aeril infection in the same way as small pox or other exanthemata are. VII. That the tuberculated and mixed forms, can communicable in their ulcerating stages, may be so in the same way as syphilis is, the period of incubation being long in these, while in syphilis it is short. VIII. Granting that the snberculated and mixed forms are contagious in their later stages, still it does not follow that every case of leprosy, indiscriminately, is contagious, IX. That the diagnosis of the disease is not always easy, especially in its early stage. X. That no satisfactory treatment of leprosy has yet been discovered, XI. That segregation of the lepers has been found to exercrcise some wholesome check on the propagation of the disease but not to the extent of stamping it out.

XII. That the present excitement or the scare which has taken possession of the public mind is groundless.

XIII. That a sober, quiet, unbiassed and scientific investigation of the subject is an absolute necessity, which will help the medical profession and the State to grapple with the problem more effectually.

Viewed by the light of these conclusions, " *The Draft Leper Bill* " circulated by the Government of India for the opinion of the local Governments seems to be a desirable measure in so far that when it becomes an Act, it will serve pre-eminently to calm the public mind which has been exeited to the highest pitch, because it will be the means of removing vagrant lepers from the public gaze, but whether it will serve to stamp out the disease I am not sure. In its present form, however, in my humble judgment, there are some objecttionable features in the Bill which, if allowed to remain, will defeat the object of the Government:— (1) It is assumed in the Bill that every case of leprosy is contagious. [2] The diagnosis of leprosy is left to medical men of all discriptions whether qualified or unqualified, to pronounce a correct opinion, (3) A powerful engine of oppression will be left in the hands of the police. (4) The Bill seeks to treat lepers as criminals.

As regards the first objection, I have mentioned that the non-tuberculated form is not contagious, nor the tuberculated and mixed forms in their early stages; but they may be so perhaps in their ulcerating stages; and that the non-tuberculated or the anÆsthetic form is most prevalent in India. Hence every case is not contogious and some modification is necessarily required in the use of the word " Leper " as used in sub-section 1 under the definitions of the Bill.

The second objection is graver still: in sub-sections I. under " definations " the term mdical 'practitioners" is used; this apparently includes medical practitioners of all kinds. I have discussed the question at length under the heading of Diagnosis. What hardship will then be entailed upon helpless people? A poor person may thus be confined, although not suffering from true leprosy, and simply through the mistake of

मुंबईंतील फोर्ट मार्केटांत एक ब्राम्हण येऊन दुकानदारजवळ २०० केळी व ९० काकड्या मी खाऊ शकतो असें म्हणूं लागला. दुकानदारांनीं त्यापुढें त्या जिनसांच्या पाट्या ठेवल्या. स्वारीनें दिडशे केळी व ३९ काकड्या सव्वा तासांत पारकेल्या. परंतु एक गृहस्थानें हा खाऊन मेल्यावर ती तोहमत तुमच्यावर येईल असें त्या बागवानांस कळवितांच त्यांनीं त्याज पुढच्या पाट्या बळेच उचलून घेतल्या.

बुखारा शहरीं इतकी उष्णता गेले आठवड्यांत भासली होती कीं ३ दिवसांत उन्हाचा ताप बसून ७०० लोक मरण पावले.

गेले जून महिन्यांत ७३६७१०९ रुपये किमतीचा कापूस मुंबईहून विलायतेस रवाना झाला.

सरकारी गुप्त कागद पत्र छापण्याच्या संबंधानें विलायतेस जो कायदा आहे तोच हिंदुस्थानांत सुरू होणार अशी बातमी आहे.

मुंबईच्या पारशांनीं इराणच्या शहास हिंदुस्थानास येऊन जावें अशी विनंती केली आहे.

बंगलोर व म्हैसूर पर्यंत स. म. रेल्वे सुरू झाली.

विजेच्या दिव्याचा प्रकाश अकरा मैलपर्यंत जातो.

हिंदुस्थानांत एकंदर सात लाख कोड भरलेली माणसें आहेत.

पाटणा येथें दुष्काळानें ९० हजार लोक उपाशी मरत आहेत.

दारूच्या भट्या कमी करा॰या— सेक्रेटरी आफ स्टेट यांजकडून बंगाल सरकारास एक्साइस संबंधानें जो नुकताच खलिता आला आहे त्यांत असें फर्माविलें आहे कीं दारूच्या भट्याची संख्या जितकी कमी होईल तितकी करण्याकडे लक्ष द्यावें

सेमफ्टी मॅच् पुढील रीतीनें तयार केलेली एक नवीन पेटी निघाली आहे. या काड्या पाराफिन मध्यें बुडवून वाळवितात. नंतर कारटे आफ् पोट्याश सल्फाइड आफ आंटिमनी कांचेची बुकणी आणि डिकाचें पाणी यांचे लुकणाची त्या काड्यास बोर्डे करितात. आणि ज्या कागदावर या ओढल्या म्हणजे त्या पेटतात. त्या कागदास तांबडा फास्फरस आणि कांचेची बुकणी लाविलेली असते.

मध्यप्रांत कापसाची स्थिति. आहे गुदस्त साला पेक्षां ज्यास्त पेरा गेला आहे.

न्या० सिं०

यंदाच्या राष्ट्रीय सभेंत १००० शवर ज्यास्त मंडळी दाखल करूनये असा विचार घाटत आहे. येथें आमची सुचना आहे कीं आजपर्यंत खोगीर भरती झाली ती ठीकच झाली पण या पुढें जे डेलिगेट दाखल करावयाचे ते इंग्रजी ज्ञानरहित तरी असूनयेत.

मा० मि०

हिंदुस्थान सरकारानें नॉर्थ वेस्टर्न रेल्वेच्या डैरेक्टरास वर्तमानपत्रांच्या बातमीदारांस पास देण्याचा अधिकार दिला आहे.

क० त०

श्री. गायकवाड सरकारचे प्रायव्हेट सेक्रेटरी, मि. पेस्तनजी दोराबजी खंडाळेवाला, हे पारिसचें प्रदर्शन पाहण्यास जाणार व तें झाल्यावर ते तेथें कांहीं युरोपियन भाषा शिकण्याकरितां राहणार असें ह्मणतात.

इंग्लिश व दरवेशी लोकांची टोस्की येथें लढाई होऊन दरवेशी लोकांचा अगदीं मोड झाला व सुमारें १००० लोक हस्तगत झाले असें कळतें.

क्रीटमध्यें सर्व ख्रिश्चन लोक एक होऊन मुसलमाना विरुद्ध वर्तन करीत आहेत याचा काय परिणाम होईल कोणजाणें.

बंदुकीच्या गोळ्या विजेच्या योगानें उडविण्याचा प्रयत्न चालला आहे.

काश्मीरचे महाराज पांडेचरीस जाऊन रहाणार असें ह्मणतात. सु. प.

खडकीच्या बराखात एक सार्जन्टस प्रेस बांधण्या करितां पाया खणींत असतां एक प्रचंड भुयार सांपडलें आहे. तें भुयार फारच जुनाट आहे तथापि इतकें बळकट आहे कीं, त्याची एकेक वीट काढण्यास निदान तीन तास लागतात! हें भुयार पाहण्याकरितां पुष्कळ गर्दी जमत असते असें आमचा बातमीदार कळवितो.

बडोदे येथें शिर्से तलावावरील ओंकारेश्वरावर मंदिरासमोर एक मोठा वटवृक्ष असून त्याच्या शाखा नजिकच्या एका झोंपड्यावर आल्या आहेत. दोन दिवसांपूर्वी या वृक्षावरून अर्धा तासपर्यंत लाह्यांची वृष्टी होत होती! शेंकडों लोकांची गर्दी पहाण्यास जमली होती असें आमचा बातमीदार कळवितो.

पु० वै०

इराणच्या शहाप्रमाणेंच जर्मन बादशाहाबद्दल विलायतेंतील पत्रें कुबष्टेचे लेख लिहित आहेत.

ईजिप्तमध्यें कापसाचें पीक चांगलें आहे असें ह्मणतात.

असिनारा नांवाचें बेट इताली सरकारानें आपल्या ताब्यांत घेतलें.

क्रीट बेटांतील रशियन प्रजेबद्दल संरक्षणाची हमी टर्कीनें घेतली पाहिजे असें रशियन सरकारानें टर्कीस कळविलें आहे.

मार्किस आफ लार्न यास ड्यूकची पदवी देण्याचें महाराणीनें ठरविलें होतें पण मला ती पदवी नको असें मार्किसनें सांगितलें. कोरड्या पदवीसाठीं हापापलेल्या हिंदुस्थानांतील नेटिवांत असा एखादा तरी सांपडेल काय?

मोरचे महाराज रामेश्वराच्या यात्रेस निघाले आहेत क्राफर्ड प्रकरणांत जें पाप झालें त्याच्या क्षालनार्थ कीं काय?

यक्रेटीज नदीच्या खालच्या प्रदेशांत पटकी सुरू झाली आहे. येमन येथेंही रोगाची सांथ आली आहे व त्यामुळें त्या प्रदेशांत १० दिवस कोणी येऊं नये असें त्या सरकारानें फर्माविलें आहे.

पासिफिक समुद्रांतील फिनिक्स नांवाची बेटें इंग्रज सरकारानें खालसा केली आहेत. तेथें तारायंत्र स्थापन करावयाचें आहे असें कारण दाखविण्यांत आलें आहे, बरें आहे

नेटीव सैन्याची सुधारणा करणार मे. मेलिस हे इतक्यांत पुण्यास येणार आहेत.

हिंदुस्थानांतल्या इंग्लिश सरकारास हल्लीं प्रतिवर्षीं दारूवरच्या करापासून चार पाच कोटी रुपये उत्पन्न होतात! प्रजेच्या दुर्व्यसनापासून राजानें पैसा मिळवावा हें किती विलक्षण आहे.

गुलाबाचें एक फार जुनें झाड जर्मनींतल्या एका देवळाच्या आवारांत आहे. त्याचें खोड मनुष्याच्या आंगाएवढें जाड झालें आहे. ठा, अ.

विलक्षण एकपाठ्या—३६००० शद्बांची मालिका—तींत नानाभाषीय शद्ब घातले असून व कांहीं शद्ब अवघड असतांही एकदां ऐकून बिनचुक ह्मणणारा मनुष्य पडुआ येथें आहे. या शद्बाची तो उलटी सुलटी आवृत्ति करतो मग एक शद्ब टाकून एक ह्मणतो.

अमेरिकेंतील ऐरिश लोकांनीं कट केला आहे कीं ज्या खाणावळींत इंग्रजी माल वापरीत असतील त्या खाणावळींत जायचें नाहीं.

छत्तीसगड तालुक्यांत वाख्याचा उपद्रव उद्भवला ह्मणजे कोणीएका नांवाजलेल्या चेटकीस पकडून तिला खूप मार देतात. एकदां असें घडलें कीं गांवांतील सर्व स्त्रियास बाहेर बोलावून त्यांस खूप मार दिला त्यांत एक बाई मेली.

“हिंदुस्थानची प्राचीन सुधारणा” या ग्रंथांत दत्त साहेब त्याचे कर्ते असें लिहितातः— “त्या वेळीं मांसाहार करीत असत. गाय व बैल यांवर नेहमीं झोड पडे. ऐतरये ब्राह्मण अध्याय एक ओवी १९ यांत लिहिलें आहे कीं राजा किंवा कोणी सत्पात्र ब्राह्मण आला असतां बैल किंवा वांझी गाय मारीत. ( उत्तर रामचरित्र नाटकांत हाच प्रकार वर्णिला आहे.) कृष्ण यजुर्वेदाच्या ब्राह्मण शाखेंत मेध करायला योग्य कोणतीं व कशाप्रकारचीं जनावरें असलीं पाहिजेत याचें चांगलें स्पष्टीकरण केलें आहे. अश्वमेधाला १८० पाळींव जनावरें लागत, त्यांत घोडे, पोळ, गाई, बकरे, हरीण यांची कत्तल होत असे. कोणी कोणता भाग खातो हेंही त्यांत सांगितलें आहे. मान, बाहू, कटी व तंगड्या ह्या आचार्यांच्या वाट्यास जायच्या; मांसाचा भाग तितका यजमानाकडे आणि शेष राहिलेला यजमानणीस मिळावयाचा हें मांस घशाखालीं ढकलण्याकरितां सोमरसाचे पेल्यावरपेले झोकीत असत. शपथ ब्राह्मण अध्याय ४ ओवी ९ यांत वंध्यां गाईस कशी कापावी व तिला कशी शिजवावी याबद्दल इत्यंभूत हकीकत दिली आहे. तिसऱ्या अध्यायाच्या १-२ व २१ साव्या ओवींत गोमांस इष्ट किंवा बैलाचें मांस खाणें चांगलें या विषयीं बराच वादविवाद आहे. परंतु निर्णय ह्मणण्यासारखा झाला नाहीं. आचार्यांनीं गोमांस पाहिजे असल्यास खावें इतकेंच स्पष्टीकरण केलें आहे. परंतु यज्ञवल्क्य ऋषींनीं व्यवहार दृष्टी देऊन गोमांस मृदु असल्यास पाहिजे तर खाईन असें बोलून गेले.

बिलंदर चोर—रेलवेची गाडी चालूं असतां वर चढायाचें व बायकांच्या गाडींत शिरून त्यांचे दागिने हिसकाऊन घेण्याचें बाडशी कृत्य हल्लीं पंजाबांत कांहीं चोरट्यांनीं चालविलें आहे.

नारळीची लागवड नेहमीं हितावह असते. या लागवडीपासून नुकसान झाल्याचें ऐकिवांत नाहीं असें लंकेचे लोक ह्मणतात.

जुगार खेळणें हा गुन्हा आहे असें ख्रिस्ताच्या पुस्तकांत कोठें ह्मटलेलें सांपडत नाहीं असें क्यानन फेरर ह्मणतात.

ह्मांटी बेटांत लेजिटिन सेनाधिपती हे बायकांना शिपायाप्रमाणें हत्यारबंद करीत आहेत.

कानांत गोम गेली असतां टरपेनटाईन आंत घालावें, ह्मणजे ती बाहेर येते.

जपानच्या बादशहाच्या महालास ८० लक्ष रुपये खर्च लागला. आंतलें सर्व सामान सुमान जर्मनीहून तयार करून आणलें आहे.

एका वैद्यानें मनुष्यकृती लांकडी यंत्र तयार केलें आहे. त्याच्या पोटांत सर्व रोगांचीं खातीं केलीं आहेत. रोग्यानें आपल्यास होत असेल त्या रोगाच्या पाळीवर पैसे नेऊन ठेवावे; ह्मणजे गोळ्या किंवा पुड्या बाहेर येऊन पडतात.

भयंकर रीतीनें जीव घेणें—क्यांटन येथील फांशीची भयावह हकीकत छापली आहे. मुंग्यांच्या वारुळा पाशी एका कैद्यास उभा गाडला त्याचें तोंड बांधून त्यांत पहार घातली. मग त्याच्या तोंडाला व डोक्याला चिकी थापली व कांहीं त्याचे घशांत ओतली. इतक्यांत मुंग्यांच्या झुंडीच्याझुंडी त्याचेवर येऊन पडल्या व त्याचे डोक्यांत, नाकांत व घशांत गेल्या त्याच्या यमयातना त्यालाच माहीत तो तीन दिवस अशा स्थितींत जिवंत होता. कोण राक्षसी प्रकार हा!

महाराणी साहेब शेतकी करितात व त्यांस जमिनीचा सारा द्यावा लागतो. शेती काम त्यांस त्यांचे भ्रतारांनीं शिकविलें. के०

सन्याशी, फकीर, साधू— अशी एक बातमी उठली आहे कीं, सन्याशीं साधु फकीर वगैरेच्या रूपानें सरकारी पोलीस हेर हे राजकीय संबंधानें खटपट करणारे देशहितेच्छु लोकांमध्यें हिंडतात. आणि त्यांच्यापाशीं रशिया व इतर महत्वाच्या विषया संबंधानें भाषणें करितात. व लोक त्यांच्याशी जे बोलतील तें तें सर्व सरकारांत कळवितात.

— पटाईत खिसे कातरू— प्रशियामध्यें खिसे कातरू देखोल अगदीं पटाईत आहेत. नुकताच न्यूपार्क येथील एक डिटेक्टिव पोलीस पारिसच्या प्रदर्शनांत गेला होता. तो सहज बर्लिन येथें गेला. तेथें एका अट्टल खिसेकातरूनें त्याच्या खिशांतून रुपये ( नाणें ) नोटा, कामाचे कागदपत्र सर्व त्याला न समजूं देतां काढून घेतले; यांत विशेष एवढेंच कीं, हा स्वतः अट्टल डिटेक्टिव होता. तरी त्यास अट्टल खिसेकातरूनें फसविलें.

दो० बं०

एका रोग्याची बाजू कापून आंतील फुफ्फुस कसें काम करीत आहे हें नुकतेंच पाहण्यांत आलें. त्याचप्रमाणें पक्षांचें बुबुळ काढून तें मनुष्याच्या डोळ्यांत बसविलें. आठ दिवसांनीं त्याचा आकार आपल्या डोळ्यांतील बुबुळासारखा वाटोळा व त्याचा रंगही स्वच्छ झाला.

मुंबई.

हवा— झाडवाल्यांच्या कटामुळें सर्वत्र कचरा सांचून व सडून हवा बरीच दुर्गंध युक्त झाली आहे. बुधवार पासून पावसानें परत मनावर घेतलें आहे. महामारीची साथ समूळ नाहींशी झाली नाहीं. पाणीमुळें तिला उत्तेजन मिळालें आहे तापाची साथ बरीच आहे. ते० मि०

---

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “वऱ्हाडसमाचार” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास..........................=४

नोटीशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस =१=६
दुसरे खेपेस ..........=१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10 .. 4 as
Repetition perline 3as

THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII — AKOLA MONDAY 26 AUGUST 1889 — NO. 33

वर्ष २३ — अकोला सोमवार तारीख २६ माहे आगष्ट सन १८८९ इ० — अंक ३३

## गृहीणी

( कुलवधूंच्या ज्ञानवर्धनार्थ व मनोरंजनार्थ मासिक पुस्तक. )

ह्या मासिक पुस्तकाचें आजपर्यंत पंचवीस अंक निघाले व एप्रिल महिन्यापासून तिसऱ्या वर्षास आरंभ झाला. यांत स्त्रियांची चरित्रें, नीति, आरोग्य, पाकशास्त्र, शिवण काम व स्त्रियांस इतर अवश्य वाचण्यालायक अहेषयांचा समावेश केला जातो. याची सालिना वर्गणी मुंबईंत १॥ व बाहेरगांवचे वर्गणीदारांस टपाल हं. निराळे ३ आणे पडतील.

विशेष सूचना गरीब शिक्षक लोकांस हें मासिक पुस्तक ट. ह. सह एकरुपयास दिलें जाईल.

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं पैसे व नांवें खालील पत्यावर पाठवावींत.

वर्गणीदार मिळवून देणारांस योग्य कमिशन दिलें जाईल.

पांच प्रती एकदम घेणारांस एक अंक फुकट दिला जाईल.

म्यानेजर गृहिणी,

## गरमीचे रोगावर औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोपेंत व मुत्र समई पतन होते-परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात हा रोग ज्यांस आहे त्याणी अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

## अन्न पचन होण्याचे औषध

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमुत्र साफ होत नाहीं. पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन जळजळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेम पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्याणी पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डाक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

( विक्रीस तयार. )

## श्रीदत्तपदामृत संजीवनी.

या पुस्तकात श्री नृसिंहवाडी व गाणगापूर येथें श्री पादुकापुढें भजनाचे वेळीं उपयोगांत आणितात तीं अनेक चालीचीं पदें, सेजारती पूर्वी करावयाचें ध्यान, पादुकांच्या प्रदक्षणेचीं पदें, पादुकांची प्रार्थना, पादुकांपुढें म्हणण्याचीं अष्टकें, नमस्काराष्टक, धांवे, आरती ध्यानाष्टक, क्षरनाष्टक, सेजारती नंतर म्हणण्याचीं पदें, अभंग, पादुकांचो स्तुतिस्तोत्र, सेजारतो, काकडारती, भुपाळ्या वगैरेचा समावेश केला आहे. या पुस्तकाच्या आजपर्यंत ५००० पर्यंत प्रती खपल्या. किंमत दर पुस्तकास =६ आणे व टपाल खर्च ==६ पाठविली असतां तावडतोब पुस्तक रवाना करूं.

## श्रीदत्तपद बोधिनी.

अलिकडे श्री गुरुमहाराजांनीं रा रा. गोविंद रघुनाथ रनवडे स्कुल मास्तर हवळी यांच्या हृदय मंदिरीं वास करून त्यांचे कडून ६४ पदें करविलीं तितक्याच पदांचा हा प्रथम भाग करून छापिला आहे. जर हा ग्रंथ प्रसिद्धीस येऊन सकल जनांस प्राप्त होइल तर ते हा भक्तिपुरःसर अवलोकन करून किती आल्हाद पावतील हे सांगावयास नकोच. हीं ६४ पदें छापून झाल्यावर श्रीगुरुचरित्रांतील अध्याय १३-१४ यांतील सायं देवख्यान व दुष्टयवनशा सनाख्यान अशीं आख्यानें कविता बद्ध लिहिलीं आहेत किंमत टपाल खर्चा सुद्धां =७ आणे

वरलिहिलेलीं पुस्तकें ज्यास पाहिजे असतील त्यानीं किंमतीबद्दल मनिऑर्डर किंवा रोख पैसा पाठविला असतां तावडतोब रवाना करूं. व्हाल्युपेबलनेंही पाठवूं.

विठ्ठल गोविंद राणा वगीकर वेंगुर्लेकर
बुक सेलर मु० वेंगुर्ले जि० रत्नागिरि

राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.

हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.

सन १८७२ चा ९ वा.

समजूतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टांचे निवाड्यांसुद्धां किंमत रु० २॥ व टपाल खर्च =६ आ.

## पत्रव्यवहार

ह्या मथळा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजुं नये.

Bassim 19-8-89

To the Editor Berar Samachar
Sir—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० चार पांच दिवसांपासून महामारीचा उपद्रव कमी झाला आहे. अगदीं जरी निर्म्हाड उठलें नाहीं तरी कमी झाल्यामुळें आतां लोकांची भीति कमी होऊन लोकांच्या मुखांवर टवटवी दिसू लागली आहे. मार्च महिन्यांत हा उपद्रव येथें सुरू झाला तेव्हांपासून कमी जास्त मानानें आजपर्यंत याचें येथें वास्तव्य असल्या कारणानें लोकांनीं तळण्या पोळण्याचेंही सोडून दिलें होतें. अन्न पोटभर खाणें ही कोणाला बरें वाटेना. एकूण जिवाच्या भितीनें लोक अगदीं वाळून गेले होते. परंतु ईश्वर कृपेनें आतां तळ उठल्यासारखा झाल्यामुळें आनंद वाटत आहे. ईश्वरा आपल्या बालकांना विघ्नापासून सुखी राख. पाऊस आजपर्यंत अत्युत्तम प्रकारें लागत असून शेतीची स्थिति उत्तम प्रकारची आहे. मघा नक्षत्राचा प्रवेश झाल्यापासून पाऊस एकसारखा लागत आहे. व धान्यें भिजून वगैरे पडण्यास हळू हळू सुरवात होत आहे. पाऊस आतां आठ चार दिवस उघाडी देईल तर बरें. नाहींतर शेताचें नुकसान होण्याचा संभव आहे.

आमचे जिल्ह्याचे इंग्रजी वकील रा. रा. यशवंतराव दिगे हे सरकार तर्फे सेशन मुकद्दम्याचें काम चालविण्या करितां निमित्य व रून ते काल रोजीं रात्रीं टांग्यानें अकोल्यास गेले. मि. दिगे आपल्या कामात चोख असून स्वभावानें साधे असल्या कारणानें ह्या जिल्ह्यात सर्वांना प्रिय झाले असून ते सरकारी कामगारांना ही उत्तम प्रकारें आवडतात. ह्या यांच्या चांगुलपणा बद्दल ते लोकांच्या अनेक प्रकारें स्तुतीस पात्र आहेत. आजपर्यंत सेशन मुकद्दम्याचा निकाल करण्या करितां मे जु. कमिशनर येथें येत असत. परंतु नवीन जु. स्कीम अंमलांत आल्य मुळें पूर्वीची चाल बंद होऊन आतां सेशन मुकद्दमें आकोल्यास ठरावयाचे ठरल्या कारणानें ह्या जिल्ह्यातील दोन सेशन मुकद्दमे आकोल्यास ता० २०।२२ रोजीं चालावयाचे आहेत. नवीन स्कीम मध्यें पूर्वीपेक्षां लोकांच्या कांहीं विशेष सोयी होतील असें वाटलें होतें. परंतु येथील सेशनचे मुकद्दम आकोल्यास जावयाचें असें ठरलेलें पाहून मोठें आश्चर्य वाटतें स्कीम आमलांत येण्यापूर्वीं लोकांना असें वाटत असे कीं ह्या स्कीम पासून अनेक प्रकारें फायदे होतील. परंतु हें केवळ स्वप्न असें लोकांना वाटून स्कीम आंमलांत आणिल्या पासून त्या स्कीम बरोबर येणारीं दुःखें मात्र लोकांना दिसूं लागलीं आहेत. एकूण स्कीम ह्मणजे डोंगर पोंखरून उंदीर काढिल्या सारखें दिसू लागलें आहे अकोल्यापासून पुसद चाळीस ४२ कोस आहे. उमरखेड ५५।५७ कोस आहे. इतक्या लांबून अकोल्यास जाणें तशांत पावसाच्या दिवसांत. ह्मणजे किती प्रयासाचें काम आहे याचा विचार योग्य अधिकाऱ्यांनींच केला पाहिजे. येथून दोन सेशन मुकद्दम्या करितां नर पावसांतून कैदी आकोल्यास नेणें किती त्रासाचे आहे याचा विचार जरूर झाला पाहिजे. पोलिसाला त्रास, कैदी लोकांना त्रास, साक्षीदार लोकांना त्रास, कैदी लोकांच्या आप्तांना त्रास, असा कित्येक लोकांना त्रास झाला. स्कीम अमलांत आणण्या पुर्वीं याचा विचार होणें योग्य होते. तरी अजून वऱ्हाडांतील वर्तमान पत्रांनीं या अयोग्य change बद्दल आपला विचार सरकारास कळवावा व लोकांचा त्रास चुकवावा. वर्तमानपत्रें सरकारचे डोळे आहेत. तर ह्या स्कीमपासून लोकांचे होणारे तोटे व अडचणी ज्या योग्य असतील त्या वर्तमानपत्रांनीं व वऱ्हाड सार्वजनिक सभेनें सरकारच्या कानांवर वारंवार घालाव्या ह्मणजे सरकार याचा अवश्य विचार करील. पूर्वी प्रमाणें सेशन मुकद्दमे प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं व्हावें. पूर्वी जुडिशियल कमिशनर प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं जात असत तसें आतां सेशन जज्ज साहेबांनीं जाऊन मुकद्दमे केल्यास लोकांस त्रास होणार नाहीं. एकाच्या सुखासाठीं शेंकडों लोकांना त्रास होणें बरोबर नाहीं. शिवाय अधिकारी यांना प्रवास करण्यास ज्या सोयी असतात व जी मदत मिळते ती गरीब लोकांना नसते करितां याचा विचार होऊन कांहीं तजवीज योग्याधिकारी करतील तर "शहाणपणाची तजवीज" असें कोण ही ह्मणेल. तसेंच दिवाणी अपिलांच्या संबंधेंही लोक कुरकुर करितात. याबद्दल पुढें एखादे वेळीं विचार करूं.

शाळाखात्याचे अधिकारी इकडे लक्ष्य देतील काय? आजपर्यंत वाशीम देवपेठ व इंग्रजी मराठी शाळा वाशीम येथील चवथे इयत्तेच्या मुलांना ह्या जिल्ह्यांतील पगारी विद्यार्थ्यांच्या परीक्षेस चवथ्या इयत्तेत बसण्याची परवानगी नसे ती आतां नवीन आलेले कमिशनर मि. ह्मॉडन साहेब बहादूर यांनीं दिली असें ह्मणतात. व हें खरें असल्यास सदरहु स्कुलांत शिकणाऱ्या चवथ्या इयत्तेतील मुलांवर कृपा केली असेंच ह्मटलें पाहिजे. पगारी विद्यार्थ्यांची परीक्षा चवथ्या इयत्तेंत होते. व त्यांचें वय बारा तेरा वर्षांचें असावें असें सरक्युलर आहे असेंही ह्मणतात. परंतु कधीं कधीं वयाचीही मर्यादा रहात नाहीं अगर वयाबद्दल पोलिस येणारीं मुलें खोटे दाखले आणतात असेंही ह्मणतां येईल. तसें चवथ्या इयत्तेंत परीक्षा व्हावा असें आहे परंतु ह्या परीक्षेकरितां सहावी मराठी शाळेंतून पास झालेली व पांचवी पास झालेली मुलें पाठविली जातात. व हीं मुलें पगारी विद्यार्थ्यांच्या परीक्षेंत पास होऊन जागा पटकावितात व निवळ चवथी इयत्ता शिकून परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संधी हुकते करितां पांचवी सहावी इयत्ता शिकणारांनीं ह्या परीक्षेस न बसण्याचा एकतर प्रतिबंध व्हावा नाहींतर चवथींत परीक्षा घ्यावी ही जी अट आहे ती काढून टाकावी. तसेंच वयाच्या संबंधें नियम कडक रीतीनें अमलांत यावे. आलेली कल्पना गरीब विद्यार्थ्यांच्या हितासाठीं कळविली आहे. योग्य वाटल्यास अधिकारी पहातीलच नाहींतर चाललें आहे तसें चालूंद्या.

कळावे हे विनंती.

आपला

Justice.

**वऱ्हाडसमाचार.**

मित्ती श्रावण वद्य ३० शके १८११

शाळाखात्याबद्दल होता होईल तितका खर्च कमी करावा असा जरी सरकारचा हेतु दिसत आहे तरी त्या खात्याची सुधारणा करावी व त्याबद्दल देववेल तेवढी मदत द्यावी असें अद्याप सरकार आपल्या मनांत बाळगतें व त्याप्रमाणें खटपटही करतें आहे हें पाहून फार आनंद वाटतो. इंग्रजी अंमल हिंदुस्थानांत आल्यापासून एतद्देशीय लोकांस जे कांही ह्मणून इतर फायदे व सुख झालें आहे त्या सर्वांत विद्यादान हें अगदीं मुख्य आहे व त्याबद्दल आह्मी एतद्देशीय लोक त्याचे फार आभारी आहों. आजकाल पाश्चिमात्य विद्येचा संस्कार झाल्यामुळें बरीच मंडळी विद्वान् झाली आहे ही गोष्ट जरी खरी आहे तरी सरकारांनीं ह्या कामांतून आपलें आंग काढून घेण्याची वेळ अद्याप आली नाहीं. अशी वेळ येण्याला अद्याप बराच अवकाश आहे. निदान आणखी पांच पंन्नास वर्षेंपर्यंत येत नाहीं ही गोष्ट खास आहे. तर सरकार आमच्या विद्यावृद्धीबद्दल आजपर्यंत जशी खटपट करीत व कळकळ बाळगीत आहे तशीच आणखी कांहीं दिवस बाळगील व पैशाबद्दलही आपला हात आटोपून घेणार नाहीं तर सर्व हिंदुस्थानचें कल्याण होईल यांत कांहीं शंका नाहीं.

शाळाखात्याची पुढील बाबतींत सुधारणा करण्या संबंधानें नुकतांच एक हिंदुस्थान सरकारचा ठराव प्रसिद्ध झाला आहे व त्याजबद्दल सर्व प्रांतिक सरकारांचे अभिप्रायही आले आहेत. सदरहू ठराव सर्व शिक्षक व विद्यार्थी लोकांना फार फार महत्वाचा आहे व त्याजबद्दल आमचे प्रांतिकसरकारचें काय मत आहे व कशी काय व्यवस्था करणार आहे हें अद्याप कांहीं समजलें नाहीं.

कसरत आणि व्यायाम करणें, शिक्षणक्रम सोडल्याबद्दल शिक्षा करणें, चालचलणुकीचें रजिष्टर ठेवणें, विद्यार्थ्यांकरितां भोजन व वसती गृहस्थापित करणें, निवडकविद्यार्थ्यांची मॉनिटर (पंच)च्या जागीं नेमणूक करणें विद्यार्थ्यांची वागणूक ज्या योगें प्रत्यक्ष सुधरेल असें शिक्षण देणें, अमुक वयांत विद्यार्थी अमुक इयत्तेत नसल्यास त्याला काढून टाकणें व त्याचप्रमाणें मुलांनीं एका शाळेंतून दुसऱ्या शाळेंत जाण्याबद्दलचे नियम करणें" वगैरेबद्दलच्या गोष्टी त्या ठरावांत नमूद केल्या आहेत हें नियम केवळ कनिष्ट प्रतिच्याच किंवा वरिष्ट प्रतिच्या शाळाला लागूं आहेत असें नसून ते कॉलेजपासून तर लहान लहान शाळांना सारखेच लागूं असेल पाहिजेत व ते पाळण्याबद्दल सरकारी अंमलदारांनीं व इतर लोकांनीं होईल तितकी मदत केली पाहिजे. व त्याप्रमाणें मदत करण्याचें उभयपक्षीं कबूल झाल्यासारखें आहे. शिक्षण क्रम मोडल्याबद्दल शिक्षा द्यावयाची ती मुलांना दंड वगैरे करण्यापेक्षां छड्याचा मार देणें हेंच कित्येकांना पसंत वाटतें परंतु हिंदुस्थान सरकारला हे दोन्हीही मार्ग संमत आहेत व त्याची अंमलबारी करणें हें शिक्षकाच्या मर्जीवर आहे. सर्व ठिकाणीं उत्तम व्यवस्थेशीर बोर्डिंग हाउसेस (भोजन व वसतीगृह) असणें हें फार फायदेशीर आहे परंतु त्याजबद्दल पैसा कोणी खर्च करावा? बहुतेक प्रांतीक सरकार ह्या बद्दल खर्च करण्यास तयार नाहींत व हें खानगी खर्चावर चालवेत असें त्यांचें मत आहे परंतु खानगी खर्चावर भोजनगृह ठेविल्यानें विद्यार्थ्यांना दुसरा कांहीं एक फायदा न होतां केवळ खाण्यापिण्याच्या सोईचाच कायतो फायदा होतो. व्यवस्थेशीर भोजनगृह ठेवण्याला खर्च बराच पाहिजे आहे व तितका खर्च करण्याची ऐपत आमच्या लोकांपैकीं फारच थोड्यांत आहे तर मग भोजनगृहापासून फायदा कसला होणार? पंच नेमण्याबद्दल मुंबईंतील एलफीनूस्टन नियम अगदीं अनुकरणीय आहेत व ते सर्व ठिकाणीं पसरेल जावेत. अशी सरकारची सूचना आहे.

प्रत्येक शाळांतून जे कांहीं नियम आहेत त्यांत ह्या पुढील नियमा कडे सर्वांनीं विशेष लक्ष दिले पाहिजे व हे नियम जर पाळले नाहीं तर "ग्रांटइन एड" म्हणून मदत ज्या ज्या शाळास दिली जाते ती दिली जाणार नाहीं. ते नियम हे कीं वाईट वर्तणूकी बद्दल एका शाळेंतून मुलाला काढून दिले असल्यास शाळा खात्याच्या अधिकाऱ्याच्या हुकुमा शिवाय त्याला दुसऱ्या शाळेंत घेऊं नये. फी न दिल्या मुळें मुलाचें नांव शाळेंतून काढून टाकले असल्यास त्याला दुसऱ्या शाळेंत घेऊं नये, व दुसऱ्या शाळेंत जो विद्यार्थी घ्यावयाचा त्याला तो आपल्या पहिल्या शाळेंत ज्या वर्गांत होता त्यापेक्षां वरील वर्गांत घेऊं नये. सदरहू वरील नियम कितपत पाळतां येतील या बद्दल विचार पुढें करूं.

शिक्षण सुधारण्या करितां ट्रेनिंग कालेजांस असावीत असें हिंदुस्थान सरकारचे मत आहे. व ह्या मधून उंच प्रतीच्या व कनिष्ट प्रतीच्या शाळांतून शिक्षण देण्यास शिक्षक तयार झाले पाहिजेत व याबद्दल खर्च ही प्रत्येक प्रांतिक सरकारनें करावा. असें हिंदुस्थान सरकारचें मत आहे. परंतु त्याबद्दल प्रत्येक प्रांतिक सरकारचें वेगळें वेगळें मत आहे. मुंबई सरकार अद्याप शिक्षणा करितां ट्रेनिंग कालेजीस स्थापण्यास तयार आहे. परंतु दुय्यम प्रतीच्या शिक्षणा प्रित्यर्थ या कामांत पैसा खर्चणें त्याना अयोग्य वाटतें. बंगाल सरकार मिडल आणि हायस्कूल मधून लागणारे इंग्रजी शिक्षक तयार करण्या करितां ट्रेनिंगकालेज घालण्यास तयार आहे. या प्रमाणें प्रत्येकाचे वेगळें वेगळें मत आहे तरी ह्या कामाला पैसा प्रत्येक प्रांतांतून खर्च झाला पाहिजे मग तो सरकारी होवो किंवा खागगी होवो असें हिंदुस्थान सरकारचें ह्मणणें आहे. व ही वरील सर्व व्यवस्था अमलांत आली व त्यामुळें चांगले शिकलेले व निवडक असे शिक्षक प्रत्येक शाळांतुन नेमले गेले म्हणजे निति शिक्षण सहजच सुधारणार आहे या शिवाय निति शिक्षणाचा पसार चांगला होण्या करितां शाळेंत जी बुकें शिकवायाची ती असी असली पाहिजेत कीं तेणें करून मुलाचें वर्तन सहज सुधरेल.

## पाचवी राष्ट्रीय सभा.

(ता० २६ दिसेंबर १८८९ रोजीं मुंबईस होणारी.)

या इंग्रज सरकारच्या राजसत्तेखालीं सर्वत्र शांतता राहून रस्ते, आगगाड्या, तारायंत्रें, टपाल, न्यायाचीं कोर्टें, शाळा, कॉलेजें, छापखाने, वर्तमानपत्रें वगैरे आपल्या पूर्वजांच्या स्वप्नांत ही आल्या नसतील अशा पुष्कळ सुखकारक सोयी झाल्या आहेत. ही गोष्ट लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांस माहित आहे. परंतु या सर्व गोष्टीपेक्षां विशेष महत्वाची गोष्ट ही कीं इंग्रजसरकारचें एक छत्री राज्य हिंदुस्थानात झाल्या दिवसापासून आह्मी एका देशातलि राहिवाशी असून प्रांतपरत्वें, भाषापरत्वें, जातिपरत्वें, धर्मपरत्वें आह्मातील भेद गौण असून, एका राष्ट्राची प्रजा या मुख्य संबंधानें आपण एक आहोंत अशी आमची समजूत होत चालली आहे. देशस्थ, कोंकणस्थ, ब्राह्मण, मराठे, पारशी, मुसलमान, मद्रासी आणि बंगाली, शीख आणि रजपुत इत्यादि भेद उत्तरोत्तर नाहींसे होत जाऊन सरकार सर्वांस समदृष्टीनें वागवीत असल्यामुळें पूर्वीचीं वैमनस्यें मोडून सर्व देशांतील लोक एकनिष्ठ व एकचित्त होण्यास प्रारंभ झाला आहे. आणि आपल्या देशाचें पाऊल अशा तऱ्हेनें पुढें पडून आज हजारों वर्षें जातिभेदामुळें व धर्म वैमनस्यामुळें मागें पडलेल्या आपल्या देशाची भरभराट होऊन युरोपांतील सुधारलेल्या राष्ट्रांत त्याची गणणा व्हावी असें मोठमोठ्या राजकार्यधुरंधर इंग्रजी मुत्सद्यांचे ही मत असल्यामुळें आमचे राज्यकर्तेही अशा रीतीनें आमच्या देशाचें कल्याण व्हावें याबद्दल काळजी बहात आहेत. सारांश आपलें व आपल्या देशाचें हित कोणतें हें इंग्रज सरकारच्या राज्यामुळें आपणांस कळूं लागलें आहे व कांहीं कांहीं बाबतींत राज्याचीं सूत्रें ज्यांच्या हातांत आहेत त्यांपैकीं कित्येकांचा व आमचा जरी मतभेद पडला तरी देशहिताचे विचार एतद्देशीय लोकांच्या मनांत जागृत करण्याचें श्रेय राज्यकर्त्यांकडेसच आहे. ही गोष्ट आपणास प्रांजलपणें कबूल केली पाहिजे. फार लांब कशाला? सर्व देशांतील प्रमुख लोक एके ठिकाणीं जमून राष्ट्रीय सभेच्याद्वारें सरकारापाशीं वाद मागणें हें देखील इंग्रजी विद्याप्रसाराचे व इंग्रजी राज्यपद्धतीचेंच फल आहे.

आतां कित्येक असा प्रश्न करतील कीं सरकार जर आपणास न्यायानें व समतेनें वागवीत आहे तर आपणास राष्ट्रीय सभेसारखी खटपट करण्याची काय जरूर आहे! ह्यावर आमचे असें उत्तर आहे कीं आमच्या राज्यकर्त्यांचे हेतु जरी चांगले असले तरी आपल्या रीतीभातीविषयीं, धर्माविषयीं, आचारविचाराविषयीं, किंबहुना आपल्या सुखदुःखाविषयीं, आमचे राज्यकर्ते परकी असल्यानें त्यांस पूर्ण माहिती मिळत नाहीं, आणि ह्यामुळें ते आमच्या सुखाकरितां म्हणून ज्या ज्या व्यवस्था करितात त्यांपासून आपणांस नेहमीं सुखच प्राप्त होतें असें नाहीं. ह्या व अशाच दुसऱ्या कारणांनीं आपणांस अद्याप पुष्कळ बाबतींत अडचणी सोसाव्या लागत आहेत. राज्याचा खर्च अतोनात वाढला असून करांचें ओझें वाढत आहे; आणि मीठ, रान, अबकारी, वगैरे खात्यांच्या कडक अमलानें आमणांस पुष्कळ त्रास होत आहे. हा त्रास आपणांस होऊं नये अशी आपली इच्छा असेल व इंग्रजी राज्याचे आपण खरे हितचिंतक असूं तर या आपल्या गैरसोयी कशानें दूर होतील, प्रजा कशानें सुखी राहून सरकारास दुवा देईल, ह्या गोष्टी योग्य मार्गानें सरकारच्या कानावर आपणांस घातल्या पाहिजेत. इंग्रज लोक स्वभावतःच स्वातंत्र्याभिलाषी व न्यायप्रिय आहेत. त्यांच्या हांतून एखादे वेळीं कांहीं चूक झाल्यास त्याबद्दल लोकांचें काय ह्मणणें आहे तें ते लक्ष देऊन ऐकून घेतात व तें बरोबर आहे अशी त्यांची खात्री झाली ह्मणजे आपल्या चुकीची दुरुस्ती करण्यास ते कधींही मागें घेत नाहींत. युरोपांत जेवढीं ह्मणून राष्ट्रें आहेत तेवढ्यांत राजाचा योग्य मान राखून प्रजेनें आपल्या गैरसोयी काढून टाकण्यास कोणत्या तजविजी कराव्या याची समजूत होण्यास इंग्रज लोकांचाच इतिहास शिकला पाहिजे, कारण ह्या बाबतीत इंग्रज लोकांची राज्यपद्धती इतकी सुदृढ व भक्कम पायावर रचलेली दुसरी कोणतीही राज्यव्यवस्था आपणांस सांपडणार नाहीं. या राज्यपद्धतीस अनुसरूनच आपणास उद्योग केला पाहिजे व त्यांतच आपलें हित आहे. राष्ट्रीय सभा हा अशाच तऱ्हेचा एक उद्योग आहे.

पुढें चालेल.

**The Berar Samachar**

MONDAY AUGUST, 26, 1889

## DRAFT REVENNE CODE GOVERNMENT AND RYOTS.

(Continued from our issue of 24th June.)

The present draft Code declares that the right to all minerals under ground belongs to the state. We have already said that this proposition is a necessary corollary of the broader and more important proposition that the ownership of all lands belongs to the State. The point about the right of state to mines in India was settled so recently as 1880 by a despatch of the Secretary of State for India dated 25th March 1880. The question had arisen in connection with the Wynaad gold mines in the Madras Presidency and the matter being referred to the Government of India the latter called for opinions from the various local governments. The result of all these and the views of the Government of India thereon were embodied in a letter from the Government of India to the Secretary of State for India dated Simla 1st September 1879 in the home revenue and agricultural department. That letter distinctly raised the three following questions.

(1) Whether the royal prerogative as it obtains in England in respect to gold and silver mines, prevails in British India; and whether grantees of waste land are entitled to mines of gold and silver found there under, when the

deed of grant is silent as to such mines.

(2) Whether, apart from such prerogative, the Crown in India can assert a right to gold, silver, or other minerals on any other ground.

(3) Whether if both these questions are answered in the negative' the resources of the land can be taken into account in assessing land revenue.

On the first question the Secretary of State for India concurred in the view taken by the Government of India that the royal prerogative as it obtains in England in respect to gold and silver mines, does not prevail in British India, at least out side the Presidency towns.

With regard to the second question the Secretary of State ruled that hereafter except in permanently settled estates, it will be presumed throughout India that in the absence of any distinct Judicial precedent or proof of established usage, the state has a right to minerals

With regard to the third question, it was ruled that where propritors of lands temporarily settled are held to be the owners of the minerals they may contain, such mineral resources may be taken into account for assessment on resettlement.

We have given the above summary to show that the Local Governments in India have no option to declare any thing regarding this subject in opposition to the ruling of the highest executive authority on Indian matters. The Local Government cannot therefore be blamed simply for obeying instructions from above. Any representation in the matter must be made in high quarters.

In connection with this recent declaration of policy regarding the state rights in minerals in the important despatch from the India office above referred to, it is interesting to notice the grappling land policy as we term it of the British government. The ryots are only lessees now for 30 years with the option of renewing their leases at the end of 30 years at the rates increased by the Government at its discretion; and the mines do not belong to the ryots at all.

( to be continued. )

## COMPETETIVE EXAMINATIONS

This question has been brought again to the notice of the public by one Mr. Herbert. He says that men should be selected for responsible posts from the upper classes of society. He further says that generally men who pass severe examinations come from that stratum of society which certainly does not count amongst its members the nobility and the gentry. He therefore proposes that the evil should be remedied by making selection of men from the upper grades.

There is some little truth in this Things about us exercise no small influence upon our minds; but the people who devote their lives from their childhood to study and pass their time either in school or college have surroundings of the best character. They see before them always the best example in their teachers and professors. And it is admitted on all hands that education is a great factor in the improvement of mankind. Yet it must be acknowledged that children do inherit the virtues and vices of their parents; and howsoever greatly the effect of the one or the other may be annihilated by education and surroundings, still there exists the germ of virtue or vice in our breasts, inherited from our parents.

In order to secure men from the upper grades of society with best education and best surroundings, the only remedy is the increase in the age for admission in the Civil-service. If it could be raised to 25 or thereabout men from Universities would be available. The test for passing the examination for the Civil service may be retained as it obtains at present, but there will be a wider area from which men could be found to join the service. At present excepting the viceroys and governors of Presidencies we seldom meet with men in the Civil service who really belong to the nobility of England.

In addition to this, there is another and sounder reason why the age ought to be fixed at 25 or thereabout. That reason is that cramming and over-study heavily tell upon the health of the selected candidates for the service. In modern times there is a very strong tendency to do things as hastily as possible. But the principle of slow and sure is lost sight of; while the proverb haste is waste is disregarded. There appears to be no reason why we should run the time alloted to us more swiftly than our ancestors did. But there is a madness which appears to have affected the whole human race to run their race as quickly as could be. In this phenomenon of the present century there is a most important subject for phi losphers both scientific and psychological to find the true reason for this hankering after speed. Let those who have to look to the permanent interests of the human race make a small pause and reflect the effects of this mania upon the race.

With the desire of securing well-paid appointments our men desire to work like beasts and the result is premature death. The recent instance of this is the decease of Mr. Shripad V. Thakur. He died at the age of 42; a time when hopes of doing something for themselves and others that surround them begin to take definite shapes and forms. Mr Campbell the gentleman who published the gazeteer is another example of the same kind. There must be a strong representation made to the responsible ministers of Her Majesty to the effect that unnecessary strain of mind in young men is neither desirable nor conducive to the health of the Empire; and as responsible leaders of the Empire they should put an end to a system which has killed the best intellects. If age be increased to 25 men of the best families, of superior education and possessing desirable health would be found in the civil service of the Empire.

One thing is very kind of Dr. Reilly and it shows that he is not selfish. He would seem to be desirous of sharing in common with his subordinates (Hospital Assistants) the popularity or at least the way of acquiring it. Recently he has issued orders to Hospital Assistants under him to treat the paupers and the well to do people alike. It matters not whether the latter pay donatious to the Dispensaries or for their medicines. Even common courtesy is not allowed! Is this not a sure way for the Hospital Assistants to make themselves and the institutions under their charge popular? But like his other measures towards popularity, the one now recommended is also doubtful.

Mr. F. Pirdeaux a son of Col. Pirdeaux, Deputy Adjutant Genl., Poona has been appointed an Assistant Superintendent of Police, Berar and has joined his appointed.

Mr. Newton Murray Head Clerk, Deputy Commissioner's office, Buldana, has been appointed Supt. of the office of the Commr: Berar, in room of Mr. J. Wade.

## HYDERABAD RESIDENCY ORDERS, AUGUST 15, 1889.

With reference to Section 25 of the Berar Municipal Law, 1886, it is hereby notified that Mr. Annaji Kesheo, Agent to the Mofussil Company, has been elected Chairman of the Municipal Committee at Shegaon with the approval of the Resident according to the provisions of Section 18 of the said Law.

Notice is hereby given that a new Court has been established at Kelapur in the Wun District.

The following transfer is therefore ordered on the public service:—

Mr. Vishwanathum, Extra Assistant Commissioner, from Yeotmal to Kelapur to open the new Court.

Under Section 21 (1) of the Hyderabad Assigned Districts Small Cause Courts Law the Resident is pleased to appoint the Judges of the Small Cause Courts at Badnera in the Amraoti District and Telbara in the Akola District for the time being to be Magistrates within the limits of the Amraoti and Akola Districts respectively, and to direct that they shall exercise the powers with which they may have been already invested or may hereafter be invested under the Code of Criminal Procedure.

Under Section 6 of the Indian Registration Act, III of 1877, the Resident is pleased to appoint Mr. C. A. W. Davies Assistant Commissioner, Akola, to be District Registrar of the Akola District *vice* Mr. Harbhamji, Assistant Commissioner, transferred to Buldana District.

The following transfers are ordered:-

Syed Shams-ud-din Ali Khan Bahadur, Officiating Assistant Commissioner 1st class, from Secunderabad to Amraoti

Dastur Edulji Bymonji, Officiating Assistant Commissioner, 1st Class, from Amraoti to Secunderabad.

## वऱ्हाड.

हवामान—परजन्य चांगला पडत आहे. आतां पंधरा दिवस उघाडी मिळाल्यास पिकास पुष्कळ फायदा होईल. रोगराई व हवा तुरळ सुरू आहे.

मि. हरीवामन भट एल. एम. ॲन्ड एस यांनीं अकोल्यास खाजगी दवाखाना घातला आहे त्याच्या सरवातीचा समारंभ गेल्या आठवड्यांत थाटानें झाला.

गेल्या तारीख १९ चे है० रे० आर्डरवरून कळतें कीं, केळापूर येथें दिवाणी कोर्ट स्थापन होऊन त्या कोर्टावर मि० विश्वनाथ ए० अ० क० यांची नेमणूक झाली.

तेल्हारें व बडनेरा येथील स्मा० कोर्टाचे जज्जांना फौजदारी अधिकार देण्यांत आले.

मि० हरबमजी अ० क० यांची बुलढाण्यास बदली झाल्यामुळें मि० डेव्हिस सा० अ० क० यांस अकोल्यास डि० रजिस्ट्रार नेमलें.

मि० आण्णाजी केशव मोफ्युशिअल कंपनीचे एजंट यांस शेगांव यांस म्यु० क० चे चेअरमन निवडलें. ही निवडणूक मे० रे० सा० पसंत केली.

मि० मोहकमसिंग पो० इ० मरण पावल्यामुळें त्यांचे १२५ रु० चे जागीं मि० बोंडजी पो० इ० यांस, त्यांचे १०० रु० चे जागीं मि० मनोहरपंत चो० का०, त्यांचे ७० रु० चे जागीं मि० फजले रहिमान अली चो० का० यांस, त्यांचे ६० रु. चे जागीं मि० शंकर विठल चो० का० यांस, त्यांचे ५० रु० चे जागीं नाफरुद्दिन यांस, व त्यांचे ४० रु० चे जागीं अकोलें जिल्ह्यांतील एका चो० का० व ३० रु० चे जागीं मि० भगवानदीन उमरावती जिल्ह्यांतील हे० का० यांस नेमले असें कळतें.

मि० न्युटन मरे हे० क्ला० डे० क० आफिस बुलढाण यांस मि० वेड याचे जागीं क० आफिसचे सुपिरिंटेंडेंट नेमले. त्यांचे जागीं उमरावती डे० क० आफिसांतील मि० सिंक्लेअर यांस, त्यांचे जागीं त्याचे आफिसांतील रा० रा० अबाजी नारायण यांस व त्यांचे जागीं बुलढाणें डे० क० आफिसांतील रा० शेवडे यास नेमले असें कळतें.

वकिलीचे परीक्षे करितां कर्नल मेकंझी सा० जु० क०, मि० आबर्ड सिव्हिल आणि सेशन जज्ज व रा० रा० गणेश श्रीकृष्ण खापर्डे बी० ए० एल् एल्० बी० हे परीक्षक आहेत.

## वर्तमानसार.

हे० हे० मध्यें लंडनची तार छापली आहे कीं राशियन सरकार अफगाणिस्थानवर हल्ला करण्या साठीं कंबरा बांधित आहेत.

काश्मीरच्या महाराजास हल्लीं कांहीं मुदतीनर पदच्युत करण्यांत आलें आहे या पदचुत करण्याबद्दल निरनिराळीं इग्रजी पत्रें भलतेंच विचार पुढें आणीत आहेत. या संबंधानें सरकारापुढें असणारे प्रश्न पुढील प्रमाणें आहेतः—

(१)काश्मीर संस्थानची स्वतंत्रता व मोठेपणा यास मान देण्यांत येईल असें इंग्रज सरकाराकडून वचन देण्यांत आलें नाहीं काय? असलें वचन देणें शंभर वेळां झालें असेल नव्हे?

(२)तें अभिवचन आतां इंग्रज सरकारास मोडतां येईल काय? महाराज राजद्रोही आहेत असें कायदेशीर ठरल्यास तो प्रजेवर जुलूम करील तर तें वचन मोडतां येईल.

(३) या मुदतीच्या पदच्युत करण्यामुळें हिंदुस्थानच्या रयतेच्या मनावर कोणता ठसा उमटेल? इंग्रज सरकारानें दिलेल्या वचनावर यापुढें कोणीही रयत यत्किंचितही भरवसा ठेवणार नाहीं तसेंच इंग्रजांच्या नीतीचेंही पाणी ते जोखतील.

(४) असा वचनावर बेभंरसा झाला तर व इंग्रजनीतीचें पाणी जोखण्यांत आलें तर त्यापासून काय तोटा होईल? खालसा करण्याच्या वहिवाटीस हल्लींचे सर गार्स्ट हे जरी उलट आहेत तरी त्यास देखील एकाद्या अति नीच मनुष्यापुढें, या वर्तनाबद्दल गोष्ट सुरू झाल्यास खालीं मान घालावी लागेल. हल्लीं नीतीमुळें जो इंग्रज लोकांस मान देण्यांत येतो त्या इंग्रज लोकांस मग अधोमुख करून चालावें लागेल.

हिंदुस्थानांतील नेटीव पत्रांच्या पुन्हा मुसक्या बांधाव्या असें कोणा मि. सेटन (भूत) कानांवाच्या मनुष्यानें एका मासिक पुस्तकांत प्रसिद्ध केलें आहे. हे गृहस्थ पूर्वीं हिंदुस्थानांत डि. जज्ज होते. यांनीं एका तरुण इंग्लिश पोरीशीं विहाह केला ह्मणून त्या वेळीं त्याची बरीच पूजा झाली होती. यास त्यांवेळीं बंगाली भाषेचा मोठा गर्व असे. बंगाली भाषेंखेरीज इतर भाषेंत ते कधींही बोलत नसत यास या भाषेचें कितपत ज्ञान होतें हें त्यानीं आपली बायको आपल्या बंगाली खुषमसकऱ्यास दाखवितांना बंगाली भाषेंत आपल्या नायकेस 'कन्या' असें म्हटलें होतें, यावरुन सहज कळून येईल! मि. सेटन-हे हल्लीं आगदीं वयोवृद्ध झाले असल्यामुळें त्यास आता हें लाखंडाचे खेळ पाहिजेत कशाला? यांची एक तंगडी थडग्यांत गेली असल्यामुळें त्यानीं आतां ऐहिक नश्वर गोष्टींची उगीच वटावाट कां करावी! आतां यांचें उतार वय झालें आहे करतां 'येशू येशू ह्मणत थडक्यांत पडण्याची यानीं वाट पहात बसावें ह्मणजे झालें. नेटीव पत्रांच्या मुसक्या बांधल्या किंवा सोडल्या त्याच्याशीं या सेटनास काय करावयाचें आहे, असल्या प्रकारचा मुसक्या बांधण्याचा कायदा केल्यास त्यापासून नेटीव पत्रांचें नुकसान न होतां सरकाराची मात्र जास्त फटफजीती होऊं लागेल हें आह्मां पत्रकर्त्यांस व सरकारास पूर्णपणें कळून आलें आहे. इकडील पत्राच्या अशा मुसक्या बांधण्यांत आल्या तर आह्मी सर्व पत्रकर्ते मिळून विलायतेंस इंग्रजी पत्रें सुरू करूं आणि त्यामुळें हल्लीं पेक्षां जास्त गवगवा मात्र विलायतेस होईल हें आमच्या सरकारच्या मनांत पक्कें बिंबलें आहे. या सेटननें जातां जातां रास्तगुफतार व इंदुप्रकाश यांच्यावर राजद्रोहाचा शिंतोडा उडविला आहे. बिचारा रास्त गुफतार मात्र उगीच तोंडघशी पडत आहे, या रास्त गुफतारानें आजपर्यंत राष्ट्रीय सभेविरुद्ध बरेच पोरकट लेख लिहिले आहेत त्याचें तर प्रायश्चित रास्त गुफतारास सेटनच्या हातून ईश्वर देत नसेल ना? कांहीं हा असो या सेटन ह्मताऱ्यास आतां हे धंदे पाहिजेत कशाला! शेवटीं तरी कांहीं पुण्य संचय कर. गरीब बिचारा सेटन!

ही पुढील गोष्ट सुधारकानें विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे सुमारें २९ युरोपियन स्त्रियांनीं पालमाल ग्याझेट पत्रांत पुढील लेख प्रसिद्ध केला आहे. या लेखांत आमच्यांतील विधवा विवाह बंद व्हावा असें या युरोपियन स्त्रियांचें मागणें आहे त्या म्हणतात कीं अगदीं खालीं सही करणार विलायतेंतील शहाण्या व विद्वान स्त्रीपुरुषांस असें कळवितों कीं, आमच्यांत जी विधवा विहाह करण्याची आम्हां दुष्ट चाल आहे ती मोडून टाकावी अशी आमची इच्छा आहे. आह्मापैकीं दोघी खेरीज आम्ही सर्व लग्नाच्या बायका आहोंत आणि म्हणून आम्ही या विविषयावर निःपक्षपातीं न्याय देण्यास योग्य आहोंत. स्त्रियास शक्ति, धैर्य व विद्या यांची व या गोष्टींत त्यांचें पुढें पाऊल पडावें हें आम्ही मनापासून इच्छितों व याच गोष्टीवर लग्नाची रीत असणें वाजवी आहे असेंही आपलें मत आहे तर मग हल्लीं ज्या कुमारिका आहेत त्यासच जर वर मिळत नाहींत तर एकाच बायकानें एक दोन किंवा त्याहून अधीक वरांस आडवून ठेवणें हें किती अन्यायाचें आहे बरें? लग्न हेंच सर्व सुखाला कारणीभूत आहे असें जें समजतात ते या अन्याय चालीवर अगदीं विरुद्ध आहेत. तसेंच जे लग्नाची चाल कांहीं कमी किंमतीची मानतात तेही असें म्हणतात कीं ज्यास्त्रीचा अनुभव एकाच नवऱ्यामुळें पुरा झाला नाहीं तरी ही त्या स्त्रीची व आमची ईश्वरानें गाठ पडू नये मिळून दोन्ही पक्ष या चाली विरुद्धच आहेत असें होतें आम्हा पैकीं कोणी ही वेळ पडल्यास पुनर्विवाह करणार नाहीं किंवा तसें करण्यास कोणास संमतीही देणार नाहीं. आमच्या या म्हणण्यास एक पुरावा आहे. स्त्रियाची नितिमत्ता कधींही कमी होता देऊं नये हें आपलें कर्तव्य आहे पण या पुनर्विवाहाच्या चालीमुळें ती हटकून कमी होत आहे ती कशी? असा जर कोणी प्रश्न करील तर त्यास आम्ही असें उत्तर देणार कीं नीतिमत्ता कोणत्या गोष्टीवर अवलंबून आहे? विधवेच्या नैसर्गिक गुणावरच अवलंबून असली पाहिजे हे गुण दया व सर्व संगपरित्याग हे होत या गुणांचा लोप होणें म्हणजे दुर्दैव ओढवलेंच असें आम्ही समजतों. आपल्या प्राणपतीच्या प्रत्येक कृत्यास त्याच्या स्त्रीचें अनुमोदन व रुकार असलाच पाहिजे. पाहिल्या पतीचा रागाच्या सीमेपर्यंत पाहिजे तर या गोष्टीस स्त्रीनें आपलें अनुमोदन देऊं नये पण तो सीमा उल्लंघन करण्यांत मात्र येतां कामानये विधवा विवाहानें संसारांत पावलोंपावलीं अडचणी येतात नात्याचा दुकाळ व गोंधळ तसेंच संपत्तीचे घोटाळ्याची वाटणी यामुळें आमचा इंग्रजी संसार उत्तरोत्तर बिघडत चालला आहे. कोणत्यांही विशेषवर्गाला नीतिचें प्रमाण जास्त मिळून देण्यास स्त्रियाच कारणीभूत आहेत म्हणजे त्यामुळें आमच्या समाजांत नीति आहे पण हा विधवाविवाहाची चाल तें प्रमाण उत्तरोत्तर आंकुचित करीत आहे या साठीं आंगच्या नितीमत्तेचें प्रमाण असें कमी होऊं नये ह्मणून विधवा विवाहाच्या विरुद्ध सरकारानें कायदा करावा असें आमचें मागणें आहे. आमच्या इकडे विधवाविवाहाबद्दल कायदा मागण्याची तयारी चालू आहे व विलायतेंत तो बंद व्हावा ह्मणून बायका कायदा मागत आहेत यावरून आमच्या इकडील हे उतावळे सुधारक त्या बायकांहून हो! अज्ञानी ठरत नाहीं काय?

विलायतेंस व्यापाऱ्यांच्या खुणांचा जसा कायदा आहे त्या नमुन्यावर हिंदुस्थानांत हो चालू करयावें घाटत आहे.

गरीब कुटुंबांतील मिळवता मनुष्य गेला असतां त्याचें कुटुंब फार दीनावस्थेत राहातें असें दिसून आल्यावरून मुंबईच्या पार्शी लोकांत तसल्या लोकांसाठीं एक फंड उभारत आहे. या फंडाच्या सभेंत फक्त २९०० मेंबर घ्यावयाचे असें ठरविण्याचें घाट। असून या सभेच्या मेंबरा करतां एन्टरन्स फी व कायमची फी फारच थोडी ठेवण्यांत येणार आहे. या सभेचे सर्व काम आनररी सेक्रेटरी कडे चालेल. या सभे संबंधानें विस्तृत हकीकत अजून बाहेर पडणें आहे या पार्शी लोकांच्या या स्तुत्य कृत्याबद्दल त्यांची तारीफच केली पाहिजे आमच्या हिंदूंना नाहीं का अशीं अनाथ कुंटुबें सांवरणारे? पण या अनाथ कुटुंबांच्या वेदनेपेक्षां विधवा विवाह केशवपन व बालविहाह यांच्या वेदना अम्हा सुधारक ह्मणविणाऱ्या पुढाऱ्यांच्या बारक्या अंतःकरणास फार झोंबतात त्यास काय करावें?

अतिशय पाऊस पडल्यामुळें सिंधू नदीला पुर येऊन हरणाई रेल्वेला पुन्हा अडथळा आला आहे. सुमारें ४८ मैल रेल्वे पाण्यांत गडप झाली आहे.

कोरत आणि थळ या दोन ठिकाणाच्या मध्यें एक नवीन लष्करी ठिकाण तयार करण्यांत येणार आहे हीं दोन्हीं ठिकाणीं सरहद्दीवर आहेत. एवढेंच येथें लक्षांत ठेवावयाचें.

यंदा हिंदुस्थानांतील युरोपियन फौजेस आणखी १९००० बंदुका द्यावयाच्या होत्या पण तो संख्या आतां १९००० करण्यांत आली आहे. सरहद्दीवरील सर्व फौजेस मार्टिनीस नांवाची हत्यारें देण्याचीं आहेत. सरहद्दीवर आमची तयारी सुरू आहे तर,

पांदिचरी येथें एक ब्रह्मी राजपुत्र कैद करून ठेवला होता तो बायकोच्या वेशानें पळून गेला असें ह्मणतात.

तिपेरा नावांचे एक संस्थान सरहद्दीवर आहे हें संस्थान आजपर्यंत स्वतंत्र होतें पण आमच्या सरकारास त्याचा अभिलाष झाल्यामुळें तें संस्थान खालसा करून त्यावर एक युरोपियन म्यानेजर ही नेमण्यांत आला.

ठा० अ०

मुंबईमधील रक्तपितीचे लोक एकदम बाहेर काढून देण्याची खटपट मोठ्या कसोशीनें चालली आहे.

इंजिप्तमध्यें लढाऊ लोकांची भरती होत असून त्यांच्या पोटगीसाठी मक्तेदार लोकांकडे टेंडरें मागीतली आहेत.

विरुरपासून गबोपर्यंत आगगाडी उघडून ती दक्षण महाराष्ट्र रेल्वेशी सांधून देण्याचा समारंभ म्हैसूरचे महाराजांच्या हातें करविण्यांत आला.

— कलकत्यावर महाचक्र आले तर कोठचें ठिकाण शत्रूचा नाश करण्यास कामीं पडेल याची पहाणी चालली आहे.

म० मि० हिले

जर्मनींत देवदारूच्या पानांच्या तंतूपासून गरम फ्लानेलचा कपडा तयार करण्याची कृति काढली आहे हा फ्लानेल गरम असतो; व इतर फ्लानेली प्रमाण तिचे कबजे, विजारी, शर्ट, कमकोटी वगैरे कपडे होत तः आणि कपडा बनतांना पानांचा जो अवशेष राहतो त्यचा ग्यास करतात व गिरण्यांत त्याच ग्यासाचे दिवे लावतात. मेंढरांच्या फ्लानेलमध्यें धाम, ताप वगैरे रोगांचे बीज पुष्कळ दिवस राहत, तसें या फ्लानेलींत राहत नाहीं.

'सिव्हिल व मिलिटरींत ग्याझेट' पत्रकर्ते अशी शिफारस करितात कीं, जर्मन व फ्रेंच लोकां प्रमाणेंच इंग्रज लोकांनींच लष्करी कामांत कुत्र्यांचा उपयोग करावा ह्मणजे बरें पडेल. सूचना फार चांगली आहे, फ्रेंच लोक अलीकडे कुत्र्यांकडून पहरकऱ्यांची, अडलैंची व बातमीदारांची कामें करून घेऊं लागले आहेत. एवढेंच नव्हे. तर रणसंग्रामाचे जागीं असलेले शिपायांस पोटगीचें सामान पुरविण्याचें काम ही फ्रेंच लोक कुत्र्यांकडून थोड्या खर्चांत करून घेऊं लागले आहेत. आमच्या सरकारचा युद्धखर्च दिवसें दिवस वाढत चालला आहे, यासाठीं हा उपाय त्यांनी अवश्य योजावा, ह्मणजे कांहीं तरी खर्च कमी होईल.

दी० ब०

एक ब्राह्मणाची बाई अंतम्मा, मद्रास येथील राहणारी, बारावर्षे गरोदर होती, ती नुकीच प्रसूत होऊन तिला मुलगा झाला बालबाळंतीण खुशाल आहे. के०

इसलामपूराकडे एक १०८ वर्षांचे गृहस्थानें दोन ठिकाणीं पेनशनीपर्यंत नोकरी करून तिसरे ठिकाणीं नोकरी करीत आहे. याच डोक्याचे केंस काळे असून घोड्यावर स्वारी चांगली करितो!

अमेरिकेंत खनिसुमारी एका क्षणांत नोंदता येईल असें एक यंत्र तयार केलें आहे.

अमेरिकेंत बूट काळे करण्याची शाईची खाण सांपडली आहे, आणि विजेच्या योगानें जंगल कापीत आहेत.

कांग्रेस करतां येणार— येथें भरणाऱ्या कांग्रेस करितां मि० ब्रेडलॉ आणि मि० दादाभाई नवरोजी यांच्या स्वाऱ्या विलायतेहून येणार आहेत. ते० मि०

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.